मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | मंगळवार, २९ जुलै २०२५ | वर्ष- ३० | अंक-३९ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



मालदीवच्या अध्यक्षांना मिठी मारताना धर्म विचारला होतात का? पान 8

प्रासंगिक



# 'दिव्या'

## महाराष्ट्राची दिव्य शक्ती

**भारताच्या** आणि महाराष्ट्राच्या या लेकीने अभूतपूर्व असा पराक्रम साकारत जागतिक बुद्धिबळाच्या इतिहासात स्वतःचे आणि देशाचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले आहे. नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखने केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे नाव जागतिक क्रीडा क्षेत्रात उज्वल केले आहे. बुद्धिबळातील चिन्यांचे वर्चस्व मोडीत काढत दिव्या आणि भारताची दुसरी पराक्रमी लेक 'ग्रँडमास्टर' कोनेरू हंपी या दोघींनी फिडे विश्वचषक महिला बुद्धीबल स्पर्धेच्या अंतिम फेरीत दिमाखात मजल मारली होती. सर्व भारतीय मामला अशा स्पर्धेच्या अंतिम फेरीत जिगरबाज दिव्याने अनुभवी हंपीला टायब्रेक डावात पराभूत केले. 'मराठमोळ्या' दिव्याच्या या भीमपराक्रमाने महाराष्ट्रवासियांची छाती अभिमानाने ५६ इंच झाली आहे. शिवाय भारतीय क्रीडा शौकिनांनी देशाचे नाव रोशन करणाऱ्या दिव्या आणि हंपीवर मुक्तकंठाने स्तुतीसुमने उधळली आहेत.

नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखने FIDE महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकला आहे. अंतिम फेरीत टाय-ब्रेक फेरीत भारताच्या कोनेरू हम्पीला पराभूत करून तिने हे विजेतेपद पटकावले. विश्वविजेतेपद मिळवण्यासोबतच ती भारताची ८८ वी ग्रँडमास्टर देखील बनली.या स्पर्धेत दिव्याने अनेक अव्वल क्रमांकाच्या खेळाडूंना पराभूत केले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. हम्पीविरुद्धच्या अंतिम सामन्यात दिव्याने दोन्ही मुख्य सामने बरोबरीत सोडवले. त्यानंतर सोमवारी टाय-ब्रेक फेरी झाली, ज्यामध्ये दिव्याने विजय मिळवला.कोनेरू हम्पीवर मात करत विश्वविजेतेपद पटकावताच दिव्याला अश्रू अनावर झाले. त्यानंतर दिव्या तिच्या आईला बिलगून ढसाढसा रडताना दिसली. जगभरातून दिव्याचं कौतुक केलं जात आहे.

दिव्याने उपांत्य फेरीत माजी विश्वविजेत्या टॅन झोंगयीचा १.५-०.५ असा पराभव केला. १९ वर्षीय दिव्याने १०१ चालींमध्ये पांढऱ्या मोहऱ्यांसह पहिला गेम जिंकला.तिने मधल्या गेममध्ये सतत दबाव आणला आणि झोंगीला चुका करायला भाग पाडले.दिव्याचा जन्म नागपूर येथे एका मराठी कुटुंबात झाला. तिचे आईवडील, जितेंद्र देशमुख आणि नम्रता देशमुख, डॉक्टर आहेत. तिने तिचे सुरुवातीचे शिक्षण भवन भगवानदास पुरोहित विद्या मंदिर येथून घेतले.२०२१ मध्ये देशमुख भारताची २१ वी महिला बुद्धिबळ ग्रँडमास्टर बनली. तिने २०२२ मध्ये महिला भारतीय बुद्धिबळ अजिंक्यपद जिंकले . तिने २०२२ बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये वैयक्तिक कांस्यपदक देखील जिंकले . ती सुवर्णपदक विजेत्या FIDE ऑनलाइन बुद्धिबळ ऑलिंपियाड २०२० संघाचा देखील भाग होती. डिसेंबर २०२४ पर्यंत, ती भारतातील दुसऱ्या क्रमांकाची महिला बुद्धिबळपटू आहे. २०२३ मध्ये, अल्माटी येथे तिने आशियाई महिला बुद्धिबळ स्पर्धा जिंकली . त्यानंतर तिने टाटा स्टील इंडिया बुद्धिबळ स्पर्धेच्या महिलांच्या जलद विभागात प्रथम क्रमांक पटकावला , तोही तळाचा मानांकित असूनही. स्पर्धेत तिने हरिका द्रोणवल्ली , वंतिका अग्रवाल , कोनेरू हम्पी , सविता श्री बी , इरिना क्रश आणि निनो बत्सियाश्विली यांना पराभूत केले , महिला विश्वविजेत्या जू वेंजुन आणि अण्णा उशेनिना यांच्याविरुद्ध बरोबरी साधली आणि पोलिना शुवालोवा यांच्याकडून तिचा एकमेव पराभव झाला.

नवनाथ दांडेकर

६४ चौकोनाच्या पटावर वयाच्या सहाव्या वर्षापासूनच अधिराज्य गाजवणाऱ्या दिव्याने १५ व्या वर्षीच आंतरराष्ट्रीय महिला ग्रँडमास्टर 'किताब मिळवला. त्यानांतर तिने कधीच मागे वळून पाहिले नाही.वयाच्या १८व्या वर्षी आशियाई चेस क्वीन 'किताब पटकावत तिने आशिया खंडात आपले आणि देशाचे नाव उज्वल केले.जॉर्जियातील बटुमी येथील फिडे महिला विश्वचषक स्पर्धेत दिव्यापुढे जगातलय नामवंत महिला बुद्धिबळपटू फिक्या ठरल्या.विशेषतः चीनच्या माजी विश्वविजेत्या बुद्धिबळपटूला पराभूत करीत दिव्याने 'जागतिक बुद्धिबळ क्वीन' 'किताब पटकावण्याची आपले इरादे स्पष्ट केले होते. उपांत्यपूर्व फेरीत चार महिला बुद्धिबळपटूनी स्थान मिळवत यंदा नवा विक्रम साकारला होता.फिडे महिला विश्वचषकाच्या फायनलमध्ये धडक मारत दिव्या आणि हम्पीने आम्ही भारताच्या लेकीचं 'जागतिक बुद्धिबळ क्वीन' बनणार असा संदेश जागतिक क्रीडा क्षेत्राला दिला होता.खुद्द अनुभवी कोनेरू हम्पीनेही दिव्याच्या चतुर आणि बुद्धिमत्तापूर्ण खेळाची दिलखुलास प्रशंसा या स्पर्धेच्या अंतिम लढतीआधी केली होती. दिव्याने आपले प्रेरणास्थान मानलेल्या हंपीचे शब्द अगदी तंतोतंत खरे ठरवले आणि भारतवर्षाला प्रथमच नवी 'जागतिक बुद्धिबळ क्वीन' स्वतःच्या रूपाने मिळवून दिली. FIDE महिला विश्वचषक २०२५ च्या अंतिम फेरीतील विजेत्या दिव्या देशमुखला सुमारे ४२ लाख रुपये आणि उपविजेत्या कोनेरू हम्पीला सुमारे ३० लाख रुपये बक्षिसे मिळतील. याशिवाय, या खेळाडूंनी अत्यंत प्रतिष्ठित 'कॅन्डिडेट्स' स्पर्धेसाठी देखील पात्रता मिळवली आहे. भारतात बुद्धिबळ खेळ वेगाने वाढत आहे. अशा परिस्थितीत, तिला पूर्वीपेक्षा जास्त पुरस्कर्ते मिळण्याची अपेक्षा आहे.महाराष्ट्राची लेक दिव्याचे आता एकच स्वप्न आहे ते म्हणजे कॅन्डिडेट्स स्पर्धा जिंकून जु वेनजुन (चीन) या सध्याच्या वर्ल्ड वुमेन्स चॅम्पियनला आव्हान देण्याच्या दिशेने ती वाटचाल करत आहे.आपल्या या पराक्रमी लेकीला आपण सारे जण ढिगभरून शुभेच्छा देऊ या !

# 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान मोदी – ट्रम्प यांच्यात संवाद नाही

## परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचा 'मध्यस्थी' झाली नसल्याचा दावा

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात २२ एप्रिल ते १७ जून दरम्यान कोणताही संवाद झाला नाही, असे सांगून परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी ट्रम्प यांच्या 'मध्यस्थी' दाव्याची हवा आज लोकसभेत चर्चेदरम्यान काढली.

'ऑपरेशन सिंदूर'वरील लोकसभेतील चर्चेत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी पहलगाम हल्ला, 'ऑपरेशन सिंदूर' आणि भारताचे परराष्ट्र धोरण यावर सरकारची भूमिका स्पष्ट केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित करण्यात मध्यस्थी केल्याचा दावा जयशंकर यांनी फेटाळून लावला. ते म्हणाले, युद्धबंदी आणि अमेरिकेचा व्यापाराचा मुद्दा हे दावे पूर्णपणे बिनबुडाचे आहेत. पहलगाम हल्ला झाल्यानंतर २२ एप्रिल रोजी अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांना सहानुभूती व्यक्त करण्यासाठी फोन केला आणि १७ जून रोजी जेव्हा त्यांनी कॅनडामध्ये पंतप्रधानांना फोन करून ते का भेटू शकले नाहीत, हे स्पष्ट केले. याव्यतिरिक्त मोदी आणि ट्रम्प यांच्यात कोणताही संवाद झाला नसल्याचे सांगून परराष्ट्रमंत्र्यांनी मध्यस्थीचा दावा करणारे ट्रम्प आणि सरकारला लक्ष्य करणारे विरोधक, यांच्या दाव्यांची हवाच काढली.



पहलगाम हल्ल्यानंतर भारताचा संयम संपला होता, असे परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, या हल्ल्याला उत्तर देताना फक्त सैनिकी पातळीवर नव्हे, तर राजनैतिक आणि कूटनीतिक पातळीवरही भारताने आपली ताकद दाखवली. २३ एप्रिल रोजी सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीची बैठक घेण्यात आली आणि त्यात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले. त्यात सिंधू जल करार तात्काळ स्थगित ठेवण्याचा निर्णय झाला. अटारी येथील एकत्रित तपासणी चौकी तत्काळ बंद करण्यात आली. पाकिस्तान उच्चायुक्तालयातील कर्मचारीसंख्याही ५५ वरून ३० वर आणली गेली.

भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या माध्यमातून पाकिस्तानच्या सीमेपार दहशतवादाचा इतिहास जागतिक समुदायासमोर मांडला. हा हल्ला केवळ पर्यटकांवर **पान 8 वर**

## ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही...

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली



ऑपरेशन सिंदूर हे यशस्वी झाले आहे, अशी माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी संसदेत दिली. तसेच हे ऑपरेशन अद्याप संपलेले नाही, असेही सिंह यांनी यावेळी सांगितले.

संसदेत ऑपरेशन सिंदूरवर बोलताना राजनाथ सिंह म्हणाले की, ठरवलेले सर्व उद्दिष्टे पूर्ण झाली होती म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर थांबवले, अशी माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले तसेच भारताने कोणाच्याही दबावामुळे ही कारवाई थांबवली नाही. या ऑपरेशनचा उद्देश पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळ नष्ट करणे हा होता. पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना आमच्या सैन्याने लक्ष्य केले. ऑपरेशन सिंदूरचा हेतू युद्ध छेडण्याचा नव्हता असेही सिंह म्हणाले.

10 मे रोजी भारतीय वायूदलाने पाकिस्तानच्या एअरफिल्डवर जोरदार हल्ला केला, तेव्हा पाकिस्तानने हार मानली आणि त्यांनी भारताच्या डीजीएमओला संपर्क करून ऑपरेशन थांबवण्याची विनंती केली. पण याचा अर्थ असा नव्हता की हे ऑपरेशन सिंदूर थांबवण्यात आले आहे. हा तर केवळ पॉज होता. जर पाकिस्तानकडून पुन्हा काही हालचाल झाली, तर ऑपरेशन पुन्हा सुरू होईल. ऑपरेशन सिंदूरमध्ये फक्त पाकिस्तानच्या सैन्याचा पराभव नाही झाला तर त्यांचे मनोबलही खच्ची झाले असेही सिंह म्हणाले.

## दहशतवादी पकडले जात नाहीत तोपर्यंत ऑपरेशन सिंदूर यशस्वी म्हणता येणार नाही

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली



लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर झालेल्या चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करताना म्हटले की, जोपर्यंत सर्व दहशतवादी पकडले जात नाही, तोपर्यंत हे ऑपरेशन यशस्वी म्हणता येणार नाही. त्यांनी दहशतवादाविरोधातील कारवाईत पारदर्शकतेची मागणी करताना शहीदांच्या कुटुंबांना न्याय मिळण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, असे आवाहन केले.

सुप्रिया सुळे यांनी भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांच्या काँग्रेसने गेल्या अनेक वर्षांत काहीच केले नाही, या विधानावर आक्षेप घेतला आणि म्हणाल्या की, "असे लोक चुकीची विधाने करतात आणि हे ऐकून दु:ख होते. ही तू-तू-मैं-मैं ची वेळ नाही." श्रद्धांजली वाहताना त्यांनी संतोष जगदाळे आणि अशोक गंगोटे यांचा विशेष उल्लेख केला. जेव्हा मी त्यांच्या कुटुंबांना भेटते, तेव्हा त्यांच्या मुलीने विचारले, माझ्या वडिलांना न्याय कधी मिळणार? त्यांनी शेवटी प्रश्न उपस्थित केला की, "दहशतवादी कधी आले, कसे गेले? याची उत्तरे सरकारकडे नाहीत, हे अजब आहे."

## सरकारने चर्चेच्या दिवसाची वाट पाहिली, दहशतवाद्यांना आधीच मारता आलं असतं...

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली



ऑपरेशन महादेवमध्ये संयुक्त कारवाईत एकूण तीन दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याची माहिती समोर आली आहे. दुसरीकडे संसदेतही पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेला आज सुरुवात झाली. मात्र ही चर्चा सुरु होण्याच्या दिवशीच या दहशतावाद्यांचा खात्मा करण्यात आल्याने समाजवादी पक्षाच्या खासदाराने शंका उपस्थित केली आहे.

सपा खासदार रामशंकर राजभर यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. देशाला ऑपरेशन सिंदूरची नाही तर 'ऑपरेशन तंदूर'ची आवश्यकता होती. या अंतर्गत दहशतवाद्यांना कठोर शिक्षा देऊन तंदूरमध्ये टाकले गेले असते, असं विधान रामशंकर राजभर यांनी केलं. पहलगाम हल्ल्यानंतर देशात प्रचंड संताप होता आणि जनतेला तीन दिवसांत दहशतवाद्यांवर कठोर कारवाई हवी होती. पण सरकारने १७ दिवसांनंतर कारवाई सुरू केली, असंही राजभर म्हणाले. तसेच पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेले दहशतवादी मारल्या गेलेल्या १०० दहशतवाद्यांमध्ये होते का? असाही सवाल राजभर यांनी केला.

## शिराळ्यात अटीशर्तीसह जिवंत नाग प्रदर्शनास 21 जणांना परवानगी

### नियमांचं उल्लंघन केल्यास कारवाई होणार

प्रतिनिधी
■ सांगली



शिराळ्यात शिक्षण व धर्मशिक्षणाच्या अनुषंगिक 21 जणांना जीवंत नाग प्रदर्शनास परवानगी देण्यात आली आहे. 21 अर्जदारांना नाग पकडण्यासाठी 27 ते 31 जुलै 2025 या कालावधीत अटी शर्तीस अधिन राहून परवानगी देण्यात आली आहे. शिराळा वनक्षेत्रातील 21 ग्रामस्थांनी अभ्यास करणेकामी नाग पकडणेसाठी मंजूरीबाबत विहित नमुन्यात परवानगीची मागणी केलेली होती. त्यानुसार पर्यावरण, वन मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून परवानगी देण्यात आली आहे.

शिराळ्याची नागपंचमीची परंपरा जिवंत नागांच्या पूजेसाठी प्रसिद्ध आहे. अखेर 21 जणांना जीवंत नाग प्रदर्शनास परवानगी देण्यात आली आहे. बत्तीस शिराळयाला जिवंत नागाची पूजा करण्याची प्रथा ही शेकडो वर्षांपासून आले.नागपंचमीच्या दिवशी जिवंत नागाची पूजा केली जायची आणि त्यांची मिरवणूक काढली जायची. पण प्राणी हक्क संघटनांच्या आक्षेपानंतर 2002 साली सर्वोच्च न्यायालयाने जिवंत नागाची पूजा बंद करण्याचे आदेश दिले आणि या प्रथेला खंड पडला होता.

## पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड हाशिम मुसासह 3 दहशतवादी ठार

### ऑपरेशन महादेव अंतर्गत कारवाई

■ श्रीनगर

ऑपरेशन महादेव अंतर्गत भारतीय सैन्याने सोमवारी श्रीनगरच्या लिडवास भागात लपलेल्या तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार मारले.

ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये पहलगाम हल्ल्यातील मुख्य आरोपी हाशिम मुसा देखील होता. वृत्तसंस्था पीटीआयनुसार, लष्कराच्या अधिकाऱ्यांनी पुष्टी केली आहे की मारला गेलेला दहशतवादी हाशिम मुसा होता. इतर दहशतवाद्यांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे लष्कराच्या प्रवक्त्याने सांगितले. उर्वरित दोन दहशतवाद्यांपैकी एकाचा २०२४ मध्ये सोनमर्ग बोगदा प्रकल्पावरील हल्ल्यात सहभाग असल्याचे सांगितले जात आहे.

दहशतवाद्यांकडून अमेरिकन एम४ कार्बाइन, एके-४७, १७ रायफल आणि ग्रेनेड जप्त करण्यात आले आहेत. लष्कराच्या म्हणण्यानुसार, सकाळी ११ वाजता गुप्तचर माहिती मिळाल्यानंतर लिडवासमध्ये शोध मोहीम सुरू करण्यात आली. यादरम्यान, दुरून दोनदा गोळीबाराचा आवाज ऐकू आला. या भागात सुरक्षा दलांची तैनाती वाढवण्यात आली आहे. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच दहशतवाद्यांनी चिनी अल्ट्रा कम्युनिकेशन सेट पुन्हा सक्रिय केला. तेव्हा सुरक्षा दलांना एका आठवड्यापूर्वी श्रीनगरच्या दाचीगाम जंगलात अतिरेकी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू केली. आज सकाळी ११:३० च्या सुमारास, २४ राष्ट्रीय रायफल्स आणि ४ पॅरा युनिटच्या सैनिकांच्या तुकडीने प्रगत उपकरणांचा वापर करून दहशतवाद्यांचे ठिकाण शोधून काढले आणि तिथे असलेल्या तिन्ही दहशतवाद्यांना टीपले.

## मराठमोळी दिव्या देशमुख नवी 'बुद्धिबळ क्वीन'

### अनुभवी कोनेरू हंपीला पराभूत करत विजेतेपद

वृत्तसंस्था
■ बटुमी

६४ चौकोनांवर गेली १४ वर्षे आपल्या बुद्धीचा दिव्य पराक्रम दाखवणाऱ्या दिव्या देशमुखने आपले नाव आज इतिहासात कोरले. १९ वर्षीय दिव्याने महाराष्ट्रालाच नव्हे तर भारतवासीयांना अभिमान वाटेल अशी कामगिरी करीत फिडे विश्वचषक महिला बुद्धिबळ स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम केला आहे. २०१३ मध्ये सर्वात कमी वयाची वुमन फिडे मास्टर (WFM) बनून सुरुवात केलेल्या दिव्याने, आता जॉर्जियातील बटुमी येथे सुरू असलेल्या वर्ल्ड कप स्पर्धेत अंतिम फेरीत विजय प्राप्त करत भारतासाठी नवा मैलाचा दगड ठरवला आहे. फिडे वुमेन्स वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय ठरली होती.तिने आपल्याच देशाच्या अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हंपीला टायब्रेक डावात पराभूत करीत जेतेपदासह ग्रँडमास्टर नॉर्मही पटकावला.

महिला वर्ल्ड कपमधील दुसऱ्याच प्रयत्नात दिव्याने भारतीय विक्रम नोंदवला आहे. १९ वर्षांची ही विश्व कनिष्ठ विजेती खेळाडू गेल्या ३४ वर्षांत महिला कॅन्डिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरणारी पहिली किशोरवयीन ठरली आहे. यासोबतच तिने आपला 'ग्रँडमास्टर' नॉर्म पूर्ण केला आहे आणि आता ती भारताची चौथी वुमन ग्रँडमास्टर झाली आहे. आजवर केवळ तीन भारतीय महिला – कोनेरू हंपी, हरिका द्रोणावल्ली आणि वैशाली रमेशबाबू यांना ग्रँडमास्टर पदवी मिळाली आहे.

**महाराष्ट्र सरकारतर्फे दिव्याचा सन्मान करू - मुख्यमंत्री**

***मुंबई-*** *मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिव्या देशमुखचे कौतुक केले. फडणवीस म्हणाले, किशोरवयीन पहिली खेळाडू आहे जीने ग्रँड मास्टरचा किताब मिळवला. अतिशय चांगली कामगिरी तिने केली आहे. 23 गोल्ड मेडल तिने जिंकले आहे. अतिशय होतकरू खेळाडू म्हणून आपण तिच्याकडे बघू शकतो. महाराष्ट्र सरकारतर्फे आम्ही तिचा मोठा सन्मान करू.*

## पोलिसांनीच कोकेन ठेवलं, 'दृश्यम' रंगवलं आणि व्हिडीओ केला व्हायरल

### पोलीस गोत्यात येणार- सरोदे

प्रतिनिधी
■ जळगाव



एकनाथ खडसेंचे जावई डॉ. प्रांजल खेवलकरांच्या अटकेप्रकरणी पोलिसांनी खासगी जीवन जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याचा दावा ॲड. असीम सरोदे यांनी आज केला. या प्रकरणी पोलिसांनी खासगी पार्टीला रेव्ह पार्टीचे स्वरुप दिले, कोकेनचा पुरावा प्लॅन्ट करुन त्या लोकांना समाजापुढे आरोपी असल्याचं चित्र उभं केल्याचा दावाही त्यांनी केला. हे प्रकरण उच्च न्यायालयात जाण्याची शक्यता असून पुणे पोलिसांची अडचण वाढणार असल्याचा दावा असीम सरोदे यांनी केला.

माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर आणि इतर सात जणांना पुणे पोलिसांनी रेव्ह पार्टी प्रकरणी अटक केली. या प्रकरणात पुणे पोलिसांनी राजकीय उद्देश ठेऊन दृश्यम चित्रपटाप्रमाणे खोटं चित्र रंगवल्याचा दावा असीम सरोदे यांनी केला. घरामध्ये दारू पिणे हा गुन्हा नाही, पण पोलिसांनी याला रेव्ह पार्टीचे स्वरुप दिल्याचं सरोदे म्हणाले.

सरोदे म्हणाले की, "विश्वास नांगरे हे पुण्याचे पोलीस अधीक्षक असताना त्यांनी एका रेव्ह पार्टीवर धाड टाकली होती. रेव्ह पार्टीमध्ये मोठ्या आवाजातील संगीत असतं, लोकांची मोठी संख्या असते. तसेच त्या ठिकाणचे लोक हे अत्यंत तोडक्या कपड्यांमध्ये असतात. या पार्टीत अफू, गांजा आणि **पान 8 वर**

## सत्ताधारी कलंकित, भ्रष्टाचारी मंत्र्यांना निलंबित करा

### ठाकरे सेनेची राज्यपालांकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

सत्ताधारी पक्षातील कलंकित, भ्रष्टाचारी व असंवेदनशील मंत्री व आमदार यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, यामागणीसाठी आज विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले.



मंत्रिमंडळातील अनेक मंत्र्यांच्या गैरव्यवहार आणि प्रकरणाबद्दल माहिती या पत्राद्वारे दिली. मंत्री संजय शिरसाठ, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे , राज्य मंत्री योगेश कदम तसेच मंत्री नितेश राणे यांच्या गंभीर प्रकरणाची वस्तुस्थिती स्थिती राज्यपाल यांच्यासमोर मांडली.

राज्यातील हनी ट्रॅप प्रकरण, ठाणे बोरिवली बोगदा प्रकरण, मीरा भाईंदर महापालिकेच्या भूसंपादन प्रक्रियेत गैरव्यवहार अशा अनेक प्रकरण संदर्भात राज्यपाल यांना पत्रातून अवगत करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना नेते अनिल परब, उपनेते विनोद घोसाळकर, बबनराव थोरात, अशोक धात्रक, विजय कदम, नितीन नांदगावकर, आमदार अनंत नर, महेश सावंत, मनोज जामसुतकर, मिलिंद नार्वेकर, नितीन देशमुख, विठ्ठलराव गायकवाड, भाऊ कोरगावकर, सुषमा अंधारे, सुप्रदा फातप्रेकर, शिवसेना उपनेत्या विशाखा राऊत, सचिव साईनाथ दुर्गे, पराग डाके, जो.ग. अभ्यंकर, उपस्थित होते.

# वडाळा येथील वह्या वाटप कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वडाळा येथे गरजु विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी आपले अनुभव विद्यार्थ्यांना शेअर केले. आम्ही नेहमीच शालेय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करत असतो त्याचाच एक भाग म्हणून या वर्षी आम्ही शालेय विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यापुढे देखील आम्ही विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणार असल्याची माहिती भाजपा वडाळा विधानसभा मंडळ अध्यक्ष संदीप पानसंडे यांनी दिली. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोंढा, आमदार प्रसाद लाड, आमदार कालिदास कोळंबकर, जिल्हाध्यक्ष निरज उभारे,माजी जिल्हाध्यक्ष राजेश शिरवाडकर उपस्थित होते.



## थोडक्यात

### ठाकूर संकुलात वैद्यकीय शिबीराचे आयोजन

**मुंबई:** ब्राह्मण सेवा संघ बोरिवली, मराठी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि ऊर्जा विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कांदिवली पूर्व येथील ठाकूर संकुल आणि परिसरातील सर्व नागरिकांकरिता वैद्यकीय शिबीर आज पार पडले. सकाळी साडेसात ते साडेअकरा वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिराला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. शिबिराला ब्राह्मण सेवा संघाचे आशिष वैद्य , मराठी सांस्कृतिक प्रतिष्ठानचे राजन रणदिवे व जितेन जाधव व ऊर्जा विकास फाउंडेशनच्या कविता जाधव उपस्थित होत्या.

### विद्यार्थ्यांसाठी घरे बांधणाऱ्यांना 15 टक्के चटईक्षेत्रफळ अधिमूल्य

**मुंबई :** राज्यातील शहरांमध्ये विद्यार्थ्यांना कमीतकमी भाड्यात निवास उपलब्ध व्हावा, यासाठी राज्य शासनाने गृहनिर्माण धोरणात अशी घरे बांधणाऱ्या विकासकांना सवलती देऊ केल्या आहेत. विद्यार्थ्यांसाठी भाडेतत्त्वावर घरे उपलब्ध करुन देणाऱ्या विकासकांना चटईक्षेत्रफळापोटी रेडी रेकनरच्या फक्त १५ टक्के अधिमूल्य आकारले जाणार आहे.राज्यात स्थलांतरित झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या या १६ लाख असून देशातील विविध राज्यात स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा अधिक आहे. मात्र या सर्व विद्यार्थ्यांना निवासाची सोय उपलब्ध नाही. यापैकी फक्त ४८ टक्के विद्यार्थ्यांना निवास उपलब्ध होतो. त्यामुळे राज्य शासनाने विद्यार्थ्यांसाठी गृहनिर्माण ही संकल्पना पहिल्यांदाच राबविण्याचे ठरविले आहे. मुंबईत ताडदेव येथे म्हाडाच्या मालकीच्या स्वतंत्र इमारतीत शहरातील विद्यार्थ्यांना आधुनिक, सुरक्षित व स्वयंपूर्ण निवास भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे.

### अभ्युदयनगरचा पुनर्विकास पुन्हा लांबणीवर

**मुंबई :** काळाचौकी येथील अभ्युदयनगर पुनर्विकासासाठी निविदा सादर करण्याची सोमवारी अंतिम मुदत असताना निविदा प्रक्रियेला दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाने निविदेला दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली असून आता इच्छुक कंपन्यांना ११ ऑगस्टपर्यंत निविदा सादर करता येणार आहेत. मुदतवाढीमुळे पुनर्विकास पुन्हा लांबणीवर पडला आहे.अंदाजे ३३ एकर जागेवरील अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीतील ४८ इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया २००० सालापासून सुरु आहे. मात्र अद्यापही प्रत्यक्ष पुनर्विकास मार्गी लागलेला नाही. २०१२ मध्ये या वसाहतीचा समूह पुनर्विकास हाती घेण्यात आला. मात्र काही कारणाने पुन्हा पुनर्विकास रखडला. शेवटी म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या माध्यमातून पुनर्विकास मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला.मोतीलाल नगरच्या धर्तीवर कन्स्ट्रक्शन अँड डेव्हल्पमेंट एजन्सी (सी अँड डी) ची अर्थात खासगी विकासकाची नियुक्ती करत पुनर्विकास मार्गी लावण्यासाठी ऑक्टोबर २०२४ मध्ये निविदा मागविण्यात आल्या आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# नायगाव पूर्वेत बेकायदा आठवडी बाजारांचा 'धुडगूस'

▸ आठवड्यातून सहा दिवस आठवडी बाजारांची गजबज ▸ बाहेरील फेरीवाल्यांचा सुळसुळाट; महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व परिसरात आठवड्यातून किमान सहा वेळा आठवडी बाजार भरत असल्याने त्याला स्थानिकांकडून विरोध वाढू लागला आहे. प्रशासकीय बाबू व राजकीय मंडळींच्या आश्रयावर सदरचे आठवडी बाजार नायगाव पूर्व भागात ठाण मांडत असून अस्वच्छतेचा बोजवारा या भागात वाढू लागला आहे. बाहेरील फेरीवाल्यांचा नायगाव पूर्व परिसरात सर्रास सुळसुळाट वाढला असून त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे. महापालिका प्रशासन संबंधित अनधिकृत आठवडी बाजारांवर विरोधात कार्यवाहीची भूमिका घेत नसल्याने अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. त्याबाबत स्थानिकांमध्ये असंतोषाची भावना वाढीस लागत चालली आहे.

नायगाव पूर्व परिसरात प्रामुख्याने परेरानगर, सनटेक, स्टारसिटी, जुचंद्र, वाकीपाडा व बापाणे या परिसरात आठवडी बाजारांचा सुळसुळाट वाढला आहे. यातील जुचंद्र व परेरा नगर हे बाजार वगळता इतर आठवडी बाजार अनधिकृत तत्त्वावर भरवले जात असून त्यातून राजकीय मंडळी व पालिका प्रशासनातील अधिकारी आर्थिकदृष्ट्या संधान बांधून आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मलई मिळत असल्याने या आठवडी बाजारांना हटवण्याची हिंमत पालिका अधिकारी व राजकीय मंडळींमध्ये उरलेली दिसून येत नाही. केवळ वरवर विरोध दर्शवणे व नागरिकांची सहानुभूती मिळवणे असे उपद्व्याप सुरू असून नागरिकांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. स्टार सिटी परिसरातील अनधिकृत आठवडी बाजाराला राजकीय आशीर्वाद असून त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक वसुली केल्या जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. परप्रांतीय फेरीवाले मोठ्या प्रमाणात वाढत असून आठवडी बाजारात आपल्या वस्तू विकून झाल्यावर कचरा तेथेच टाकून ते जात असल्याने येथे दुर्गंधी पसरत आहे. सध्या पावसाळ्यात त्याचा जास्तीत जास्त त्रास होऊन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे.



**अनधिकृत फेरीवाल्यांचा वसईकरांना ताप**

नायगाव पूर्व परिसरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहे. त्यात परप्रांतीय नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्याला आले आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे गुन्हेगारीचा दरही वाढला आहे. त्यातून पोटाची खळगी भरण्यासाठी फेरीवाल्यांचा सुळसुळाट वाढला आहे. हे फेरीवाले अनधिकृतपणे कुठेही बसवून त्याला आठवडी बाजारांचे स्वरूप देण्याचे काम राजकीय मंडळी व पालिका अधिकारी करू लागले आहेत. वालीव विभागाचे जबाबदार अधिकारी या भीषण समस्येकडे कानाडोळा करत असल्याने त्यांना लक्ष्मीदर्शन घडते असल्याचा संशय व्यक्त होत आहे. याबाबत नागरिकांमध्ये तीव्र भावना वाढीस लागल्या असून पालिकेने तात्काळ संबंधित अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# यंगस्टार्सच्या मंगळागौर स्पर्धेत घुमला मराठीचाच जयघोष

पर्यावरण, पाणी वाचवा, स्त्रीशक्ती, महिलांचे एकाकीपण, समानतेचा हक्क या मुद्द्यांचाही झाला उहापोह

प्रतिनिधी
■ विरार

महाराष्ट्रात मराठीचाच जयघोष, पर्यावरण, पाणी वाचवा, स्त्रीशक्ती, महिलांचे एकाकीपण, समानतेचा हक्क, असे विविध संदेश अतिशय चुरशीची ही स्पर्धा सकाळी ९.३० वा. सुरू झाली ते रात्री ९ वाजता संपली. यंगस्टार्सच्या माध्यमातून विरार ला महाराष्ट्रातील भव्यदिव्य पारंपरिक मंगळागौर स्पर्धेच्या २३ व्या वर्षात जवळ जवळ ५० संघांनी सहभाग नोंदवला.चिंचपोकळी, दिवा ठाणे, कांदिवली, बोरीवली, मालाड ,दादर, इथून संघ आले होते वसई विरार मधून मोठ्या प्रमाणात संघ सहभागी झाले

लोकनेते हितेंद्र ठाकूर व समन्वयक अजीव पाटील दरवर्षी मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करत असतात व आम्हा महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात त्याबद्दल आप्पांचे आभार व्यक्त करत महिलांनी स्पर्धेचा आनंद लुटला. विशेष म्हणजे कुणाचा नवरा तर कुणाची मुलं, मैत्रिणी व्हिडिओ शूटिंग काढायला आले होते. युवा नेतृत्व क्षितिज दादा ठाकूर यांनीही आपली उपस्थिती लावून महिलांशी संवाद साधला.दुपारी शिवकन्या ग्रुपने सादरीकरण केल्यानंतर हॉलमध्ये शिवाजी महाराजांच्या घोषणा झाल्या. महाराष्ट्र नाही कुणाच्या बापाचा ... महाराष्ट्र आमच्या मराठी माणसाचा.सुप सुप सुपली, घागर घुमू दे, कोंबडा, बाईपण भारी, अट्ठुश पान, ये गौरी ये, काच किरडा , बस फुगडी, भोवरा भेंडी. असे विविध प्रकार खेळत उपस्थितांनी आनंद घेतला.

दिवा ठाण्याच्या नवदुर्गा मंगळागौर ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला तर विरारच्या सक्षमीकरण महिला मंडळ यांनी दुसरा क्रमांक, सहयोगी ग्रुप घाटकोपर तृतीय क्रमांक, तर उत्तेजनार्थ नवरंग आणि सुवर्ण संघाला मिळाले विशेष बक्षिसे गौरीसखी, उपासना संघ, जेष्ठ नागरिक संघ यांना मिळाले. प्रत्येक संघाला रोख पारितोषिक सन्मान चिन्ह आणि पहिल्या तिन्ही क्रमांक असलेल्या प्रत्येक महिलेला पैठणी साडीने सन्मानित करण्यात आले.

जयेश पाटील व दिपाली दवणे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले तर प्रकाश वनमाळी ,माजी नगरसेवक हार्दिक राऊत, नगरसेविका, मीनल पाटील, चिरायू चौधरी, हेमांगी पाटील, ज्योती राऊत ,सरिता दुबे, झीनत शेख, ममता सुमन, प्रतिमा पाटील ,प्रतिभा पाटील सीमा पाटील , स्वाती जोशी, रिटा सरवैया, शुभांगी गायकवाड, कार्यक्रमाला उपस्थित लावली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुग्धा लेले, मिलिंद पोंक्षे, सुरेखा कुरकुरे, भूषण चुरी, मिलिंद पवार, तानाजी पाटील यांनी मेहनत घेतली.



**मुंबई:** शिवसेना पुरस्कृत शिवरत्न सेवा संघ आयोजित शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान व मोफत छत्र्यांचे वाटप कार्यक्रम आमदार सुनिल राऊत यांच्या मार्गदर्शन व सौजन्याने उत्साहात पार पडला. यावेळी बाबा कदम, सुधाकर पेडणेकर, शाखाप्रमुख रवि महाडिक, दिपक सावंत, सिध्दी जाधव, सुशिला मंचेकर, श्वेता पावसकर, महेश पाताडे, संदेश उपरकर, श्री. सडविलकर, विश्वास घाग, सुधीर आयरे, अभिषेक पवार, दिलीप पेडणेकर, लीना मांडलेकर इ. कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी शिवालये गजबजली

हजारो भाविकांच्या गर्दीत 'हर हर महादेव'चा गजर

प्रतिनिधी
■ वसई

श्रावण महिन्याला शुक्रवार दिनांक २५ जुलै पासून मोठ्या भक्ती भावाने सुरुवात झाली आहे. श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी वसईतील प्रसिद्ध शिवालयांत भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. हजारोंच्या संख्येने भाविक भक्तगण शिवालयांच्या मंदिरात दाखल होत असल्याने मंदिर व्यवस्थापनाने देखील चोख व्यवस्था ठेवली होती. तुंगारेश्वर महादेव पर्वतात तर सकाळपासून दुपारपर्यंत हजारो भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. 'हर हर महादेव' चा गजर करत हे भाविक भक्तगण तुंगारेश्वर पर्वताच्या दिशेने येत होते. तर श्रावणाचा पहिला सोमवार असल्याने अनेक शिवालयांत मोठी गर्दी झाल्याने पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता.

श्रावण महिना हा श्रद्धाळूंसाठी धार्मिक उपवासाचा तसेच भक्ती भावाचा महिना म्हणून हिंदू संस्कृतीत गणला जातो. त्यामुळे या महिन्याला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त होते. अनेक सण उत्सव याच महिन्यात येत असल्याने हा महिना मोठ्या श्रद्धेने पूजला जातो. दरम्यान, श्रावणाच्या दर सोमवारी भगवान महादेवांची पूजा करण्याचा प्रघात आहे. त्यामुळे शिवालयांत दर सोमवारी वसईतील व वसई बाहेरील हजारो भाविक भक्तगण दर्शनासाठी येत असतात. यंदा श्रावणाच्या पहिल्या सोमवारी भाविकांनी वसईतील अनेक शिवालयांत देवदर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

तुंगारेश्वर महादेव मंदिर, पारोळ येथील प्राचीन महादेव मंदिर, शिरवली येथील तानसेश्वर महादेव मंदिर, स्टारसिटी येथील महादेव मंदिर, चंद्रपाडा येथील महादेव मंदिर, बावखळ, निर्मळ येथील महादेव मंदिर, ईश्वरपुरी येथील महादेव मंदिर, सातीवली येथील महादेव मंदिर, पापडी येथील महादेव मंदिर, विरार येथील टेकडी पर्वतावरील भव्य महादेव मंदिर ही प्रसिद्ध शिवालये वसई तालुक्यात आहेत. या ठिकाणी श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी देवदर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. भाविकांची संख्या जास्त असल्याने पोलीस बंदोबस्त देखील तैनात ठेवण्यात आला होता. दरम्यान, 'हर हर महादेव' च्या गजरात श्रावणाचा पहिला सोमवार मोठ्या जल्लोषात साजरा झाला.



**मुंबई:** शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसैनिकांकडून घाटकोपर पूर्वेकडील राजावाडी विभागात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेनेचे राज्य सचिव सचिन भांगे,महाराष्ट्र संघटक प्रकाश वाणी,शाखासंघटक चंद्रकांत हळदणकर,सागर बनसोडे व इतर सदस्य उपस्थित होते.

# शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा 675वा संजीवन समाधी सोहळा मंगलमय वातावरणात संपन्न

प्रतिनिधी
■ जव्हार

दरवर्षी सालाबादप्रमाणे यंदाही मंगळवार,दि.२२ व बुधवार,२३ जुलै २०२५ रोजी प्रकाश चुंबळे महादेव आळी जव्हार येथील त्यांच्या निवासस्थानी समस्त शिंपी समाजौन्नती मंडळ,जव्हार यांच्या वतीने संतशिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळयाच्या निमित्ताने विविध स्वरूपातील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलें होते.यामध्ये जगन्नाथ धोंगडे शिंपी यांचे हस्ते सपत्नीक गोड शुभारंभ नामदेवराय व पांडुरंगांचे चरणीं श्रीफळ ठेवून व भगवंताचे पूजन करण्यांत आले. सपत्नीक चुंबळे परिवाराचे वतीने प्रथम तुळस व वीणा पूजन,झाले. लगेचच उपस्थित मान्यवर बंधू भगिनी समाज बांधवांकडून संत नामदेव महाराज....ज्ञानोबा तुकाराम नांवाने गजर करीत नाचत गाजत पालखी दिंडी काढण्यांत आली.



दिवसभर नामसंकीर्तन, सायंकाळी श्रीराम भजनी मंडळाचे व दुसरें दिवशी श्रीराम महिला भजनी मंडळाच्या वतीने सुश्राव्य संगीत भजन,कीर्तन, प्रवचन, झाले. नामदेवांचे महत् कार्य वारकरी सांप्रदायिकतेचा प्रचार प्रसार व नामदेव महाराजांच्या नावाने विविध ठिकाणी चालणाऱ्या अनेक शैक्षणिक उपक्रमांची यथोचित माहिती मा.प्राचार्य रोहन प्र. चुंबळें यांनी हायटेक व्हरचुअल (ओएचपी) पध्दतीने उपस्थितांसमोर माहितीपूर्ण विवेचन केले. लहानांपासून ते अगदी मोठ्या नामदेव भक्तांनी सांस्कृतिक कार्यक्रमांत आपला उत्तम सहभाग नोंदविला. यामध्ये विशेष म्हणजे आपला रोजचा प्रापंचिक प्रवास सांभाळून नामादेव महिला मंडळाचे गृहिनींनी अतिशय सुंदर व प्रेरणादायीं असा भगवंताचे चरणीं आपला सेवाभाव अर्पण करीत सामूहिकपणे सुंदर नृत्याविष्कार सादर केला. समाजातील विविधांगी विषयांत यशस्वी व पारंगत असलेल्या गुणवंतांचा...कलावंतांचा कौतुक सोहळा त्याअनुषंगाने उपस्थित मान्यवरांचे शुभहस्ते विशेष गुणगौरव,सत्कार प्रशस्ती प्रमाणपत्र वाटप करुन झाला. अध्यात्मिक,सांस्कृतिक शैक्षणिक, संतग्रंथसाहित्य, समकालीन संत साहित्य वाङ्मय, तसेच शिंपी समाज व राजे यशवंत सार्वजनिक वाचनालय यांचे संयुक्त विद्यमाने ग्रंथालयातील ग्रंथप्रदर्शन दालन निर्मिती करण्यांत आली होती. बाळ गोपाळ व श्री नामदेव महिला भगिनींचा उत्साह ओसंडून वाहत होता.सदर कार्यक्रमास अनेक हितचिंतक व मान्यवर मंडळींनी आपलीं हजेरी लावलीं. कार्यक्रमा नंतर सर्व उपस्थितांनी महाप्रसाद,स्नेह भोजनाचा लाभ घेतला.सुत्रसंचालन साईनाथ बेदडे यांनी तर आभारप्रदर्शन गौरव शिंपी यांनी तसेच व चुंबळे, डिंगोरे ,मेतकर व वाघ बंधू यांच्या द्वारां नामदेवा्च्या आरती व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता आली. पुढील वर्षी देखील समस्त शिंपी बांधवांनी व हितचिंतकांनी असेच मनापासून सहकार्य करावे असे आवाहन समस्त शिंपी समाजौन्नती मंडळ जव्हारच्या वतीने प्रकाश चुंबळे यांनी केले आहे.

# 10 वर्षांची गॅरंटी पण महामार्ग वर्षभरातच फुटला!

६२१ कोटींचा ठेका, ठेकेदाराने लावला चुना

प्रतिनिधी
■ वसई

वाहतुकीचा कणा मानला जाणारा मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग 'व्हाईट टॉपिंग' काँक्रिटकरणाद्वारे मजबूत केला जाणार होता. या महामार्गासाठी तब्बल ६२१ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. १० वर्षे टिकेल अशी हमी दिली गेली. मात्र, केवळ एका वर्षातच महामार्गावर खड्ड्यांची मालिका दिसू लागल्याने प्रवाशांमध्ये संतापाचा भडका उडाला आहे.

सिमेंट काँक्रिटने तयार करण्यात आलेल्या या महामार्गावर पावसात ठिकठिकाणी दुभंगलेले रस्ते, खड्डे आणि उखडलेले पट्टे पाहायला मिळत आहेत. यामुळे महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती वाहतूकदारांनी व्यक्त केली आहे. यासोबतच दिशादर्शक फलक, गतीमर्यादा, रस्ता पट्टे, स्पीड ब्रेकर यांसारख्या मूलभूत सुविधा देखील गाळण्यात आल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.हा संपूर्ण प्रकल्प केंद्रीय अवजड वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून हाती घेण्यात आला होता. तलासरी ते दहिसर दरम्यान १२१ किलोमीटर अंतराचे सिमेंट काँक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले होते.



मात्र निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून केलेल्या कामामुळे आज संपूर्ण महामार्ग वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे.दोनशे कोटींचे काम असते तिथे सहाशे कोटी खर्च केले गेले, तरी रस्ता उखडतो कसा?,असा संतप्त सवाल नागरिक आणि वाहनचालक विचारत आहेत.प्रवाशांच्या सुरक्षेसोबत थट्टा करणाऱ्या ठेकेदारावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**LOST & FOUND**

I, the Secretary of Man Exellence Premises Co-op. Soc. Ltd., Opp. Pawan Hans, S.V.Road, Ville Parle (W), Mumbai-400056 have Lost my Original Bye-Laws book. Online Complaint No.69938/2025 dated 28.07.2025 is made at Ville Parle Police Station. Anyone who finds it is requested to return it within 15 days from the date of publication of this notice.

**Mr.Suresh (Manager)**
**9702696200**

**Public Notice**

Late Smt Geeta Yashwant Parab member of The Mithanagar Shri Chintamani Co-operative Housing Society Ltd. having address at B 701 Mahatma Gandhi Road, Goregaon West, Mumbai 400104 and was holding Flat No B 701 of the building of the Society, Mr. Nandkishor Yashwant Parab has reported to the Society that the Original Share Certificate bearing No. 48 for 10 (Ten) Shares bearing Nos. From 471 to 480 has been lost/misplaced and application has been made for duplicate Share Certificate.

The Society hereby invites claims and objections from claimants/objector or objectors for issuance of duplicate Share Certificate within the period of 14 (fourteen) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for issuance of duplicate Share Certificate to the Secretary of The Mithanagar Shri Chintamani Co-operative Housing Society Ltd, at M. G. Road, Goregaon West, Mumbai 400104, if no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to issue duplicate Share Certificate in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society.

Sd/
Place: Mumbai
Date: 28/07/2025
For Mithanagar Shri Chintamani Co-op Housing Society Ltd.

वकील - राहुल त्रिपाठी

**मिरा-भाईंदर येथील मा. श्री. ए.डी. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात**

**जाहीर नोटीस**

दि.चौ.अर्ज : १०१/२०२५
निशानी क. :६
पुढील तारीख : ०९/१०/२०२५

**१. श्रीमती शशिकला जगन्नाथ राऊत**
**२. श्री संजय जगन्नाथ राऊत**
वरील क्रमांक १ व २ हे दोघेही रहिवासी – ए/७०४, राइट गॅलेक्सी, सोडावाला लेन, बोरिवली पश्चिम, मुंबई – ४०० ०९२
**३. श्रीमती संगीता संतोष पाटील**
रहिवासी – ७०१, न्यू एकता सी.एच.एस.एल., फ.प.-२४५, बाभई नाका रोड क्रमांक ५१, राम मंदिर रोड जवळ, टी.पी.एस. – ३, बोरिवली पश्चिम, मुंबई – ४०० ०९१ ...अर्जदार

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...गैरअर्जदार

ज्यापेक्षा कै.जगन्नाथ हरिश्चंद्र राऊत हे दिनांक ०५ माहे फेब्रुवारी २०२४ रोजी मौजे ए/७०४, राइट गॅलेक्सी, सोडावाला लेन, बोरिवली पश्चिम, मुंबई – ४०० ०९२ येथे स्वर्गवासी झाले.कै.जगन्नाथ हरिश्चंद्र राऊत यांची अर्जदार क. १ ही पत्नी आहे तसेच अर्जदार क. २ हा मुलगा असुन अर्जदार क. ३ ही मुलगी आहे. कै.जगन्नाथ हरिश्चंद्र राऊत यांचे अर्जदार वारस असल्यामुळे अर्जदार यांनी शासकीय कामाकरीता वारसाचे सर्टिफिकेट मिळणेकामी अर्ज केला आहे. त्यापेक्षा उक्त अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून एक महिण्याचे आत किंवा दि. ०९/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजता त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या. या जाहीर नोटीस वरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार व गैरअर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.जगन्नाथ हरिश्चंद्र राऊत यांचे कायदेशीर वारसाचे सर्टिफिकेट देईल.

आज दिनांक २२ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
सहायक अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर
मिरा-भाईंदर

शिक्का

१.मुळप्रत २. दुय्यम प्रत तहसीलदार
३. न्यायालयाचे नोटीस बोर्ड

**विकास को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड**
(नोंदणी क्र:- बी.ओ.एम्./डब्ल्यु.एम्./आर.एस.आर./सी.आर./९८८ सन १९८७)
पत्ता : शॉप नं. ७, मुस्ताक चाळ, दुर्गा सोसायटी समोर, बाळ गोपाळ मित्र मंडळ जवळ, सुंदरबाग लेन, कुर्ला (प), मुंबई - ४०० ०७२.

**सभेची नोटीस**

**विकास को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड** च्या सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **"एकोणचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा"** गुरुवार दि. १४-०८-२०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता, संस्थेचे **अध्यक्ष श्री. संजय बाळासाहेब गरुड** यांचे अध्यक्षतेखाली, तुळुनाडा सेवा संघ हॉल, न्यू साठे चाळ, काजुपाडा, कुर्ला, मुंबई-४०००७२. येथे खालील कामकाजाचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी आपण या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**सभेपुढील विषय**

१. दि. १४/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.३१/०३/२०२५ अखेरच्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला, संस्थेच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके स्विकारणे व त्यास मान्यता देणे.
३. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल वाचून मंजूर करणे.
४. सन २०२४-२०२५ या अहवाल सालातील नफा विभाजनास मंजूरी देणे.
५. सन ३१/०३/२०२५ अखेर संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचा तपशील सादर करणे.
६. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
७. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरवणे.
८. सन २०२५-२०२६ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
९. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१०. दोष दुरुस्ती अहवाल वाचन करुन नोंद घेणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : मुंबई
दि. २९/०७/२०२५

संचालक मंडळाच्या वतीने
**श्री. अमित उत्तम चंदनशिवे**
कार्यलक्षी संचालक

**विशेष सूचना :**
१. गणसंख्येअभावी तहकूब झालेली सभा नियमाप्रमाणे त्याचदिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल. त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांना वरील पत्रिकेतील विषया संदर्भात प्रश्न किंवा माहिती विचारावयाची असेल यांनी तसे लेखीपत्र दि. ११/०८/२०२५ रोजी पर्यंत संस्थेचे कार्यालयीन वेळेत पाठवावे.
३. सभासदांना ताळेबंद व तोटा पत्रक संस्थेच्या कार्यालयात कामकाजाचे दिवशी सकाळी ९.३० ते सायं. ६.३० यावेळेत पाहावयास मिळेल.
४. ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी ताबडतोब वारसाची नोंद करुन घ्यावी.
५. सभासदांनी सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ चा लाभांश कार्यालयीन वेळेत घेणेत यावा.
६. सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस येताना अहवाल प्रत घेऊन यावे.
७. सभासदांनी आपले पॅन कार्ड व आधार कार्ड छायाप्रत देऊन KYC पूर्ण करणेत यावी.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 39
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक **- दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक **- शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ३९
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

# खडसेंनी मला खूप छळले, पण खेवलकरांच्या अटकेला राजकीय वास...

**प्रतिनिधी**

■ मुंबई

एकनाथ खडसेंविरुद्ध मला किती तिटकारा आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. त्यांनी मला छळ छळ छळलं आहे. पण जे योग्य आहे, ते योग्य आणि जे चुकीचे आहे, ते चुकीचे, असे सांगणारा माझा स्वभाव आहे. आताच्या घटकेला डॉ. प्रांजल खेवलकर यांच्या अटकेच्या प्रकरणाला मला राजकीय वास येतो. कारण जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या विरोधात गेली चार ते पाच दिवस खडसे पत्रकार परिषदा घेत होते. त्यामुळे एकनाथ खडसे आणि रोहिणी खडसे यांना गप्प करण्यासाठी हे कटकारस्थान आहे की काय, अशी शंका येते, असा संशय सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी याप्रकरणी व्यक्त केला.

## सामाजिक कार्यकर्ता अंजली दमानिया यांची स्पस्टोक्ती



अंजली दमानिया म्हणाल्या, ससून रुग्णालयाचा वैद्यकीय अहवाल मी अजून वाचलेला नाही. त्यात फक्त मद्यपान आहे की ड्रग्जपण आहे, हे मला माहिती नाही, त्यामुळे त्यावर मी बोलणार नाही. पण, त्यांनी ड्रग्जचं सेवन केले असेल तर त्यांना शिक्षा झाली पाहिजे.

योगेश कदम यांच्या पाठीशी उभे राहण्याची ग्वाही देणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही दमानिया यांनी सुनावले. त्या म्हणाल्या, जे उपमुख्यमंत्री पूर्वी डान्सबारच्या विरोधात लढायचे, त्याच उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्याच पक्षाच्या योगेश कदमांची पाठराखण केली, हे दुर्दैवी आहे. त्यांनी स्वतः जाऊन तो सावली बार बंद करणे गरजेचे होते. त्या बारचे व्हिडिओही त्यांनी बघितले असतील. पण, ते अशा गोष्टींचे समर्थन करत आहेत, यातून स्पष्ट दिसते की त्यांना डान्सबार चालू ठेवायचा आहे.

### पुण्यातील पार्टी प्रकरणी एकाचेच नाव जाहीर का ?

पोलिसांच्या नाकाखाली ह्या गोष्टी होत असतात, पण पोलिस कुठेही कारवाई करताना दिसत नाहीत. पण, अचानकपणे एका घरी जाऊन त्याला रेव्ह पार्टीचे (शेकडो माणसं मोठ्या म्युझिकवर नाचत असतात, त्यात दारू आणि ड्रग्ज असेल तर त्याला ड्रग्ज पार्टी असे म्हणतात) नाव देऊन मीडियात सोडलं गेलं. त्यामुळे याला रेव्ह पार्टी म्हणता येईल का नाही, असा प्रश्न आहे.पुण्यातील पार्टी प्रकरणी अनेक व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. मात्र, एकाच व्यक्तीचे नाव बाहेर दिलं गेलं. त्यामुळे डॉ. प्रांजल खेवलकर यांच्या अटकेमागे राजकारणाचा वास येतो आहे. सध्या महाराष्ट्राचं राजकारण अत्यंत किळसवाणं झालं आहे, असंही त्या म्हणाल्या.

# समुद्राचे पाणी गोडे करण्यासाठी आता वर्सोवा येथे नवीन 'प्लँट'

## महापालिकेने सुरु केली निविदा प्रक्रिया

**प्रतिनिधी**

■ मुंबई

मुंबई महापालिकेने पिण्याच्या पाण्याची तहान भागविण्यासाठी मुंबई शहराला लागून असलेल्या समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा संकल्प गेल्या काही वर्षापासून सोडला आहे. त्यासाठी महापालिकेने मनोरी येथे २०० दशलक्ष लिटर क्षमतेचा पहिला प्लांट टाकण्यासाठी प्रयत्न केले. मात्र हा प्रकल्प गेल्या १८ महिन्यांपासून विविध कारणास्तव रखडला आहे. आता मात्र महापालिकेने वर्सोवा येथे २०० दशलक्ष लिटर क्षमतेचा दुसरा प्लांट टाकण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी पालिकेने टेंडर प्रक्रिया सुरू केली आहे.

मनोरी येथील प्लॅंटला काही कारणास्तव उशीर होत असला तरी पालिकेने वर्सोवा येथे दुसरा प्रकल्प उभारण्याची योजना आखली आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित होण्यास काहीसा वेळ लागणार आहे. वर्सोवा प्रकल्प हा खासगी गुंतवणूक आणि कौशल्याचा वापर करून महापालिकेवरील आर्थिक भार कमी करेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. जर हे मनोरी आणि वर्सोवा हे दोन्ही प्लॅंट आगामी काळात कार्यान्वित झाल्यास मुंबईकरांना मुंबईतल्या मुंबईत थोडे खर्चिक पण समुद्राचे पाणी पिण्यासाठी सुद्धा उपयोगात आणणे शक्य होणार आहे. त्यामुळे मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

मुंबईची वाढती लोकसंख्या पाहता सध्या किमान ५ हजार दशलक्ष लिटर इतक्या पाण्याची गरज आहे. मात्र मुंबईला अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात तलावांमधून दररोज ३,९५० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यातही दररोज होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील ३४ टक्के पाणी चोरी आणि गळती यांपोटी वाया जाते. त्यामुळे मुंबईकरांना पाण्याची कमतरता भासते. त्यासाठी गारगाई, पिंजाळ, दमणगंगा हे धरण प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून प्रस्तावित आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेने मनोरी येथे समुद्राचे खारे पाणी गोडे करण्यासाठी नवीन प्लॅंट उभारण्याची योजना आखली. समुद्राचे खारे पाणी प्रक्रिया करून गोडे करण्यासाठी मनोरी येथील प्रस्तावित प्रकल्पाच्या उभारणीसाठी महापालिकेला ३ हजार ५२० कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. मात्र हा प्रकल्प उभारण्यासाठी चार वर्षांचा कालावधी लागणार आहे. हा प्रकल्प खासगी कंपनीच्या मार्फत कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यासाठी पालिकेने टेंडर प्रक्रियासुद्धा राबवली. मात्र काही त्रुटी निघाल्याने आणि इतर कारणामुळे गेल्या १८ महिन्यांपासून सदर प्रकल्प रखडला आहे. मध्यंतरी टेंडर प्रक्रिया रद्द करावी लागली होती. त्यामुळे अद्यापही मनोरी येथील प्रकल्पाला अपेक्षित प्रतिसाद न लाभल्याने तो रखडला आहे.

समुद्राच्या पाण्यावर प्रक्रिया करून पहिल्या टप्प्यात दररोज २०० दशलक्ष लिटर गोडे पाणी मुंबईकराना मिळणार आहे. नंतर दुसऱ्या टप्प्यातही हीच क्षमता वाढवून ४०० दशलक्ष लीटर पाणी यातून मुंबईकरांना मिळेल. मुंबईतील हा पहिलाच प्रकल्प असून ज्यामध्ये अक्षय ऊर्जा वापरली जाणार आहे. सदर प्रकल्प चार वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पासाठी सल्लागार नेमून त्याचा अभ्यास अहवालही तयार करण्यात आला आहे. मात्र टेंडर प्रक्रियेत अडचणी येत असल्याने हा प्रकल्प मार्गी लागू शकलेला नाही. प्रकल्पांतर्गत पाणी आणण्यासाठी आणि पाणी सोडण्यासाठी समुद्रात दोन किमी लांबीचे दोन बोगदे बांधावे लागणार आहेत.

पात्र कंत्राटदाराने सदर प्रकल्पाचा आराखडा तयार करणे, बांधणी करणे, अभियांत्रिकी कामे करणे आवश्यक आहेत. तसेच, पुढील २० वर्षे कंत्राटदाराने प्रकल्पाची देखभाल करणे आवश्यक असणार आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेने पश्चिम उपनगरातील वर्सोवा येथे दुसऱ्या प्लॅंटसाठी स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय) मागवल्या आहेत. वर्सोवा किनारपट्टीवरील प्रस्तावित प्लॅंटची क्षमता दररोज २०० दशलक्ष लिटर (एमएलडी) असेल आणि तो डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट आणि ट्रान्सफर (डीबीएफओटी) आधारावर विकसित केला जाईल.

# आज एशियाटिक बिग कॅट सोसायटीचा 'राष्ट्रीय पुरस्कार'वितरण सोहळा



**मुंबई:** एशियाटिक बिग कॅट सोसायटी आणि वन्यजीव शाखा, वन विभाग, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, वन्यजीव संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी दिला जाणारा पहिला राष्ट्रीय पुरस्कार प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय चित्रपट निर्माता, दिग्दर्शक आणि सिनेमॅटोग्राफर सुब्बिया नल्लामुथु यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त उद्या मंगळवार, २९ जुलै २०२५ रोजी २ वाजता मुंबई येथे होणा-या या पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुब्बिया नल्लामुथु यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल आहे. या कार्यक्रमात 'वाइल्ड ताडोबा' या माहितीपटाच्या ट्रेलरचा जागतिक प्रीमियर देखील सादर केला जाणार आहे.

# बेस्ट बसची डिव्हायडरला घडक

**मुंबई:** शनिवारी 26/07/2025 रोजी बस मार्ग 116 /32 बस चालक ०२१२५४ सीएसएमटी कडून गेट वे ऑफ इंडिया कडे सदर बस क्रमांक ६७०१ ,रिकामी जात असताना, स्वामी दयानंद सरस्वती चौक येथे डिव्हायडर ला धडकून पुढील बाजूचे बंपर चे नुकसान झाले, तसेच पुढील काच फुटलेलि आहे व मडगार्डचे नुकसान झालेले आहे. सदर गाडीमध्ये कोणीही पॅसेंजर नव्हते. सदर घटना ही २०.२५ वाजता घडली.सचालकाच्या निवेदनावरून अज्ञात मोटार सायकल स्वाराच्या विरुद्ध नोंदविण्यात आली आहे. सदर बसगाडी गेटवे ऑफ इंडिया कडे जात असताना बसगाडीच्या समोर अचानकपणे एक मोटार सायकल स्वार आल्याने त्याला वाचविण्याकरिता बस चालकाने जोरात ब्रेक घेतल्याने बसगाडी स्लिप होऊन उजव्या बाजूच्या रस्ता दुभाजकावर धडकली.घटनेतील मोटार सायकल स्वार न थांबता निघून गेला. सदर अपघातात कोणालाही इजा झाली नाही.

# मुंबईतील 20 ठिकाणे होणार फेरीवालामुक्त

**मुंबई:** शहर तसेच उपनगरातील पदपथ आणि अन्य सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेने कंबर कसली असून लवकरच फेरीवालामुक्त परिसर मोहिमेची अंमलबजावणी अधिक तीव्र करण्यात येणार आहे. महानगरपालिकेने उच्च न्यायालयात फेरीवाल्यांच्या गर्दीने व्यापलेल्या २० ठिकाणांची यादी सादर केली होती. त्यानुसार आता संबंधित ठिकाणे फेरीवालामुक्त करण्याचे नियोजन पालिकेने केले आहे. सीएसएमटी, कुलाबा कॉजवे, वांद्र्यातील लिंकिंग रोड, हिल रॉड, दादर अंधेरी, मालाड, घाटकोपर रेल्वे स्थानकांसह अन्य ठिकाणांचा समावेश आहे.रस्ते आणि पदपथांवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांची समस्या दिवसेंदिवस उग्र होत आहे. मुंबईकरांना पदपथ आणि रस्त्यांवरून ये – जा करताना अडथळा ठरणाऱ्या, तसेच उघड्यावर अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात महानगरपालिका सातत्याने कारवाई करत असते. मात्र, तरीही फेरीवाल्यांची समस्या मार्गी लावण्यात पालिकेला यश आलेले नाही. पदपथांवर पथाऱ्या पसरून फेरीवाले कारवाईची चिंता न करता राजरोसपणे व्यवसाय करत आहेत. फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडीचीही समस्या जटील होत असून अनेक वेळा प्रवासी व फेरीवाल्यांमध्ये शाब्दिक वाद होतात. तसेच, अनेकदा वाद, मारामारी झाल्याचेही यापूर्वी समोर आले आहे.



**मुंबई:**घाटकोपर पूर्व येथील श्री लक्ष्मीनारायण बाल गणेश मित्र मंडळ तर्फे आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव 2025 साजरा करण्यात येत आहे. घाटकोपरच्या राजाचे मुंबई उपनगर आणि घाटकोपरमधील सर्वात पहिला भव्य दिव्य आगमन सोहळा वाजत गाजत पार पडला आहे. श्री लक्ष्मीनारायण बाल गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष धर्मेश भाई भूपत गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी मोठ्या थाटात घाटकोपरच्या राजाचे आगमन सोहळा पार पाडण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने मंडळाचे सर्व सदस्य आणि गणेश भक्तांच्या उपस्थिती मध्ये घाटकोपरच्या राजाचे आगमन झाले.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

एम एम आर डी ए MMRDA

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

५ वा मजला, अभियांत्रिकी विभाग, प्लॉट क्र. आर-५, आर-६, आर-१२, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१, दुरध्वनी क्र. २६५९-४०४९/५९९६/५९९५, फॅक्स – २६५९४१७९

वेबसाईट : https://mahatenders.gov.in nicgep/app

### ई-निविदा सूचना

**कामाचे स्वरूप:** बाह्य रस्ते विकास योजनेअंतर्गंत अलिबाग क्षेत्रातील खालील रस्त्याचे सिमेंट काँक्रीट बांधकाम करणे (टप्पा-४): १.रॉयल मोटार ट्रेनिंग स्कूल विद्यानगर ते स्वामी समर्थ मठ रस्ता तयार करणे. २.कुरूळ नवीन वसाहत ते वेश्वी गावापर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. ३. बुरूमखान नाका ते वरसोली ते विठ्ठल मंदिर ते विद्यानगर बस थांबा पर्यंतचा रस्ता संरक्षण भिंती, गटार व साकवसह तयार करणे, ता. अलिबाग.

| अ. क्र. | कामाची अंदाजित रक्कम (रू.) | कोऱ्या ई-निविदांची किंमत (रू) | इसारा रक्कम (रु.) | सुरक्षा ठेव (रु.) | ई-निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तारीख/वेळ | तारीख/वेळ | | |
| १ | ५४,९१,१५,८२२/- (वस्तू व सेवा कर वगळून) | रु.३,५४०/- (नापरतावा) | २७,५०, ०००/- | ५५,००, ०००/- | ०१/०८/२०२५ (११:०० वा) | २१/०८/२०२५ (१८:०० वा) | २२/०८/२०२५ (१६:०० वा) | बांधकाम कालावधी १८ महिने (पर्यावरण व इतर मंजूरी आणि पावसाळ्याच्या कालावधीसह) ६० महिने दोष दायित्व कालावधी (DLP) |

**• ई-निविदा पूर्व बैठक दि. ०८/०८/२०२५ रोजी १५:०० वाजता • निविदा उघडण्याची तारीख: दि. २५/०८/२०२५ (१२ वाजता)**

**टिप:-** ई-निविदा प्रपत्रे, शुध्दीपत्रके व इतर माहिती **https://mahatenders.gov.in/nicgep/app** या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येतील. ई -निविदे संबंधीत सविस्तर माहिती आणि मदतीसाठी **support-eproc@nic.in** या ई- मेल किंवा दुरध्वनी क्र. **०१२०-४००१ ००२/ ०१२०-४००१ ००५** येथे संपर्क साधावा. तसेच श्री. रा. शां. देवरे, पदनाम कार्यकारी अभियंता यांच्याशी संबंधित जाहिरातीकरीता आवश्यकता असल्यास **०२२-२६५९५९३२** या दुरध्वनीवर किंवा मेल आयडी: **rajendra.deore@mailmmrda.maharashtra.gov.in** वर संपर्क साधावा.

**दिनांक: २९/०७/२०२५**
**ठिकाण : मुंबई**
**क्र. अवि/ बारवियो/अलिबाग/२०२५**

सही/-
**(रा.शां. देवरे)**
**कार्यकारी अभियंता, आभियांत्रिकी विभाग**

## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### ई- निविदा सुचना

कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई - ३३ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते व महानगर पालिका यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडुन खालील कामाच्या मोहरबंद बी - १ (टक्केवारी नमुन्यात) ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामगार सहकारी संस्थेचा नोंदणी वर्ग | निविदा रक्कम (१२% GST सहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | इमारत क्र. ७९६बी - ७९६सी, हैंन्स रोड, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. ( मंडळ निधीचे काम) (2nd Call) | ३४,६३,९०२/- | ३४,६३९/- | ७०,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-५ व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | जाहिरात दिनांक | ३०/०७/२०२५ सकाळी १०:०० वाजता |
| २ | निविदा विक्री सुरू | ३०/०७/२०२५ सकाळी १०:०५ वाजता |
| 3 | निविदा विक्री बंद | ०६/०८/२०२५ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत |
| ४ | निविदा स्विकृती सुरू | ३०/०७/२०२५ सकाळी १०:०५ वाजता |
| ५ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | ०६/०८/२०२५ सायंकाळी १७:३५ वाजेपर्यंत |
| ६ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०८/०८/२०२५ सकाळी ११:०० वाजता |
| ७ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०८/०८/२०२५ सकाळी ११:०० वाजता |

१)संपूर्ण निविदा पध्दती ही ऑनलाईन स्वरूपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्थी http://mahatenders.gov.in म्हाडाच्या MHADA Website-http://mhada.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द केल्या जातील.
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि. ३०/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०५ नंतर ते ०६/०८/२०२५ सायंकाळी १७:३५ वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम तसेच इसारा रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक ०८/०८/२०२५ सकाळी ११:०० वाजता व आर्थिक बोली उघण्याचा दिनांक ०८/०८/२०२५ सकाळी ११:०० वाजता कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३, यांचे दालनात उघडल्या जातील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोली मध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉर्मेट मध्ये तांत्रिक बोलील्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग II / III मान्यताप्राप्त प्राधिकारणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, यांचेकडे (निविदा स्विकृती अधिकाऱ्यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) इच्छुक बोलीदारांना शासनाच्या ठराव क्र. सीएटी - ०१ /२०१५/प्र.क. २०/ इमा-२, दि. २४/०४/२०१५ चे पालन करणे आवश्यक राहील.
१०) निविदाकारांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे
११) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अमानत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अमानत बाबत सविस्तर सुचना पहावी
१२) जीएसटी शिवाय SSR दर वर्ष २०२० - २१ वर आधारित निविदा मागवली आहे. स्विकृत करार मुल्यावर जीएसटी भरला जाईल.
१३) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सुचना http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करता येतील. मदतीसाठी : १८०० ३०७०-२२३२ Mail- eproc.support@maharashtra.gov.in

CPRO/A/612

सही/-
**कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था   Follow us : mhadaofficial

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, ४१०२०६.
दुरध्वनी कार्यालय ०२२ – २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ - २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र/प.महा/पर्या./२८२५/प्र.क्र.०७/२३०/२०२५   दिनांक :- २८/०७/२०२५

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत Fully Built Fog Cannon with Auxiliary Cummins Engine mounted on suitable Truck Chassis Diesel Engine with 02 Year Warranty +05 year (AMC) and Operation for 07 Years with Providing Driver and Technical Operator for PANVEL MUNICIPAL CORPORATION . या कामाकरिता आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | दर (GST व सर्व प्रचलित शासकीय कर शुल्कासहित) (For 01 Vehicle) |
|---|---|---|
| | Fully Built Fog Cannon with Auxiliary Cummins Engine mounted on suitable Truck Chassis Diesel Engine with 02 Year Warranty +05 year (AMC ) and Operation for 07 Years with Providing Driver and Technical Operator for PANVEL MUNICIPAL CORPORATION. (Fully Built Fog Cannon 01. Vehicle ) ( खालील नमूद जोडपत्र १ मधील तांत्रिक तपशीलाप्रमाणे) | |
| I) | Quotation for the fabrication, Supply and Installation of Fog Cannon with 02 Year Warranty | |
| II) | Comprehensive Annual Maintenance from 3 rd year to 07 th year (Total 05 Years ) | |
| III) | Operation with Driver and Technical Operator For 07 Years | |
| | Total Amount I+II+III = | |

सदरची दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात दि. १२/०८/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागात सादर करावीत.

- सदरची दरपत्रके केवळ आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता मागविण्यात येत आहेत.
- कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
- उशिरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.३६३/३७३/२०२५
दिनांक :- २८/०७/२०२५

संदर्भ :- जा.क्र. पमपा/पर्या/३९२५/प्र.क्र.१०/२३१/२०२५
दिनांक :- २८/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये.

सही/-
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

### जोडपत्र - १ तांत्रिक तपशील

Fully Built Fog Cannon with Auxiliary Cummins Engine mounted on suitable Truck Chassis Diesel Engine with 02 Year Warranty +05 year (AMC) and Operation for 07 Years with Providing Driver and Technical Operator for PANVEL MUNICIPAL CORPORATION.

**A) CHASSIS SPECIFICATION**

| | |
|---|---|
| Engine | ZD30 BS VI Diesel with i-Gen6 technology |
| Maximum power | 104kW @ 2750 rpm (140 HP) |
| Maximum torque | 360 Nm @ 1350-2750 rpm |
| Clutch | 310 mm dia - Diaphragm, Push type, Hydraulic actuated |
| Gear box type | 6 speed Overdrive gear box Gear ratios: I-8.28, II-4.7, III-2.75, IV-1.64, V-1, VI-0.85, Rev-7.25 Cable Type CSO linkage |
| Propeller shaft | Monotron Propeller shaft |
| Front axle | Forged I section - Reverse Elliot type |
| Rear axle | Fully floating single speed rear axle, Hypoid RAR: 5.13:1 |
| Steering | Hydraulic assisted Power steering |
| Frame | 202mm x 60mm x 6mm - Joggled frame |
| Front Suspension | Parabolic springs with shock absorber |
| Rear Suspension | Semi-elliptic multi leaf with helper springs |
| Brakes | Full air - dual line brakes, Parking brakes on rear only |
| Electricals | 12V 75 Ah battery ,70 Amp Alternator |
| Tyres | 8.25 X 16-16 PR, Optional -8.25R16-16PR |
| Fuel tank capacity | 90 (22ft) |
| DEF tank Capacity | 20L |
| Cabin | Partner Super Tiltable Day Cab |
| GVW | 11280 kg |

**B) WATER TANK**

A Water Tank having following parameters:

| | |
|---|---|
| Capacity | 5000 Lts. |
| Water Tanker Thickness: - | 3 & 4mm MS Plate (Combo) |
| Baffle Plate Thickness - | 3 & 4mm MS Plate |
| Manhole - | Provided 01 Manhole (600mm) with threaded MS Cap 100mm dia meters for filing water |
| Outlet - | Provided Butterfly Valve |
| Cleaning Hole: - | Proved below water Tank |
| Painting - | Enamel Paint |

**C) SPECIFICATION OF FOG MACHINE**

| SN | Model | M04 |
|---|---|---|
| 1. | Spray range without wind (m) | 40 |
| 2. | Coverage (m2) | 2500/5000 |
| 3. | Total Power (Kw) | 10.2 |
| 4. | Fan's power (Kw) | 7.5 |
| 5 | Pump's Power (Kw) | 2.2 |
| 6 | Fan quantity | 2 |
| 7 | Power Supply mode | Hydraulic |
| 8 | Nozzles quantity (pcs) | 39 |
| 9 | Water consumption (m3/h) | 3.2 |
| 10 | Pump Pressure (Mpa) | Centrifugal 1-1.5Mpa |
| 11 | Fog particle diameter (um) | 20-150 |
| 12 | Horizontal turning degree (adjustable_ | (+ - 120°/+ - 180 °) |
| 13 | Pitching degree | -10°-45° |
| 14 | Control Mode | Remote controller and Intelligent touch panel (Optional) |
| 15 | Fixing Mode | Mobile, tower, platform |
| 16 | IP grade | IP 55 |
| 17 | Noise (dB). | 70db at 7.5m |
| 18 | Working temperature (°C) | 0-50°C |
| 19 | Dimension (mm) | 1550x1030x1600 |
| 20 | Weight (Kg) | 510(Hydraulic) |
| 21 | Noise control | Double-wall soundproof |
| 22 | Spray ring mode | Double - spraying |

**D) Auxiliary engine specification**

| SN | Model | M04 |
|---|---|---|
| 1. | Engine model | QSB3.9-C80-30 (80HP 2000RPM) |
| 2. | Engine style | Cummins construction Industrial diesel engine |
| 3. | Type | In-line,4 stroke, water cooling, Direct injection |
| 4. | Cylinders No. | 4 Cylinders |
| 5 | Intake system | Turbocharged and intercooler |
| 6 | Bore X Stroke | 102x120mm |
| 7 | Displacement | 3.9L |
| 8 | Compression ratio | 16.6 |
| 9 | Fuel system | HPCR |
| 10 | Rotation | Close wise (face to flywheel) |
| 11 | Rated power | 60KW/80HP/2000RPM |
| 12 | Max torque | 350N.m/1350RPM |
| 13 | Idle speed | 750RPM |
| 14 | Electrical system | 24V/12V |
| 15 | Net Weight | 331KG |
| 16 | Overall Dimension (L*W*H) | 778mm*753mm*882mm |
| 17 | Package size(L*W*H) | 900mm*900mm*1000mm |
| 18 | Option parts | Air filter, exhaust pipe, bellow, silencer, radiator, control panel, etc |
| 19 | Emission | stage III, EU Stage IIIA |
| 20 | . Application | Wheel loader, hydraulic excavator, Motor grader, Air compressor, etc |

हिंदुस्थानला गरीब जनतेपासून धोका नाहीय पण स्वार्थी नेत्यांपासून नक्कीच धोका आहे.



- सादत हसन मंटो
हिंदुस्थान-पाकिस्तानी लेखक

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, २९ जुलै २०२५

# पर्यावरणाची राख करू नका

**पर्यावरणाचा** समतोल राखणे हे अत्यंत गरजेचे झाले आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे पृथ्वीवरील जैविक साखळीला धोका निर्माण झाला आहे. विकासाची वाट तयार करताना पर्यावरणाचा ऱ्हास करावा लागत आहे. हा ऱ्हास पूर्णतः थांबाविणे शक्य नसले तरी त्याच्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. औषणिक ऊर्जानिर्मितीमुळे प्रदूषणाचा होणाऱ्या विचार करताना शहरी भागांवर कायम लक्ष केंद्रीत केले जाते. ग्रामीण भागांमधील प्रदूषणाकडे दुर्लक्ष केले जाते. शेतीचे नुकसान, भूगर्भातील पाण्यावर होणारा परिणाम, प्रकल्पातील राख पसरून स्थानिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न असे ग्रामीण भागातील प्रदूषणाचेही अनेक पैलू आहेत. यात नागपूर जिल्ह्यातील कोराडी आणि खापरखेडासह, चंद्रपूर आणि इतरही औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पाच्या परिसरातील 10 किलोमीटर परिघात राहणाऱ्या नागरिकांना श्वसनाचे आजार होत असल्याचे सिद्ध झाले असल्याने हा विषय सध्या चिंतेचा बनलेला आहे. औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांमधून होणारे कार्बन उत्सर्जन कमी करणे हे मोठे आव्हान ठरत आहे. हे रोखण्यासाठी केंद्रीय पर्यटन व हवामान बदल मंत्रालयाने काही निकष ठरवून दिले आहेत. मात्र तरीही या निकषांकडे सर्रास दुर्लक्ष करून त्यासंबंधीच्या कोणत्याही उपाययोजना औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांकडून अजूनही करण्यात आलेल्या नाही. त्यामुळे राज्याला प्रकाशमान करणारे हे वीजनिर्मिती प्रकल्प नागरिकांच्या आरोग्यासाठी मात्र घातक ठरत आहे. यासोबतच आसपासच्या परिसरातील जैवविविधता यामुळे धोक्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यात कोराडी, खापरखेडा व मौद्याचा एनटीपीसीचा औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प आहे. एनटीपीसीचा हा प्रकल्प सात वर्षांपूर्वीच सुरू झाला असला, तरी कोराडी व खापरखेडा हे सत्तरीच्या दशकातील वीज प्रकल्प आहेत. त्यावेळी नागपूर शहर विस्तारलेले नव्हते. त्यामुळे शहराच्या हद्दीपासून हे वीजनिर्मिती प्रकल्प दूरच होते. मात्र, आता या प्रकल्पांना लागून दाट लोकवस्ती आहे. काळानुरूप वीजनिर्मिती क्षमता वाढवण्यासाठी या प्रकल्पांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असला, तरी याद्वारे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कुठल्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होत आहे. याचा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाला आहे. वीजनिर्मिती प्रकल्पांमधून होणारे उत्सर्जन रोखण्यासाठी केंद्रीय पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाने काही निकष निश्चित केले होते. पर्यावरणाचा ऱ्हास करण्यासारखे असल्याची टीका पर्यावरण तज्ज्ञांनी अनेकदा केली आहे. वीज प्रकल्पांमधून होणाऱ्या प्रदूषणामुळे विदर्भामधील नागपूर तसेच चंद्रपूर ही शहरे अत्यंत प्रदूषित झाली आहेत. औष्णिक वीज प्रकल्पांमधून बाहेर टाकल्या जाणाऱ्या घटकांमध्ये नायट्रोजन डायऑक्साइड श्वसनाचे संबंधित विकार होण्यास कारणीभूत ठरत आहे. तर सल्फर डायऑक्साइड व उत्सर्जनातून निघणारे इतर काही वायू फुप्फुसांसाठी अत्यंत घातक ठरत आहेत. राज्यात सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत असलेल्या चंद्रपूरच्या प्रदूषणात वेकोलिच्या कोळसा खाणीसोबतच येथील औष्णिक वीज केंद्रालाही जबाबदार धरण्यात आले आहे. या वीज केंद्राला वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. प्रदूषणास कारण ठरणारे 210 मेगावॉटचे पहिले दोन संच बंद करण्यात आले आहेत. नवे 500 मेगावॉटचे दोन संच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून त्याद्वारे राखेची विल्हेवाट सहजतेने लावली जाते. होणारे प्रदूषण टाळले जाते, असा दावा केला जातो. या वीज केंद्राला वेकोलिकडून हलक्या दर्जाच्या कोळशाचा पुरवठा केला जात असल्याची तक्रार होती. हा कोळसाही प्रदूषणास कारणीभूत ठरला होता. आता गुणवत्तापूर्ण कोळसा पुरविला जात असल्याने सकारात्मक परिणाम दिसत आहे. वीज केंद्राने आणखी सकारात्मक पावले उचलण्याची पर्यावरणवाद्यांची मागणी असली तरी त्याकडे नेहमी दुर्लक्ष केले जाते ही वास्तवता. हीच अवस्था परळी औष्णिक केंद्राची सुद्धा आहे. कोळसा वाहतुकीचा वाढता खर्च, इतर तांत्रिक अडचणींमुळे परवडणाऱ्या दरात वीज निर्माण करणे परळी औष्णिक विद्युत केंद्राला शक्य नाही. मागणी वाढली, तरच औष्णिक विद्युत केंद्रात वीजनिर्मिती सुरू ठेवण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. प्रदूषणाची पातळी अनेकदा इथे ओलांडली जाते. वीज प्रकल्पाला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. जायकवाडी धरणातून प्रकल्पाला पाणी पुरवठा होतो. हवेमध्ये उडणारी व खाली राहणारी असे या प्रकल्पातील राखेचे दोन प्रकार आहेत. त्यात हवेमध्ये उडणारी राख 80 टक्के, तर 20 टक्के राख खाली राहणारी असते. दोन्ही प्रकारची राख साठवून त्याची विक्री होते. परंतु वाहतूक व्यवस्था इतर सोयीसुविधांबाबत अडचणी असल्याने याची काळजी घेतली जात नाही. त्याचा परिणाम शहरातील रहिवाशांच्या आरोग्यावर होतो. वापरल्या गेलेल्या कोळशाची 20 टक्के राख होते. ही राख विटभट्टी व सिमेंट कंपन्यांना विकली जाते. येथील राख वाहतुकीसाठीही ठोस उपाययोजना नसल्याने नागरिकांना श्वसनाच्या गंभीर आजारांचा सामना करावा लागत आहे. राख प्रदूषण नियंत्रणाबाबत आवश्यक त्या उपाययोजना आवश्यक आहेत. नाशिकच्या एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या आधुनिकीकरणाकडे दुर्लक्ष करत तीनपैकी दोन संचांतून वीजनिर्मिती सध्या सुरू आहे. एकलहरे येथे टप्पा क्र. 1 मध्ये उभारण्यात आलेले प्रत्येकी 140 मेगावॉट क्षमतेचे वीज निर्मितीचे दोन संच सन 2011मध्ये आयुर्मान संपुष्टात आल्याने कायमस्वरूपी बंद करण्यात आलेले आहेत. या प्रकल्पाला दुय्यम दर्जाचा कोळसा मिळत असल्याने विजेच्या उत्पादकतेत घट, तर खर्चात वाढ होऊन वीजनिर्मितीचा खर्च वाढला आहे. येथे नवीन वीज प्रकल्प सुरू करणे तसेच आहे त्या प्रकल्पाचे आधुनिकीकरण करणे याकडे दुर्लक्ष करून सध्याच्या प्रकल्पाचा पांढरा हत्ती पोसण्याचा प्रकार सुरू आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार राखेचे प्रमाण 34 टक्क्यांपेक्षा जास्त नको. परंतु ग्रेड स्लीपेजमुळे या प्रकल्पात राख निर्मितीचे प्रमाण सरासरी 20 टक्के अधिक असते. सल्फरचे प्रमाणही 0.5 पीपीएमपेक्षा अधिक नसावे. परंतु त्याचेही प्रमाण सरासरी 1.33 पीपीएम इतके राहिलेले असल्याने हा वीज प्रकल्प प्रदूषणाचे माहेरघर ठरला आहे. धुरातील सल्फर हवेत मिसळून सल्फ्युरिक ॲसिड तयार होते. है त्वचा व श्वसन विकार कारणीभूत ठरते. प्रकल्पातील राख आजूबाजूच्या कोटमगाव, हिंगणवेढे, सामनगाव, गंगापाडळी, ओढा आणि एकलहरे या गावाच्या हद्दीत पडते. त्यामुळे येथील जमिनी नापीक होण्याचे प्रमाण वाढले आहे. विहिरींतील पाणी प्रदूषित झालेले आहे. पशुधनाच्या आरोग्यावरही परिणाम होतो. मृदा प्रदूषण सर्वात जास्त झाल्याने शेती अधिक खर्चिक झाली आहे. या भागातील वनस्पतींच्या वाढीवरही परिणाम झाला आहे. तर राज्यात सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत असलेल्या चंद्रपूरच्या प्रदूषणात वेकोलिच्या कोळसा खाणीसोबतच येथील औष्णिक वीज केंद्रालाही जबाबदार धरण्यात आले आहे. या वीज केंद्राला वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. प्रदूषणास कारण ठरणारे 210 मेगावॉटचे पहिले दोन संच बंद करण्यात आले आहेत. नवे 500 मेगावॉटचे दोन संच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून त्याद्वारे राखेची विल्हेवाट सहजतेने लावली जाते. होणारे प्रदूषण टाळले जाते, असा दावा केला जातो. एकूणच प्रदूषणाच्या राखेत असलेल्या अशा प्रकल्पाचा फेरविचार करण्याची वरज निर्माण झाली.

# कोल्हापुरी चप्पल : देशी हस्तकलेचा अनमोल वारसा

**भारतातील सर्वात जुन्या पारंपरिक हस्तकलांपैकी एक असलेल्या अशा कोल्हापुरी चपला ! आज पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या वलयात येत आहेत. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कारागिरीचं आकर्षण महाराष्ट्रात आणि देशात आज कित्येक पिढ्या संपलेलं नाही आणि आता परदेशी बाजारपेठेतही त्या लक्ष वेधून घेत आहेत.**

राकेश बेड



भारतातील अनेकानेक वैविध्यपूर्ण पारंपरिक हस्तकलांमध्येही, कोल्हापुरी चप्पल म्हणजे मानवी हातांचं कसब किती अनोखं असू शकतं याचं एक अस्सल उदाहरण आहे. तिला स्वतःची अशी एक खास सांस्कृतिक ओळख आहे. कोल्हापुरी चपलेचा प्रवास खरं तर मध्ययुगापासून चालत आलेला आहे. आत्ताच्या फॅशन-जगतातलं त्यांचं पदार्पण नवीन असलं तरी त्यामागे पिढ्यानुपिढ्या जतन केलेलं परंपरागत ज्ञान, कौशल्य आणि वर्षानुवर्षांचे संस्थात्मक प्रयत्न यांचा शेकडो वर्षांचा इतिहास आहे.

प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरमध्ये कोल्हापुरी चपलेचं उत्पादन होतं. या चपला बनवणाऱ्या कुटुंबांमध्ये पिढ्यानपिढ्या ती कला चालत आलेली आहे. नैसर्गिकरित्या कमावलेलं कातडं आणि वेणीसारखे गुंफलेले पट्टे वापरून बनवलं जाणारं हे चामड्याचं पादत्राण आपल्याकडे सुमारे बाराव्या शतकापासून बनवलं जात आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात या पुरातन हस्तव्यवसायाला एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक वळण मिळालं. कोल्हापूरचे द्रष्टे शासक छत्रपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापुरी चपलांच्या वापराला चालना द्यायचं ठरवलं आणि व्यवसाय म्हणून त्यांचा दर्जा उंचावला. ओबडधोबड गावठी पायताण बनवणारे बलुतेदार पाहता पाहता राजाश्रय असलेले कारागीर झाले आणि त्यांनी घडवलेली पादत्राणं स्वदेशी अस्मितेचे प्रतीक बनली.

असा आपला हा मोलाचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या कामाची धुरा गेली अनेक दशकं सातत्याने आणि नेटाने वाहणारी सरकारी संस्था म्हणजे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, म्हणजेच लेदर इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (LIDCOM). चर्मोद्योग विकास महामंडळ कारागीरांना कौशल्यविकासाच्या संधी निर्माण करून देणं, परंपरेतील सातत्य आणि दर्जा राखणं, आणि दीर्घकाळ टिकाव धरू शकेल अशी व्यवसायाची आर्थिक बांधणी करणं ही धोरणं डोळ्यासमोर ठेवून वर्षानुवर्षे काम करीत आहे. १९७४ मध्ये स्थापन झाल्यापासून महामंडळाने प्रशिक्षण देऊन, प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देऊन, बाजारपेठांचा विस्तार करून आणि उपजीविकेचे मान सुधारून हजारो ग्रामीण कारागिरांना सबल बनवलं आहे.

## कारागिरांचे हितसंवर्धन, परंपरेची जपणूक

चर्मोद्योगातील महामंडळाचा सहभाग केवळ आर्थिक मुद्दयांपुरता मर्यादित नसून आपला सांस्कृतिक वारसा जाणीवपूर्वक जतन करण्यासाठीदेखील महामंडळ कटिबद्ध आहे. कोल्हापुरी चपलांच्या हस्तव्यवसायाचं पुनरुज्जीवन व्हावं, बदलत्या अर्थव्यवस्थेतही तो टिकून राहावा यासाठी महामंडळ अनेक आघाड्यांवर काम करतं. प्रशिक्षण केंद्रांचा विकास, स्वयं-विकास गटांचे सक्षमीकरण, अंतर्देशीय आणि आंतरदेशीय बाजारपेठांदरम्यान खरेदीदार आणि पुरवठादार यांची साखळी निर्माण करणं अशा विचारपूर्वक आखलेल्या अनेक योजना महामंडळ राबवतं. महामंडळाच्या उद्दिष्टांविषयी बोलताना, व्यवस्थापकीय संचालक श्रीमती प्रेरणा देशभ्रतार (आयएएस) म्हणतात: "कोल्हापुरी चपला म्हणजे केवळ उपयुक्ततामूल्य असलेल्या वस्तू नसून त्यांच्यात स्वदेशाभिमान, स्वावलंबन आणि जिवापाड ज्यांचे रक्षण करावे अशा उज्ज्वल परंपरांच्या अनेक कथा दडलेल्या आहेत. आमच्या संस्थेच्या माध्यमातून आम्ही असा प्रयत्न करतो की हा सांस्कृतिक वारसा सदैव आमच्या कारागिरांचे हात अधिकाधिक बळकट करत राहील आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील."

**अस्सलपणा आधुनिक अर्थव्यवस्थेत सुरक्षित करण्यासाठी भौगोलिक निर्देशांक असलेले ओळखचिन्ह**

कोल्हापुरी चपलांची कारागिरीची मूळ परंपरा जतन केली जावी आणि नफेखोरीसाठी त्यांची बाजारातील इतर उत्पादकांनी नक्कल करू नये याची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने २०१९ मध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या चर्मोद्योग विकास महामंडळांनी एकत्रितपणे अर्ज करून (अर्ज क्रमांक १६९) भौगोलिक निर्देशांकाचं ओळखचिन्ह (Geographical Index Tag) मिळवलं. या जागतिक अर्थव्यवस्थेतील कायदेशीर तरतुदीमुळे अस्सल कोल्हापुरी चपला बनवण्याचे सर्व हक्क आता महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील काही जिल्ह्यांसाठीच राखून ठेवले गेले आहेत. TRIPS सारख्या बौद्धिक संपदेचे नियमन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापार करारांतर्गत जी आय टॅगच्या तरतुदी सदस्य देशांना बंधनकारक आहेत. भौगोलिक निर्देशांकाचं ओळखचिन्ह किंवा GI टॅग प्रमाणपत्र या पादत्राणाची व्याख्या करताना "कोणताही कृत्रिम कच्चा माल किंवा कोणतेही यंत्र न वापरता, पारंपरिक तंत्र वापरून हाताने बनवलेले, पायाची बोटे उघडी राहतील अशा रचनेचे आणि नैसर्गिकरित्या कमावलेल्या चामड्यापासून बनलेले" असे त्याचे पैलू स्पष्ट करतं. हे प्रमाणपत्र कारागीरांची ओळख संरक्षित करण्यात आणि बाजारपेठेत विश्वासार्हता सिद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं. कोल्हापुरी चप्पल आता नव्याने लोकप्रिय होत असताना, चर्मोद्योग विकास महामंडळ नागरिकांना, डिझायनर्सना आणि खरेदीदारांना आपल्या अस्सल मातीतल्या हस्तकला-परंपरा आणि त्या टिकवून ठेवणारे समाज यांच्या पाठीशी उभे रहाण्याचे आवाहन करत आहे. कोल्हापुरी चपला या केवळ फॅशन म्हणून वापरण्याच्या वस्तू नाहीत. परंपरागत हस्तकौशल्यं आणि छोट्या छोट्या समाजांची मूलभूत प्रतिष्ठा जपणाऱ्या आपल्या संस्कृतीची ती एक अजोड अभिव्यक्ती आहे.

## चर्मोद्योग विकास महामंडळाबद्दल

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ किंवा लेदर इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (LIDCOM) ही संस्था म्हणजे पारंपरिक कारागिरांच्या हितसंवर्धनासाठी सुरू केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या अनेक उपक्रमांपैकी एक आहे. चर्मोद्योग-क्षेत्राची प्रगती साधण्याच्या दृष्टीने या व्यवसायातील पारंपरिक कारागिरांचं हित जपणं, नवीन कल्पनांना आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणं, बाजारपेठ विस्तारण्याचे मार्ग शोधणं आणि चर्मकार समाजाचा विकास साधणं ही संस्थेची उद्दिष्टं आहेत. ग्रामीण चर्मकारांसोबत केलेल्या कामातून कोल्हापुरी चप्पल हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचं आणि लोकाभिमुख अर्थकारणाचं एक ठळक बोधचिन्ह म्हणून पुन्हा लोकांपुढे आणण्यात महामंडळाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ■

# श्रावण शुद्धपंचमीला 'नागपूजन'



**श्रावण** शुद्ध पंचमीला नाग पूजन केले जाते म्हणून या तिथीला नागपंचमी असे म्हणतात. आपल्या कडील लोक संगीतात याचा उल्लेख सापडतो. भारत हा कृषिप्रधान देश आहे. अन्नधान्याची नासाडी करणाऱ्या उंदरांचा नायनाट सर्प करतात. एक प्रकारे ते आपल्याला मदत करत असल्याने आपले ते मित्रच असतात. या दिवशी प्रत्यक्ष नागाची किंवा सापाची पूजा करण्यास बंदी असल्याने घरातील स्त्री घरात पाटावर किंवा चौरंगावर अष्टगंध किंवा चंदन गंधाने पाच फण्यांचा नाग काढते तसेच इतर नऊ नाग काढून त्यांची पूजा करते व पूरणा वरणाचा नैवेद्य दाखवला जातो. या दिवशी कापणे, चिरणे इत्यादी केले जात नाही तसेच काही ठिकाणी तवाही ठेवला जात नाही म्हणून त्या दिवशी पुरणाचे गोड दिंड केले जातात.

नाग पंचमीचा इतिहास असे सांगतो की श्रीकृष्णाने यमुनेच्या डोहात उडी मारून कालिया नावाच्या नागाचे मर्दन केले तो दिवस नागपंचमीचा होता. कालिया नागाने श्रीकृष्णाला प्रार्थना केली व अभय मागितले कृष्णाने त्याला वर दिला तू याच ठिकाणी राहशील दरवर्षी नागपंचमीला तुझ्या वंशज यांचे पूजन केले जाईल.

दुसरी कथा सत्येश्वरी या बहिणीची कथा आहे. या कथेनुसार सत्येश्वरीचा भाऊ नागपंचमीच्या आदल्या दिवशी सर्प दंशाने मरण पावला त्यानंतर सत्येश्वरीने नागदेवतेची पूजा करून व भावाला जिवंत करण्याची प्रार्थना केली. तिची प्रार्थना ऐकून नागदेवतेने तिच्या भावाला जिवंत केले व असा वर दिला की जो कोणी ह्या दिवशी भाऊ म्हणून माझे पूजन करेल त्या स्त्रीच्या भावाला सर्पदंशाने मृत्यू येणार नाही म्हणून बऱ्याच स्त्रिया नागदेवतेला भाऊ म्हणून पुजतात व आपल्या भावाला दीर्घायुष्य, निरोगी आयुष्य मिळण्यासाठी प्रार्थना करतात. भारतीय सनातन संस्कृती ही चराचरात ईश्वराचे रूप असल्याचे मानते म्हणूनच वडपौर्णिमेला वट वृक्षाची पूजा केली जाते. नागपंचमीला नागदेवतेची पूजा केली जाते तर बैलपोळ्याला बैलांची पूजा केली जाते. वसुबारसेला गाई वासराची पूजा केली जाते तर दीप अमावस्येला दिव्यांची पूजा केली जाते यावरून आपली संस्कृती किती महान असल्याचे दिसून येते.आपण आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगला पाहिजे व त्याप्रमाणे आचरण करणे हेच आपले कर्तव्य असते.

**- लीना गाडगीळ, पनवेल**

## पत्र मानस

### शिवलिंगावर अर्पण केलेले दूध वाया जात नाही !

श्रावणमास सुरु झाला आणि त्यातील पहिला सोमवारही नुकताच सरला. श्रावण मास म्हणजे भगवान शिवाच्या उपासनेचा मास. अनेक शिवभक्त श्रावण मासातील सोमवार व्रतस्थ राहून उपवास करतात. त्यानिमित्ताने शिवमंदिरात जाऊन शिवलिंगाला दुग्धाभिषेक करतात. शिवलिंगामध्ये प्रचंड शक्ती सामावली असल्याने त्यावर ताम्र कलशाद्वारे सतत जलाभिषेक चालू ठेवला जातो. दूध हे जलाहून शीतल असल्याने शिवभक्त श्रद्धेने शिवलिंगावर दुधाने आभिषेक करतात. शिवलिंगावर अर्पण केलेले दूध असेच वाया न घालवता भाविकांना ते तीर्थ स्वरूपात वाटले जाते. शिवलिंगावर अर्पण केलेल्या दुधाचे तीर्थात रूपांतर झाल्यावर शिवलिंगाच्या चैतन्यामुळे त्याच्या चवीत होणारा आमूलाग्र बदल प्रत्येक शिवभक्ताने अनुभवलेला असतो. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी मात्र श्रावण मास जवळ आला की, 'दूध पिंडीवर सांडून वाया घालवू नका त्याऐवजी ते गरिबांना वाटा' असा कंठशोष करताना आढळतात. मुळात शिवपिंडीवर वाहिलेले दूध कोणत्याही शिवमंदिरात वाया जाऊ न देता ते शिवभक्तांना तीर्थस्वरूपात वाटले जाते. होळी जवळ आली कि कचऱ्याची होळी करा, होळी लहान करा पोळी दान करा, गणेशोत्सवात मूर्तीदान करा यांसारख्या मोहिमा ही मंडळी राबवत असतात. हिंदूंच्या सण उत्सवातील प्रथा परंपरांना आणि धर्मशास्त्रीय विधींना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून त्यावर आपली बुद्धी पाजळणारी ही मंडळी अन्य धर्मियांच्या सणांच्या वेळी मात्र मूग गिळून गप्प असतात. सुधारणावादी मंडळींना सुधारणा करायचीच आहे तर मनुष्याच्या वृत्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी वर्षभर प्रयत्न करावेत. केवळ हिंदूंचे सण-उत्सव जवळ आले की धर्मशास्त्राशी तडजोड करण्याचे सल्ले देऊ नयेत.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई**

### एसटी भाडेवाढ केलीच का?

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यानी एसटीच्या आरक्षणावर ३० टक्के लादलेली भाववाढ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी रद्द करुन १६ कोटीचा फटका घेतला.मुळातच कोणतीही भाडेवाढ करताना मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्याची परवानगी घ्यावी लागते किंवा मंत्रीमंडळात भाववाढीवर चर्चा करावी लागते.पण या प्रकरणावरुन मंत्रीमंडळात आलबेल असल्याचे निदर्शनास येते कारण परिवहन मंत्री एसटी भाडेवाढ करतात आणि त्याच पक्षाचे उपमुख्यमंत्री ती रद्द करतात याला काय म्हणावे? यावरुन एकच स्पष्ट होते ते म्हणजे भाडेवाढ करताना परिवहन मंत्र्यानी एकनाथ शिंदेना विचारले नसेल किंवा उपमुख्यमंत्री माहीत असूनही श्रेय घेण्यासाठी ३० टक्के भाडेवाढ मागे घेण्याचा निर्णय घेत असावेत.जर भाडेवाढ रद्द करायची होती तर ती वाढवलीच का ?

**- अरुण पां.खटावकर , लालबाग १२**

### रेव्ह पार्टी प्रकरण धक्कादायक व गंभीर

पुण्याजवळील रेव्ह पार्टी प्रकरण सध्या भलतेच गाजत आहे. कारण ही त्याला तसेच आहे. सध्या राज्याच्या राजकारणात मोठ्या उलाढाल होताना दिसत आहे. नुकतेच पावसाळी अधिवेशनाची सांगता झालेली आहे. मागील काही दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथराव खडसे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात कमालीचे आक्रमक झाले होते आणि त्यांना त्यांची मुलगी व त्याच पक्षाच्या नेत्या रोहिणीताई खडसे यानी देखील चांगलीच साथ दिली होती. नेमके अशावेळी रोहिणीताई खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर याना पुण्याजवळून रेव्ह पार्टीतील पोलिसांच्या धाडीत रंगेहात पकडण्यात आले होते व अटकही झालेली आहे. श्रीमंत लोकांची रेव्ह पार्टी आणि पार्टीतील उपस्थित महिला तसेच नशेचे पदार्थ सेवन इत्यादीला राज्यात बंदी असूनही दुर्दैवाने समाजात अशा अप्रिय घटना घडत आहे. थोडक्यात रेव्ह पार्टी प्रकरण विरोधकांच्या संदर्भातील असल्यामुळे गंभीर तथा धक्कादायक नक्कीच आहे तेव्हा पोलिसांनी देखील कुठल्याही दबावाला बळी न पडता म्हणजे सावध व योग्य दिशेने तपास करायला हवा,असे वाटते.

**- श्री संजय गंगाराम साळगांवकर, मुंबई** ■

## ठाण्यातील मराठी शाळा बंद होणार? पालकांनी घेतली शाळा व्यवस्थापनाची भेट

**ठाणे** – ठाण्यातील सर्वात प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या नौपाड्यातील सरस्वती विद्या मंदिर ट्रस्टच्या शाळेतील मराठी माध्यम बंद होऊन इंग्रजी माध्यम सुरू होणार असल्याचा संदेश समाजमाध्यमांवर शनिवारी प्रसारित झाला होता. यानंतर पालकांनी मोठ्या संख्येने शाळेबाहेर गर्दी केली होती. तसेच मनसेच्या नेत्यांनीही धाव घेऊन प्रशासनाला जाब विचारला. दरम्यान, सोमवारी पालकांनी पुन्हा शाळेबाहेर गर्दी करत शाळा व्यवस्थापनाची भेट घेतली. त्यावेळी शाळा व्यवस्थापनाने पालकांची समजून काढली.ठाण्यातील नौपाडा परिसरात सरस्वती मंदिर ट्रस्टची मराठी माध्यमाची शाळा आहे. ही ठाण्यातील सर्वात जुनी आणि प्रतिष्ठित शाळा आहे. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये नौपाड्यातील सरस्वती विद्यामंदिर शाळेला विशेष ओळख आहे. आपल्या पाल्याला मराठी माध्यमातून शिक्षण देण्याची इच्छा असलेल्या पालकांचा या शाळेकडे ओढा असतो. या शाळेतील मराठी माध्यम बंद होऊन इंग्रजी माध्यम सुरू होणार असल्याचा संदेश समाजमाध्यमांवर शनिवारी प्रसारित झाला होता. या संदेशानंतर पालक शाळेबाहेर जमले होते.



## महत्त्वाचे

### इमारतीवरून पडून कामगाराचा मृत्यू

**बदलापूर:** बदलापूर पश्चिमेकडील वालीवली गावात इमारतीवरून पडून एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. निरंजन रायता असे या कामगाराचे नाव आहे. येथे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत लाकडी प्लाय तिसऱ्या मजल्याच्या गॅलरीतून वर नेत असताना पाय घसरून खाली पडल्याने झालेल्या दुखापतीमुळे त्याचा मृत्यू झाला. कामगारांना सुरक्षा साधने न पुरवता काम करून घेतले जात असल्याने झालेल्या अपघातात गेल्या महिनाभरात परिमंडळ चारमध्ये चार मृत्यू झाले आहेत. या अपघाताप्रकरणी बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरात गेल्या काही महिन्यात कामगारांच्या मृत्यूची काही प्रकरणे समोर आली आहेत. उल्हासनगर शहरात जुन्या इमारतींच्या दुरूस्तीची अनेक काम सुरू असतात. मात्र या कामांमध्ये कोणत्याही प्रकारची कामगारांच्या सुरक्षेची काळजी घेतली जात नाही. मात्र त्यानंतरही कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही सुविधा केली जात नसल्याचे समोर आले आहे.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

**पनवेल :** पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवार 3 ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते तीन वाजेपर्यंत शांतिनिकेतन पब्लिक स्कूल, सेक्टर दोन, नवीन पनवेल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मोफत पॅन कार्ड आणि आधार कार्ड कॅम्प ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजक प्रभाकर कांबळे, अध्यक्ष पनवेल महानगरपालिका जिल्हा, आरपीआय (आठवले) असून या रक्तदान शिबिराला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### अलिबागमध्ये 4.17 लाखांचा गुटखा जप्त

**अलिबाग:** अलिबाग पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे सव्वाचार लाख रुपये किमतीचा गुटखा आणि चरससदृश अमली पदार्थ जप्त करत दोघा आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई अलिबाग शहरातील हरीष बेकरीसमोर व वायशेत परिसरात करण्यात आली. आरोपींची नावे नकुल कुमार आणि राम केवल रामप्रसाद निशाद (रा. उत्तरप्रदेश) अशी आहेत. पोलिसांनी निशादच्या घरी छापा टाकून विविध प्रकारचे पानमसाले, तंबाखू आणि चरससदृश गोळया असा एकूण ५४, ५९१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या दोघांकडून एकूण ४, १७, ४३९ रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून त्यांच्यावर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

### कनकेश्वर मंदिरात श्रावणी सोमवारनिमित्त गर्दी

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील कनकेश्वर मंदिरात पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. पहाटे चार वाजता मंदिरात पूजा-अभिषेक झाल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. पायथ्यापासून मंदिरापर्यंत रांगा लागल्या होत्या. बेल, श्रीफळ, हार, पूजेच्या साहित्याची जोरदार विक्री झाली. भाविकांना सुलभ दर्शनासाठी कनकेश्वर देवस्थान ट्रस्टने उत्कृष्ट नियोजन केले होते. पोयनाड परिसरातील इतर शिवमंदिरेही भाविकांनी गर्दीने भरून गेली होती.

## शीळमधील आणखी 21 इमारती तोडण्याचे न्यायालयाचे आदेश

# मुंब्र्यातील 21 अनधिकृत इमारतींवर पालिकेची कारवाई

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

मुंब्रा येथील शीळ भागातील खान कंपाऊंड परिसरात उभारण्यात आलेल्या २१ अनधिकृत इमारतींवर उच्च न्यायालयाच्या आदेशाने ठाणे महापालिका आयुक्तांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली होती. त्यापाठोपाठ आता याच भागातील आणखी ११ इमारतींचे बांधकाम पाडण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्याने पालिकेची पुन्हा नामुष्की ओढावली असून या ठिकाणी पालिकेने दोन इमारतींचे बांधकाम जमीनदोस्त केले आहे. उर्वरित इमारतीतील रहिवाशांना घरे रिकामी करण्याच्या नोटीसा पालिकेने बजावल्या आहेत.



ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील शीळ भागातील खान कंपाऊंड परिसरात १७ अनधिकृत इमारती उभारण्यात आल्या होत्या. इमारतीप्रकरणी उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेत पालिकेला कारवाई करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशामुळे ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यावर स्वत: मुंब्रा येथील शीळ भागात जाऊन त्या इमारतींवर कारवाई करण्याची नामुष्की ओढवली होती. येथील १७ इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या.

या कारवाईदरम्यान, येथील आणखी चार अनधिकृत इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या. अशाप्रकारे या भागात एकूण २१ इमारतींचे बांधकाम पाडण्यात आलेला असतानाच, पालिकेने आता शिळ भागातील आणखी ११ इमारतींवर उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शनिवारपासून कारवाई सुरू केली असून त्यात दोन इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत.

**दोन इमारती पालिकेने पाडल्या**

शीळ येथील ११ अनधिकृत इमारतींचे बांधकाम हे २०१८ ते २०१९ या काळात झाले आहे. याठिकाणी एकूण सात मजली सहा, आठ मजली एक, सहा मजली एक, चार मजली एक आणि तीन मजली एक अशा एकूण १० इमारती आहेत. या इमारतीत प्रत्येकी २१ ते ४७ खोल्या आहेत. यातील तीन मजली इमारत वगळता इतर नऊ इमारतीत एकूण ३२९ कुटूंबे राहत आहेत. त्यापैकी चार आणि तीन मजली इमारतीचे बांधकाम पालिकेने पाडले आहे. तर एका सात मजली इमारतीचे बांधकाम पाडण्याचे काम सुरू केले आहे. उर्वरित इमारतीमधील रहिवाशांना पालिकेने नोटीसा देऊन घरे रिकामे करण्यास सांगितले आहे. बिल्डर आणि जमीन मालक हे दोघे नातेवाईक असून त्यांच्यातील वादाचे प्रकरण न्यायालयात गेले होते. त्यावर सुनावणी देताना न्यायालयाने बांधकाम पाडण्याचे आदेश दिले.

## करंजामधील बोट दुर्घटना?

# 50 तासांनंतर सापडले तिघांचे मृतदेह

**प्रतिनिधी**
■ **उरण**

उरण तालुक्यातील करंजा येथील तुळजाई ही बोट शनिवारी (26 जुलै) खांदेरी किल्ल्याजवळ बुडाली होती. या बोटीत आठजण होते. त्यातील पाचजण किनाऱ्यावर परतले होते. मात्र, तिघांचा शोध लागत नव्हता. तिघे बेपत्ता असल्याने त्यांचा शोध सुरू होता. तब्बल 50 तासांनंतर तिघांचेही मृतदेह मिळाल्यामुळे उरण तालुक्यावर शोककळा पसरली आहे. अलिबाग तालुक्यातील मांडवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत समुद्रकिनारी तिघांचे मृतदेह सापडल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. नरेश राम शेलार, धीरज कोळी आणि मुकेश यशवंत पाटील अशी त्यांची नावे आहेत.



करंजा येथून मनोहर गणपत कोळी त्यांची तुळजाई बोट घेऊन 26 जुलै रोजी सकाळी 7 वाजता समुद्रात मासेमारीसाठी गेले होते. मात्र, जोरदार लाटेत त्यांची बोट उलटली आणि बोटीला जलसमाधी मिळाली. बोटीत हेमंत बळीराम गावंड (45, आवरे, उरण ), संदीप तुकाराम कोळी (37, करंजा, उरण), रोशन भगवान कोळी (39, करंजा), शंकर हिरा भोईर (64, आपटा, पनवेल), कृष्णा राम भोईर (55, आपटा, पनवेल), नरेश राम शेलार, धीरज कोळी (कासवला पाडा, उरण) आणि मुकेश यशवंत पाटील हे आठ मच्छीमार होते. मासेमारी करताना अलिबाग तालुक्यातील मांडवा पोलीस स्टेशन हद्दीत खांदेरी किल्ल्याजवळ आलेल्या जोरदार लाटेने केलेल्या प्रहारामुळे बोट पलटी झाली आणि आठहीजण समुद्रात फेकले गेले. ही घटना दुपारी साडेतीन-चारच्या दरम्यान घडली. त्यातील पाचजण किनाऱ्यावर परतले तर तिघांचा ड्रोनच्या मदतीने शोध सुरु होता.

अखेर सोमवारी (28 जुलै) सकाळी साडेअकरा वाजता तिघांचे मृतदेह सापडले. त्यातील एकाचा मृतदेह सासवणे, दुसरा मृतहेद दिघोडे आणि तिसरा मृतदेह किहीम किनारी सापडले, अशी माहिती मांडवा पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांनी दिली. वादळी हवामानामुळे प्रवासी वाहतूक बंद केली असून, मासेमारीवर 1 ऑगस्टपर्यंत बंदी आहे. तरीही बोटी मासेमारी जातात याची माहिती मत्स्य व्यवसाय अधिकारी तसेच बंदर अधिकाऱ्यांना नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. चार दिवसांत चार मच्छीमारांपैकी तिघांचा बोट उलटून मृत्यू झाला आहे तर एकाचा मोरा जेट्टीजवळ मृत्यू झाला आहे. तो परप्रांतीय होता. या बोट दुर्घटना प्रकरणात रायगड जिल्हा मत्स्य व्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त संजय पाटील, उरणकर येथील परवाना अधिकारी तसेच बोटमालक यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पनवेल पालिकेकडून मूर्तिकारांना 34 टन शाडू मातीचे मोफत वाटप

## उपआयुक्त स्वरूप खारगेंकडून शाडू मातीचे वितरण व गणेशमूर्ती कारखान्याला भेट

**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

पनवेल शहरामध्ये शाडू मातीच्या मूर्ती घडविण्याकरिता प्रोत्साहन मिळावे, जास्तीत जास्त पर्यावरणपूरक मूर्तींची प्रतिष्ठापना व्हावी यासाठी पनवेल महानगरपालिकेकडून पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांना दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत शाडू मातीचे वाटप आज करण्यात आले .श्रीगणेशोत्सव सन २०२५ पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी पालिका आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त स्वरूप खारगे यांनी पर्यावरण विभागामार्फत नियोजन व कार्यवाही देखील सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, मागीलवर्षी 20 पेक्षा अधिक मूर्तिकारांना 12 टन इतकी माती मोफत देण्यात आली होती. मात्र यंदा उत्सवाच्या व्यापकतेनुसार मातीचा पुरवठा वाढविण्यात आला आहे. यावर्षी 24 पेक्षा अधिक मूर्तिकारांनी 34 टन इतकी शाडू माती पर्यावरणपूरक मूर्ती घडविण्यासाठी मागणी केली होती. त्यानुसार दिनांक २६ जुलै रोजी आज कुंभारवाडा, पनवेल येथे उप आयुक्त स्वरूप खारगे यांच्या प्रमुख उपस्थितीत शाडू मातीचे वाटप व मूर्ती कारखान्याला भेट देण्यात




आली. यावेळी 34 टन इतकी शाडू माती मूर्तिकारांना मोफत वाटप करण्यात आली आहे.

या प्रसंगी उप आयुक्त श्री. स्वरूप खारगे यांनी गणेश मुर्ती कारखान्यांना भेट देऊन मूर्तीकारांशी संवाद साधला व त्यांना पर्यावरणपूरक मूर्ती निर्मितीसाठी मार्गदर्शन केले. मूर्तिकारांनी पीओपी, केमिकल रंग व प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करत शाडू मातीपासून मूर्ती तयार करण्यावर भर देण्याचे सांगितले. उप आयुक्त खारगे यांच्या झालेल्या या भेटी दरम्यान स्थानिक मूर्तिकारांकडून शाडू मातीपासून बनवलेली गणेशमूर्ती त्यांना सप्रेम भेट देण्यात आली.

पनवेल महनगरपालिका प्रशासनाकडून पर्यावरण पूरक गणेशोत्सव राबविण्याच्या अनुषंगाने मूर्तिकारांना निरनिराळया सेवा-सुविधा पुरविण्यात येत आहेत. पर्यावरणपूरक उत्सवासाठी सर्व बाबींचा अवलंब केला जात आहे. पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांसाठी महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या जागेनुसार 'प्रथम अर्जदारास प्राधान्य' या तत्वावर पर्यावरण पूरक गणेश मूर्ती विक्रीसाठी जागा देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# दिव्यात अनधिकृत बांधकामांच्या 14 नळ जोडण्या खंडित

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

अनधिकृत इमारतींना देण्यात आलेला पाणीपुरवठा तात्काळ खंडीत करा, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी देताच, पाणी पुरवठा विभागाने अशा इमारतींचा शोध घेऊन त्यांच्या नळजोडण्या तोडण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेत गेल्या दोन दिवसांत दिवा परिसरातील अनधिकृत बांधकामांच्या १४ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत.

या नळजोडण्या घेण्यात आल्याचे समोर आले असून यासंदर्भात गुन्हे दाखल करण्याची कारवाईही करण्यात

## 10 पंप जप्त, 11 बोअरवेल केल्या बंद



येत असल्याचे पालिका प्रशासनाने सांगितले. तसेच याच कारवाईत १० मोटर पंप जप्त करण्यात आले तर, ११ बोअरवेल बंद करण्यात आल्या आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून अनधिकृत इमारती उभारण्यात येत आहेत. या इमारतींना वीज आणि पाणी पुरवठा होत असल्याने येथे रहिवाशी वास्तव्यास येतात. या संदर्भात दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणी देताना उच्च न्यायालयाने अशी बांधकामे उभी राहू नयेत यासाठी महत्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यात कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामाला वीज आणि पुरवठा करण्यात येऊ नये, असे उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत.

या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी वीज कंपन्या आणि पाणी पुरवठा विभागाची बैठक घेतली होती. त्यात अनधिकृत बांधकामांना कोणत्याही परिस्थितीत वीज आणि पाणी पुरवठा देऊ नका, असे स्पष्ट निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी दिले होते. यानुसार ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने अनधिकृत इमारतींच्या नळजोडण्या खंडीत करण्याची मोहिम हाती घेतली आहे.

# विद्यार्थी व नागरिकांनी सीड बॉल बनविण्याचे प्रशिक्षण घेत जपले पर्यावरणहित

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

फळे खाऊन झाल्यानंतर त्याच्या बिया इतरत्र टाकून देण्याऐवजी त्याचे पुनर्रोपण करण्याच्या दृष्टीने विचार झाला तर पर्यावरण संवर्धनासाठी ते एक महत्वाचे पाऊल आहे हे लक्षात घेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सीड बॉल बनविण्याचा प्रशिक्षण कार्यक्रम बेलापूर येथील वारकरी भवन याठिकाणी उत्साहात संपन्न झाला.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा अभियान 6.0' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या निसर्गहिताय उपक्रमात नवी मुंबई महानगरपालिकेसह माता अमृतानंदमयी मठ तसेच तेरणा कॉलेज नेरुळ यांच्या एनएसएस



युनिटचे विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सहभागी नागरिक व विद्यार्थ्यांना वेगवेगळया बियांपासून मातीचे गोळे तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले व नंतर त्यांनी स्वत:हून मातीचे गोळे अर्थात सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल मोकळ्या जागेत टाकल्यानंतर बिजावरील माती विरघळून बियांची जमीनीत पेरणी होते व ते बीज मातीत रुजून त्यापासून वृक्षरोप तयार होते. वृक्षसंपत्ती वाढीसाठी हा उपक्रम अत्यंत लाभदायी असून विद्यार्थी व नागरिकांनी सीडबॉल बनविणे या उपक्रमात उत्साहाने सहभागी होत हा उपक्रम यशस्वी केला.

## खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत

# आ. प्रशांत ठाकूरांची जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी चर्चा



**प्रतिनिधी**
■ **अलिबाग**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली खारघर मधील राजकीय पक्ष पदाधिकारी, संघर्ष समिती कार्यकर्ते यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांची सोमवारी (दि.२८) जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन त्यांच्याशी खारघर येथे कायमस्वरूपी दारूबंदी करण्याबाबत चर्चा केली. जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये खारघर मधील कायमस्वरूपी दारूबंदी घोषित करण्यासंदर्भात करावयाची शासकीय प्रशासकीय मतदान प्रक्रिया याबाबत चर्चा करण्यात आली. करण्याबाबत राज्य शुल्क अधिकारी व जिल्हाधिकारी रायगड यांनी उभी बाटली आडवी बाटली निवडणूक प्रक्रिया कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. ज्या ठिकाणी निवडणूक घायची आहे तेथून २५ टक्के मतदारांचे निवडणुकीसाठी अर्ज केल्यास मतदान घेतले जाईल. विधानसभेची मतदार यादी या प्रक्रियेसाठी वापरण्यात येईल. निवडणूक प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे राबवण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. खारघर संघर्ष समितीला दारूबंदीसाठी व निवडणूक प्रक्रियेसाठी लागणारे सर्व प्रकारे सहकार्य करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

खारघरमध्ये संपूर्ण दारूबंदी करण्याबाबत विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले होते. खारघरमधील तीन प्रभागांमधील २५ टक्के मतदारांनी संपूर्ण दारूबंदीसाठी अर्ज दिल्यास मतदान घेत येईल असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. त्यानुसार आता पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

# कचोरे येथील टेकडीवर महापालिकेच्या तत्परतेमुळे टळला मोठा अनर्थ !

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या फ प्रभाग क्षेत्रातील कचोरे गावात उतारावर वसलेली एक अनधिकृत चाळ ढासळण्याच्या स्थितीत असल्याची माहिती महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला मिळताच तत्काळ कारवाई करण्यात आली. सहा खोल्यांची ही चाळ पूर्णपणे अनधिकृत असून संरक्षक भिंत खचल्यामुळे चाळीखालील जमीन खचू लागली होती.

या चाळीला महापालिकेने जून महिन्यातच नोटीस दिल्या होत्या. सदर संपूर्ण चाळ निर्मनुष्य करण्याची कारवाई ६/फ प्रभागामार्फत करण्यात आली. माती खचण्याची प्रक्रिया दिसताच महापालिकेच्या ६/फ विभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांनी आपल्या पथकाच्या व नागरिकांच्या मदतीने सहा खोल्यांच्या रिकाम्या चाळीवर निष्कासनाची तोडक कारवाई केली. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.यावेळी महसूल विभागामार्फत पंचनामा करण्यात आलेला आहे. सहाय्यक आयुक्त फ प्रभाग यांच्या मार्फत चाळ मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येणार आहे अशी माहिती ६/फ प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांनी दिली आहे.

महापालिकेने स्थानिक नागरिकांच्या सहकार्याबद्दल आभार मानत पावसाळ्यात टेकडीवरील धोकादायक घरे त्वरित रिकामी करण्याचे आवाहन केले आहे.



# पनवेल बस आगारात नवीन बसेस दाखल "प्रितम म्हात्रेंच्याहस्ते नारळ फोडून लोकार्पण"

**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार, परिवहन मंत्री श्री.प्रतापजी सरनाईक, परिवहन राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राची विकासाची घोडदौड सुरू आहे.

त्याचाच एक अध्याय म्हणून पनवेलचे आमदार श्री.प्रशांतजी ठाकूर आमदार श्री. विक्रांतजी पाटील यांच्या पाठपुराव्याने "सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक प्रवासा करीत पनवेलला मिळाल्या नवीन बसेस. लोकांच्या सेवेसाठी वाहतुकीतली नवी पायरी प्रगतीच्या दिशेने आणखी एक



**सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक प्रवासा करीत पनवेल बस आगारात नवीन बसेस दाखल झाल्या. त्याचा नागरिकांना भविष्यात उपभोग घेता येईल. पनवेल बस आगार नव्याने निर्मितीसाठी काही त्रुटी निर्माण झाल्यामुळे काम थांबले आहे. संबंधित विभागाशी योग्य तो पाठपुरावा करून लवकरच प्रवाशांना आगारामध्ये मिळणाऱ्या सुख सुविधा त्यांना उपभोगता येतील यासाठी आम्ही पाठपुरावा घेणार आहोत.**
**- प्रितम जनार्दन म्हात्रे,**
मा.विरोधी पक्षनेते
पनवेल महानगरपालिका

पाऊल आज पडले पनवेलला मिळाल्या अत्याधुनिक बसेस ज्यामध्ये आवश्यकता प्रवाशांसाठी सुख सोयी उपलब्ध आहेत"

आज पनवेल एस.टी. बस स्थानक येथे नवीन बसेसचे लोकार्पण पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. नगरसेवक श्री. गणेशजी कडू, मा. नगरसेविका सौ.प्रीती जॉर्ज, मा.नगरसेविका सौ.सारिका भगत,परिवहन विभागीय वाहतूक अधिकारी श्री.अमित गिरमे, वाहतूक अधिकारी श्री ज्ञानेश्वर म्हात्रे, पनवेल आगार व्यवस्थापक सौ.अश्विनी फाळके, श्री संजय पाटील आणि आजारातील विभागीय कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## मुरुड पोलिसांचे अमली पदार्थविरोधी विशेष कामगिरीबद्दल सन्मान

**मुरुड :** मुरूड पोलिस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे व आठ पोलिस कर्मचाऱ्यांचा अमली पदार्थविरोधी विशेष कामगिरीबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २९ जून रोजी त्यांनी १३ आरोपींना अटक करत सुमारे १७ लाखांचा चरस जप्त केला होता. ही कारवाई सहाय्यक निरीक्षक विजयकुमार देशमुख, भास्कर जाधव, अविनाश पाटील, किशोर बठारे आदींच्या सहभागाने पार पडली. रायगड पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी सन्मानपत्र देऊन गौरव केला व पुढील उत्कृष्ट कार्यासाठी शुभेच्छा दिल्या..

## केमिकल बॅरलची वाहतूक करणारा आयशर उलटला

**रत्नागिरी:** केमिकल बॅरलची वाहतूक करणारा आयशर टेम्पो गुगल मॅपचा आधार घेत गोव्याहून मुंबईच्या दिशेने जात असताना संगमेश्वर तालुक्यातील फूणगूस येथील एका वळणावर उलटला. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला, तर गाडीतील सर्व बॅरल जंगलात घरगळत गेल्याने मोठे नुकसान झाले. मिळालेल्या माहितीनुसार, गुगल मॅपच्या मदतीने शॉर्टकट शोधत ४७ बॅरल घेऊन आयशर टेम्पो (क्रमांक जेजी ३७ बी २२६०) चालक योगेश गिरी गोस्वामी हा टेम्पो घेवून गोवा महामार्गावरून मुंबईकडे जात होता. निवळी येथे आल्यानंतर त्याच्या गुगल मॅपवर फुणगुस आणि ऊक्षी मार्ग दिसला. मात्र ऊक्षी मार्गावरील अवघड वळणामुळे तो जाकादेवी फुणगुस मार्गे संगमेश्वरला निघाला.



## म ह त्त्वा चे

### त्र्यंबकेश्वरमध्ये व्हीआयपी दर्शन पास मध्ये छेडछाड

**त्र्यंबकेश्वर :** प्रथम श्रावणी सोमवार असल्याने ज्योतिर्लिंगासह महादेव मंदिरात भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करत आहेत. त्यानुसार त्र्यंबकेश्वर येथे देखील भाविकांची पहाटेपासून गर्दी आहे. मात्र याठिकाणी ऑनलाईन दर्शन पासमध्ये छेडछाड करून दर्शनाला जाण्याचा प्रयत्न भाविकांकडून करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.
अर्थात ऑनलाईन दर्शन पासचा काळाबाजार पुन्हा एकदा समोर आला आहे. पवित्र श्रावण महिला लागला असून आज प्रथम श्रावण सोमवार आहे. यामुळे महादेव मंदिरात दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. त्यानुसार नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथे देखील पहाटेपासून भाविकांची प्रचंड गर्दी आहे. या गर्दीत तात्काळ दर्शन घेता यावे यासाठी मंदिर समितीने व्हीआयपी दर्शन पासची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र याच व्हीआयपी दर्शन पासमध्ये छेडछाड करून मंदिरात घुसण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आज समोर आले आहे.

### अंगणवाडी मदतनीस महिलेला मारहाण

**नंदुरबार :** मागील महिन्यात अंगणवाडी मदतनीस म्हणून निवड झाली असताना दिलेल्या अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या महिलेला बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना धडगाव तालुक्यातील निमखेडी गावात समोर आली आहे. सुनेची नियुक्ती झाली नसल्याच्या रागातून हि मारहाण झाल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी सदर महिलेने पोलिसात तक्रार दाखल केली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील निमखेडी गावात असलेल्या अंगणवाडी केंद्र क्रमांक 2 मध्ये हा सर्व प्रकार घडला आहे. सदर अंगणवाडी केंद्र क्रमांक २ मध्ये अंगणवाडी मदतनीस पदावर मागील महिन्यात एका महिलेची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार सदर महिला याठिकाणी कामावर हजार झाली आहे. दरम्यान मदतनीस पदासाठी अर्ज केल्यानंतर निवड न झाल्याच्या रागातून महिलेवर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे.

### कृष्णा आणि वारणा नदीवरील 16 बंधारे पाण्याखाली

**सांगली :** सांगली जिल्ह्यात दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस होत आहे. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून सांगलीच्या कृष्णा आणि वारणा नदीवरील १६ बंधारे देखील पाण्याखाली गेले आहेत. इतकेच नाही तर वारणेच्या नदी पात्रातून पाणी बाहेर पडले असल्याने आजूबाजूच्या परिसरातील अनेक शेतांमध्ये पाणीच पाणी साचले आहे. परिणामी शेतातील पिके पाण्याखाली गेले आहेत. राज्यात अनेक भागात पावसाचा जोर वाढला आहे. अनेक भागात मुसळधार पाऊस होत असल्याने पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यानुसार सांगली जिल्ह्यात वारणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यामुळे वारणा व कृष्णा नदीला पूर आला आहे. यामुळे प्रशासनाकडून नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नद्यांना पूर आल्यामुळे आजूबाजूच्या शेतांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. जोरदार पडणारा पाऊस आणि कोयनेतुन होणारा विसर्ग त्यामुळे कृष्णा आणि वारणा नदीपात्रामध्ये पाण्याची वाढ होत आहे. कृष्णा व वारणा नदी पात्रावरील तब्बल १६ बंधारे हे पाण्याखाली गेले आहेत. अनेक शेतांमध्ये पाणी गेले आहे.

# तळकोकणात महायुतीमध्येच जुंपली
## तक्रारीचे पत्र थेट मुख्यमंत्री अन् प्रदेशाध्यक्षांना

प्रतिनिधी
■ सिंधुदुर्ग

रायगड जिल्ह्यात महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातून विस्तव जात नाही. आता सिंधुदुर्गमध्ये शिवसेना आणि भाजप यांच्यात वादाची ठिणगी पडल्याचे समोर आले आहे. शिवसेना महायुतीचा धर्म पाळत नसल्याचा आरोप करत भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी थेट प्रदेशाध्यक्ष आणि मुख्यमंत्र्यांना यातून मार्ग काढण्याचे साकडे घातले आहे. या संदर्भात भाजपचे सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांनी शिवसेनेवर हल्लाबोल करत भाजपचे ज्येष्ठ नेते नारायण राणे यांना गुरुस्थानी मानणाऱ्या शिवसेनेच्या जिल्हाध्यक्षावर प्रहार करत हिच का तुमची वेगळ्या पद्धतीने गुरुदक्षिणा, असा सवाल केला आहे.



सिंधुदुर्गमध्ये भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विविध प्रलोभने दाखवून शिवसेनेत घेतले जात आहे, असा गंभीर आरोप भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांनी केला आहे. जिल्ह्यात शिवसेना वाढवताना शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष कुडाळ,मालवण आणि सावंतवाडी मतदारसंघात भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते फोडत आहेत. हे महायुतीच्या आचारसंहितेच्या विरुद्ध असल्याची टीका सावंत यांनी केली आहे. त्याचवेळी आम्ही गप्प आहोत म्हणजे पुढे स्वस्त बसू असा होत नाही, हेही त्यांनी सुनावले आहे. एकूणच शिवसेनेच्या पक्षवाढीच्या प्रयोगामुळे भाजपमध्ये प्रचंड नाराजी आहे.

लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. मात्र, शिवसेना ज्या पद्धतीने भाजप कार्यकर्त्यांना प्रलोभने दाखवून शिवसेनेत प्रवेश देत आहे, हे पाहता भाजप आणि शिवसेने यांच्यातील संबंध ताणले जाण्याची शक्यता आहे. ही बाब प्रभाकर सावंत यांनी अधोरेखित करताना आता आमचे कार्यकर्ते प्रत्येक बैठकीत स्वबळावर निवडणूक लढवण्याची मागणी करत असल्याचे सांगितले. त्याचवेळी आम्ही मनात आणले तर दुप्पटीने पक्षप्रवेश करू शकतो. मात्र, आम्ही युतीचा धर्म पाळत आहोत, असेही प्रभाकर सावंत यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजप आणि शिवसेनेतील संबंध ताणले गेल्याचे स्पष्ट झाले आहे. याची सविस्तर माहिती प्रभाकर सावंत यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून कळवली आहे. त्यामुळे आता या वादावर भाजपकडून काय भूमिका घेतली जाईल, याकडे सिंधुदुर्ग भाजपचे लक्ष लागले आहे.

# नागपूरमध्ये बीअर बारमधून सरकारी कारभार, शासकीय फाईल्सवर सह्या

■ नागपूर

नागपुरात एका बियर बारमध्ये चक्क शासकीय फाईल घेऊन तीन व्यक्ती बसून मद्यपान करीत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून यानंतर राजकीय वातावरण तापले आहे. विरोधकांनी सरकारला लक्ष्य केले आहे. मनीष नगर येथील एका बारमध्ये दुपारच्या सुमारासचा हा व्हिडिओ असल्याची माहिती असून त्यातील एक जण दारूचे घोट घेत शासकीय फायली पडताळताना या व्हिडिओत दिसत आहे.

अर्थातच आता महाराष्ट्र शासनाच्या फायलींचा गठ्ठा घेऊन बारमध्ये बसलेले 'हे' अधिकारी नेमके कोण होते, 'ते' कोणत्या विभागाचे होते आणि 'त्यांनी' कोणत्या महत्त्वाच्या फायलींवर बारमध्ये येऊन काही कामकाज केले का, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. रविवारच्या सुट्टीच्या दिवशी दारूचे घोट रिचवत बीअर बारमध्ये चक्क 'शासन कारभार' सुरू झाल्याची टीका आता समाज माध्यमांमधून केली जात आहे.

व्हिडिओ व्हायरल होताच या व्हिडिओमुळे प्रशासनाच्या



कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, नागपुरातील मनीषनगर भागातील एका प्रसिद्ध बीअर बारमधील हा प्रकार असून दुपारी 3.30 च्या सुमारास तीन व्यक्ती बारमध्ये आले. त्यावेळी त्यांनी आपल्या सोबत एक फायलींचा मोठा गठ्ठा आणला होता. यावेळी त्यांनी दारूची ऑर्डर दिली आणि टेबलवर शासकीय फायलींचा गठ्ठा उघडत त्यांची पडताळणी करण्यास सुरुवात केली. मात्र हे अधिकारी नेमके कोण आणि कोणत्या विभागाचे आहेत हे अद्याप कळू शकलेले नाही. या बारमध्ये जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास, 'हे' अधिकारी कोण हे नक्कीच उघड होणार आहे.

**महिला कर्मचाऱ्याचाही व्हिडिओ**

दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यातील एका महिला वीज कर्मचाऱ्यांची वसुलीच्या नावावर धाब्यावर ओली पार्टी प्रकारही व्हायरल झाला आहे. यवतमाळच्या नेर येथे एमएससीबीच्या कार्यालयातील महिला अधिकारी वसुलीसाठी गेल्या असता ऑन ड्युटी धाब्यावर ओली पार्टी केल्याचे समोर आले आहे. यावेळी महिला कर्मचारी मद्यप्राशन करून अर्वाच्च्य भाषेचा वापर करीत आहे. हा व्हिडिओ सध्या जिल्ह्यात सोशल मीडियावर व्हायरल आहे.

# शनिशिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त नितीन शेटे यांची आत्महत्या

प्रतिनिधी
■ शनिशिंगणापूर



शनिशिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त नितीन शेटे यांनी आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सकाळी त्यांच्या राहत्या घरी घडली. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट नाही. पोलिसांकडून सध्या तपास सुरू असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

शनिशिंगणापूरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शनिशिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त आणि सध्याचे उप कार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांनी सोमवारी सकाळी आपल्या राहत्या घरी छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सकाळी उघडकीस आल्यानंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून गावात शोककळा पसरली आहे. दरम्यान, त्यांनी आत्महत्या का केली? अद्याप कारण अस्पष्ट आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

नितीन शेटे हे शनिशिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त आणि सध्याचे उप कार्यकारी अधिकारी होते. त्यांचा सोमवारी सकाळी राहत्या घराच्या छताला लटकलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. त्यांनी आत्महत्या केली. याची माहिती गावात पसरताच खळबळ उडाली.

# शिवीगाळ करत तरुणावर कोयत्याने हल्ला, मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल

प्रतिनिधी
■ बीड

बीडमध्ये मारहाणीचा नवा व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये एका तरुणाला कोयत्याने धमकावल्याचे पाहायला मिळते. तरुणाला मारहाण करतानाच्या व्हिडीओमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

बीडमधून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीडमध्ये दहशतीचा पुन्हा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये एका तरुणाला जबर मारहाण झाल्याचे पाहायला मिळते. ही घटना बीड शहरातील बार्शी नाका परिसरात घडल्याचे म्हटले जात आहे.



या प्रकरणी पोलिसांकडून अजूनपर्यंत कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याची माहिती समोर आली आहे.

मागील काही महिन्यात बीडमध्ये मारहाण करतानाचे व्हिडीओ काढून ते सोशल मीडियावर व्हायरल केले जात आहे. असे व्हिडिओ काढून प्रसारित करणाऱ्यांवर बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कठोर कारवाई करण्याचे दिले आहेत. असे असतानाही तेलगाव नाका परिसरात सत्तुर येथे कोयता घेऊन एका तरूणाला त्याची भिती दाखवत नंतर त्याच कोयता आणि सत्तुरने त्याच्यावर हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

चार ते पाच गुंडांनी रस्त्यावर अडवून त्या तरूणाला मारहाण करत असल्याचा व्हिडीओ देखील बनवला आहे. या हल्ल्यात तरूण गंभीररित्या जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रूग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. दरम्यान मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल होऊनही पोलीसांनी अद्यापपर्यंत गुन्हा दाखल केलेला नाही. मारहाणीचे व्हिडीओ सर्रास व्हायरल होत असतानाही पोलीस अशा प्रकरणांमध्ये गांभीर्याने घेत नसल्याचे या प्रकारावरून दिसून येते.

# अंधश्रद्धेचा कहर! बाहुली, नारळ, लिंबू अन् एक चिठ्ठी
## कोल्हापुरात घटस्फोटासाठी अघोरी प्रकार

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

कोल्हापूरच्या भुदरगड तालुक्यातील कुर परिसरात स्मशानभूमीमध्ये एक अघोरी प्रकार उघडकीस आला आहे. एका महिलेने आपल्या पतीपासून 'सोडचिठ्ठी' देऊन वेगळं व्हावं आणि आणखी तीन जणांचे (त्यातील दोन महिला) यांचं आयुष्य उद्ध्वस्त होण्यासाठी हा अघोरी प्रकार केला गेल्याचा संशय आहे.

गावातील स्मशानभूमीत करण्यात आलेला हा अघोरी प्रकार नुसता चर्चेचा नव्हे, तर ग्रामस्थांमध्ये भीती आणि संतापाची लाट



निर्माण करणारा बनला आहे. दोन दिवसांपूर्वी भुदरगड तालुक्यातील कुर गावात एका नागरिकाच्या अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत तयारी सुरू होती.

काही मंडळी साफसफाईसाठी स्मशानभूमीत गेले असता त्यांना बाहुली, नारळ, लिंबू, लोखंडी खिळे, गुलाल आणि हाताने लिहिलेला कागद आढळला. उत्सुकतेपोटी त्यांनी कागद उघडून वाचला असता, त्यावर एका महिलेचं नाव नमूद करून 'सोडचिठ्ठी द्यावी' असा मजकूर होता. त्याचबरोबर आणखी तिघांची नावं लिहून "त्यांची वाट/भट्टी लागू द्या" असेही लिहिलं होतं. या घटनेमुळे गावभर उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत.

# कशेडी घाटात दरड कोसळू नये म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीनं महत्त्वाचं पाऊल, घाटात जाळी बसवण्याचे काम सुरु

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

कोकण, गोवा येथे पिकनिकला जाणाऱ्यांसाठी कशेडी घाट हा एक मोठा अडथळा होता. रहदारी नसतानाही घाट चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी सुमारे 40 मिनिटे ते एक तास लागत होता. आता हा प्रवास सोपा झाला असून, कशेडी घाटात बांधण्यात आलेले दोन्ही बोगदे वाहतुकीसाठी खुले करण्यात आलेले आहेत. या बोगद्यांमुळे कशेडी घाटातील 40 मिनिटांचा प्रवास फक्त 8 ते 10 मिनिटांत पूर्ण



करता येणे शक्य होत आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून घाटात दरडी कोसळण्याच्या घटना वाढीस लागल्या असून, जाळी बसवण्याचे काम सुरू आहे.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असलेल्या कशेडी घाटात पावसाळ्यात दरवर्षी दरडी कोसळण्याच्या घटना घडत असतात. त्यामुळे घाट बंद होणे, वाहतूक ठप्प होणे, तसेच काही वेळा अपघातासारख्या दुर्दैवी घटनादेखील घडतात. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने घाटातील धोका कमी करण्यासाठी महत्त्वाची पावलं उचलली असून, सध्या कशेडी घाटात दरड कोसळू नये म्हणून विशेष प्रकारच्या जाळ्या बसवण्याचे काम हाती घेण्यात आलंय.

## येशूलाच देव माना, इतर कुठलेही देव नाहीत!
# हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात परिवर्तन करण्याचा प्रयत्न, दोघांना अटक

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातील पिंपरी कॅम्पमध्ये धर्मांतर करण्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अमेरिकन नागरिक आणि भारतीय वंशाच्या नागरिकाला पिंपरी पोलिसांनी अटक केली आहे. येशूला देव माना इतर कुठलेही देव नाहीत. ख्रिश्चन धर्मात प्रवेश केल्यास सुख, समृद्धी लाभेल असे म्हणून पिंपरी कॅम्प येथे धर्मपरिवर्तनाचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेफर जाविन जेकॉब , स्टीव्हन विजय कदम अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहेत. यांच्यासह 16 वर्षीय बालकाचा यात समावेश आहे. नोटीस देऊन पिंपरी पोलिसांनी त्याला सोडून दिले आहे. पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक असलेल्या शेफर जेकॉब आणि स्टीव्हन कदम हा हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होता. नागरिकांच्या घराबाहेर जाऊन त्यांना आवाज देऊन येशू विषयी माहिती दिली जात होती.

ख्रिश्चन धर्म किती श्रेष्ठ आहे, हे सांगितलं जातं होत. ख्रिश्चन धर्म वगळता कुठलाच धर्म महत्वाचा नाही. या विश्वासात केवळ येशूच आहे. इतर धर्म केवळ कथा आहेत. इतर देवतांना न मानता तुम्ही येशूला माना असे सांगून नागरिकांना धर्मांतर करण्याचा प्रयत्न अमेरिकन नागरिक आणि भारतीय नागरिक असलेला स्थिव्हन कदम करत होता. ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन केल्यास तुम्हाला सुख, समृद्धी, आरोग्य लाभेल. अस नागरिकांना पटवून दिले जात होत. पैशांचा देखील अमीष दाखवलं जात होतं. अखेर याप्रकरणी काही सजग नागरिकांनी थेट पिंपरी पोलीस ठाणे गाठून सर्व प्रकार सांगितला. पिंपरी पोलिसांनी तात्काळ अमेरिकन नागरिक आणि भारतीय नागरिकाला अटक केली आहे. अमेरिकन नागरिक शेफर जेकॉब हा एक वर्षाच्या मुदतीवर भारतात आलेला आहे.

पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक असलेल्या शेफर जेकॉब आणि स्टीव्हन कदम हा हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होता. येशूलाच देव माना, दुसरा कोणताही देव नसल्याची माहिती हे दोघे नागरिकांना देत होते. ख्रिश्चन धर्मात सुख, समृद्धी लाभेल असे म्हणून पिंपरी कॅम्प येथील नागरिकांचे धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

# पंचायत समिती इमारतीच्या भूमीपूजनावरून श्रेयवादाची लढाई

प्रतिनिधी
■ नंदुरबार

धडगाव पंचायत समितीच्या कार्यालय बांधकामाचे भूमिपूजन पार पडले आहे. मात्र या एकाच कामाचे भूमिपूजन दोनदा झाले आहे. अर्थात इमारत उभारणीवरून भाजप आणि शिवसेना आमने सामने आले असून यावरून दोन्ही पक्षात श्रेय वादाची लढाई सुरु झाली आहे. तर यावरून आमदार आमश्या पाडवी यांनी नाव न घेता गावित परिवार हल्लाबोल केला आहे.



नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा- अक्राणी मतदार संघाचे आमदार आमश्या पाडवी यांनी धडगाव पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजनावरून भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये सुरू असलेल्या श्रेयावादाच्या लढाईवर आपले मत व्यक्त केले आहे. आमदार पाडवी यांच्या म्हणण्यानुसार धडगाव येथील पंचायत समितीच्या नवीन इमारतीसाठी जमीन मंजूर झाली असून आज त्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे. ते म्हणाले की ही इमारत अतिशय चांगली होणार आहे. त्यांनी खास करून या इमारतीच्या मंजुरीसाठी प्रयत्न केलेल्या सभापतींचे आणि इतर पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

आमश्या पाडवी यांनी असेही सांगितले की, काही लोकांना अजूनही असे स्वप्न पडत आहे की ही वस्तू त्यांची आहे आणि त्यांनी ती करायला पाहिजे. कोणतेही सरकार असो, जेव्हा एखादी वास्तू मंजूर होते, तेव्हा जो आमदार किंवा जिल्हा परिषद सदस्य असतो. त्याला त्याचे अधिकार असतात. काही लोक अजूनही स्वतःला मंत्री, अध्यक्ष किंवा खासदार समजत आहेत.

# वाल्मीक कराडला माझे हातपाय तोडताना पाहायचे होते, त्याच्यामागे धनंजय मुंडेंची ताकद
## शरद पवार गटाच्या शिवराज बांगर यांचा गौप्यस्फोट

प्रतिनिधी
■ बीड

कृषिमंत्री असताना धनंजय मुंडे यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरवत क्लीन चिट दिली आहे. आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शिवराज बांगर यांनी एक मोठा आणि खळबळजनक दावा करत धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत. तसेच, वाल्मीक कराडला माझे हातपाय तोडताना थेट पाहायचे होते, असेही त्यांनी म्हटले आहे.

बीड येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेत



शिवराज बांगर यांनी धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्याबद्दल धक्कादायक गौप्यस्फोट केले आहेत. वाल्मीक कराडने माझ्या खुनाची सुपारी दिली होती. त्याला माझे हातपाय तोडताना लाईव्ह पहायचे होते. ज्याला सुपारी दिली त्या सनी आठवले याने माझा खून केला नाही. त्यामुळे त्या सनी आठवलेला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले, असे बांगर यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना शिवराज बांगर म्हणाले, परळी येथील व्यापारी महादेव मुंडे खून प्रकरणानंतर आता सरपंच बापू आंधळे यांचा खून देखील वाल्मीक कराड यांच्या सांगण्यावरूनच झाला असल्याचा दावा बांगर यांनी केला आहे. वाल्मीक कराड हा प्यादा आहे. वाल्मीक कराडच्या पाठीमागे धनंजय मुंडे यांची ताकद होती. त्याच ताकदीने हे सर्व करून घेतलेले आहे. त्यामुळे मेरी कोई गलती नही असे धनंजय मुंडे म्हणू शकत नाहीत, असा आरोप बांगर यांनी केला आहे.

बापू आंधळे यांची हत्या गोट्या गीते आणि गॅंगने वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून केली. त्या गुन्ह्यामध्ये महादेव गीतेला गोळ्या घातल्या तो जेलमध्ये आहे. विधानसभेला बबन गीते आडवा येईल म्हणून ही हत्या केली. तसेच एसआयटी नेमून बापू आंधळे खून प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी शिवराज बांगर यांनी केली आहे.

### ज्येष्ठ कादंबरीकार शुभांगी भडभडे यांचे नागपूरमध्ये निधन

**नागपूर :** ज्येष्ठ कादंबरीकार शुभांगी भडभडे यांचे नागपूरमध्ये निधन झाले. त्या 83 वर्षांच्या होत्या. शुभांगी भडभडे यांचा जन्म 21 डिसेंबर 1942 रोजी झाला होता. त्यांनी चरित्रात्मक कादंबऱ्या, सामाजिक कादंबऱ्या, कथासंग्रह, नाटक, एकांकिका, प्रवासवर्णन, ललित लेखसंग्रह, बालसाहित्य असे विपुल लेखन केले. वयाची 80 पूर्ण झाल्यानंतरही त्यांचे लेखन सुरू होते. शुभांगी भडभडे या साहित्य क्षेत्रातील उत्तम संघटकही होत्या. वैदर्भीय लेखकांना व्यासपीठ देण्यासाठी त्यांनी पद्मगंधा प्रतिष्ठानची स्थापना केली.

# चेंबूर जिमखाना राज्य स्पर्धेत समृद्धी झैद जेते

**मुंबई :** महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बँक ऑफ बडोदा पुरस्कृत ४ थ्या चेंबूर जिमखाना राज्य मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटातील अंतिम सामन्यात ठाण्याच्या झैद अहमदने मुंबईच्या विकास धरायला २५-०, २५-१८ सरळ दोन सेटमध्ये पराभूत केले आणि या गटाचे विजेतेपद पटकावले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या प्रशांत मोरेने रायगडच्या राजेश गोहिलचा १५-२५, २५-२१ व २५-१६ असा पराभव केला. अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी मुंबईच्या विकास धारियाने रायगडच्या राजेश गोहीलवर २५-४, १२-२०, ९-८ असा चुरशीचा विजय मिळवला होता. तर ठाण्याच्या झैद अहमदने प्रशांत मोरेवर २२-१८, २०-८ अशी सरळ दोन सेटमध्ये मात करून सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता. महिला एकेरीच्या अंतिम लढतीत ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत मुंबईच्या अंबिका हरिथला ३-१६, २५-५ व २५-१७ असे हरवून या गटाचे विजेतेपद पटकावले. विजेत्या खेळाडूंना बँक ऑफ बडोदा चेंबूर शाखेचे मॅनेजर शशिकांत नाईक व चेंबूर जिमखान्याचे अध्यक्ष बाळकृष्ण वधावन यांच्या हस्ते रोख पारितोषके, चषक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष यतिन ठाकूर, मानद सचिव अरुण केदार, खजिनदार अजित सावंत, सहसचिव केतन चिखले आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेचे कार्याध्यक्ष संतोष चव्हाण आणि जिमखान्याचे कॅरम आणि बुद्धिबळ विभागाचे सचिव बाळकृष्ण परब उपस्थित होते.



### भायखळ्यात रंगला पावसाळी व्हॉलीबॉलचा थरार

# गणेश इलेव्हन हत्तीबाग अजिंक्य तर ताराबाग सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाला उपविजेतेपद



प्रतिनिधी
■ मुंबई

पावसाची रिमझिम... खेळाडूंचा ओसंडून वाहणारा उत्साह... आणि क्रीडाप्रेमींची प्रचंड गर्दी... अशा जल्लोषपूर्ण वातावरणात शिवसेना भायखळा, शाखा क्र. २१० आयोजित "माजी आमदार चषक २०२५"ही भव्य हॉलिबॉल स्पर्धा संपन्न झाली. तब्बल १६ संघांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत गणेश इलेव्हन हत्तीबाग या संघाने विजेतेपद तर ताराबाग सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ संघाने उपविजेतेपद पटकावले. माझगांवच्या लाल मैदान संघाला तिसरे तर ताडवाडीच्या प्रतिज्ञा क्रीडा मंडळाला चौथे स्थान मिळाले.

उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या दिमाखदार स्पर्धेचे उदघाटन ताराबाग ऐक्यवर्धक सोसायटी, ताराबाग, माझगांव येथे शिवसेना उपनेते तथा विभागप्रमुख यशवंत जाधव यांच्या हस्ते शनिवारी २६ जुलै करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थित संघांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. माजी आमदार सौ. यामिनी यशवंत जाधव प्रमुख उपस्थित होत्या. भायखळा परिसरातील तब्बल १६ संघांच्या सहभागामुळे ही स्पर्धा लक्षवेधी ठरली.

रविवारी रात्री उशीराने स्पर्धेचे उपांत्य आणि अंतिम फेरीचे सामने झाले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पावसाच्या रिमझिम हजेरीने खेळाडूंचा उत्साह आणखी वाढत होता. सध्या सर्वत्र क्रिकेट आणि कबड्डी स्पर्धांचा बोलबाला असताना हॉलिबॉल सारखी स्पर्धा यशस्वी केल्याबद्दल संयोजकांचे क्रीडाप्रेमींनी विशेष कौतुक केले. शिवसेना भायखळा विधानसभा समन्वयक संतोष राणे आणि शाखा क्र. २१० चे शाखाप्रमुख राकेश खानविलकर यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

उदघाटन समारंभाला तसेच पारितोषिक वितरण समारंभाला शिवसेनेचे भायखळा विधानसभाप्रमुख विजय (दाऊ) लिपारे, समन्वयक संतोष राणे, संघटक कृष्णा रेणोसे, सह समन्वयक हेमंत मयेकर, प्रशांत आडारकर, सह संघटक उदय बेलवलकर, उपविभाग प्रमुख देवेंद्र कदम, शाखा क्रमांक २१० शाखाप्रमुख राकेश खानविलकर, मेघा भोईर, गौरव कासले, ओंकार पवार तसेच शिवसेनेतील अन्य सहकारी आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेळ महत्त्वाचा, पण दहशतवाद नाही - सौरभ गांगुली

वृत्तसंस्था
■ कोलकाता

आशिया कप २०२५ मधील भारत-पाकिस्तान सामन्याबाबत माजी क्रिकेटपटू सौरभ गांगुली म्हणाले, खेळ सुरू राहिला पाहिजे. पण पहलगामसारख्या घटना घडू नयेत.ही स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान यूएईमध्ये होणार आहे. भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय तणावामुळे ही स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच चर्चेत आहे.

यावेळी आशिया चषकात भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकाच गटात आहेत. अशा परिस्थितीत दोन्ही संघांमध्ये अनेकवेळा आमनेसामने येऊ शकतात.त्यावर गांगुली यांनी आपले मतप्रदर्शन केले आहे.

### आशिया कपमध्ये भारत-पाकिस्तान आमनेसामने येणार



**ही स्पर्धा टी-२० स्वरूपात असेल**

यावेळी आशिया कप टी-२० स्वरूपात खेळला जाईल. २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाची तयारी म्हणूनही याकडे पाहिले जात आहे.

**दहशतवाद थांबला पाहिजे - गांगुली**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर माजी भारतीय कर्णधार सौरव गांगुलीने आपले मत मांडले. ते म्हणाले,, ठीक आहे. खेळ चालू राहिले पाहिजेत. पण पहलगामसारख्या घटना घडू नयेत. दहशतवाद थांबला पाहिजे. भारताने नेहमीच दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे... पण खेळ चालू राहिले पाहिजेत. गांगुलीचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा भारताच्या पाकिस्तानसोबत खेळण्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.यापूर्वी, पाकिस्तानचा माजी खेळाडू दानिश कनेरियाने भारताला प्रश्न विचारला होता की, जेव्हा भारताने देशभक्तीमुळे जुलैमध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स (WCL) मध्ये पाकिस्तानविरुद्ध सामना खेळला नाही, तर आता आशिया कपमध्ये कसा खेळेल? या विधानावरून आता वाद पेटला आहे.

# महिला कुस्ती विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा

### 10 पैकी 7 जणी हरियाणाच्या, काजल-नेहाला संधी

### 42 कुस्तीपटूंचा ट्रायल्समध्ये सहभाग



वृत्तसंस्था
■ रेवाडी

बल्गेरिया येथे होणाऱ्या महिला अंडर-२० जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये चाचण्या घेण्यात आल्या, ज्यामध्ये देशभरातील ४२ महिला कुस्तीगीरांनी भाग घेतला.

निवडलेल्या १० सदस्यीय संघात ७ महिला कुस्तीगीर हरियाणाच्या आहेत, तर ३ दिल्लीच्या आहेत. १७ वर्षांखालील स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या सोनीपतच्या काजलला ७२ किलो वजनी गटात संधी मिळाली आहे. नेहा सांगवानला ५९ किलो वजनी गटात संघात स्थान देण्यात आले आहे.

चाचण्यांदरम्यान, भारतीय कुस्ती संघटनेचे अध्यक्ष संजय सिंह, ऑलिंपिक पदक विजेता योगेश्वर दत्त, कोषाध्यक्ष एस.पी. देसवाल, उपाध्यक्ष ऑलिंपियन जयप्रकाश पहेलवान आणि हरियाणा कुस्ती संघटनेचे अध्यक्ष रमेश बोहर हे देखील उपस्थित होते.

**नेहाकडून पुन्हा गोल्डची अपेक्षा**

चरखी दादरी जिल्ह्यातील फोगट बहिणीच्या गावातील नेहा सांगवानने जॉर्डनमध्ये झालेल्या १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे. नेहाने जागतिक रँकिंग मालिकेत ४ कुस्तीगीरांना हरवून सुवर्णपदक जिंकले आहे. नेहाचे वडील अमित कुमार आणि कुस्ती प्रशिक्षक सज्जन सिंग यांनी सांगितले की, नेहा बल्गेरियामध्येही सुवर्णपदक जिंकेल अशी अपेक्षा आहे.

# भारतात नव्या आयुर्वेदिक उत्पादनांची अपोलो आयुर्वेदकडून घोषणा

**मुंबई:** भारताचे अग्रगण्य आयुर्वेद रुग्णालयाचे नेटवर्क म्हणून अपोलो आयुर्वेद प्रसिद्ध आहे. अपोलो रुग्णालयाला नॅशनल ॲक्रिडिटेशन बॉर्ड फॉर हॉस्पिटल्स ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच)कडून मान्यताही मिळाली आहे. अपोलो आयुर्वेद रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना विविध आजारांवर परिणामकारक उपचार दिले जातात. आपल्या वैद्यकीय सेवेसाठी प्रसिद्ध असलेल्या अपोलो आयुर्वेदने आता आयुर्वेदिक उत्पादन क्षेत्रात प्रवेश केला आहे. आयुर्वेदिक उत्पादनांची निर्मिती हा अपोलो आयुर्वेदचा महत्त्वपूर्ण विस्तार मानला जात आहे. अपोलो आयुर्वेदकडून आता पारंपरिक आयुर्वेदिक औषधांची उत्पादने तयार केली जातील. रुग्णांना ही उत्पादने थेट दुकानातून विकत घेण्याची सोय उपलब्ध असेल. यासह अपोलो आयुर्वेद रुग्णांना आजारांतून बरे करण्यासाठी आवश्यक असलेल्या खाद्यपदार्थांचीही निर्मिती करेल. देशात आयुर्वेदिक उत्पादनांची वाढती मागणी लक्षात घेता, अपोलो आयुर्वेदने हा निर्णय जाहीर केला आहे.

# खिंडीपाडा मनपा मराठी शाळेची पुनर्बांधणी करून पूर्ववत सुरु करा - शिक्षक परिषद

प्रतिनिधी
■ मुंबई

धोकादायक इमारत झालेल्या भांडुप, खिंडीपाडा मनपा मराठी शाळा या शाळेतील एकही विद्यार्थी तुळशेत पाडा या शाळेत स्थलांतरित न झाल्याने खिंडीपाडा मनपा मराठी शाळा बंद झाली आहे. केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामूळे या शाळेचा शेवट झाला आहे. ती बंद झाली आहे. खिंडीपाडा मनपा शाळा परिसरातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय करण्यासाठी इमारतीचे नवीन बांधकाम करून शाळा पूर्ववत सुरु करण्याचे तात्काळ निर्देश द्यावेत अशी विनंती. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद-मुंबई विभाग अध्यक्ष सुहास हिर्लेकर आणि कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळा गैरव्यवस्थापणामुळे बंद झाल्याची काही उदाहरणे समोर येत आहेत. एस वॉर्डातील ही खिंडीपाडा मनपा मराठी शाळा जिल्हाधिकारी यांच्या जागेत बांधकेली आहे. ही शाळा जीर्ण अवस्थेत असताना दुरुस्तीसाठी मनपा शिक्षण विभागातील कनिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार पत्रव्यवहार केले. वर्षभर मुले त्याठिकाणी वर्गव्यवस्थेविना बसत होती. सतत प्रयत्न करूनही शाळा दुरुस्त होत नसल्याने धोकादायक अवस्थेत असलेल्या या शाळेत जून २०२५ पासून एकच शिक्षिका कायम स्वरूपी शिक्षिका होत्या.

यानंतर ही शाळा ३ किमी अंतरावर असलेल्या तूळशेत पाडा, भांडूप याठिकाणी स्थलांतरित केली. या शाळेत बालवाडीसह ८० विद्यार्थी अध्ययन करत होते. एवढ्या दूर अंतरावर विद्यार्थ्यांना ये जा करण्यासाठी बसची व्यवस्था न केल्याने १०० % विद्यार्थी खाजगी शाळेत निघून गेले आहेत.असे शिवनाथ दराडे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.



*मुंबई : स्व.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाणारे, अत्यंत संयमी, शांत आणि अभ्यासू नेतृत्व, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना जन्मदिनानिमित्ताने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे आणि जनरल सेक्रेटरी हनुमंत ताटे.*

# मुंबई महानगरपालिकेत 8 हजार कंत्राटी कामगार कायम होणार

### लाड पागे समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी निश्चित, पालिका - कामगार संघटनांमध्ये करार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या संघर्षाला मोठे यश आले असून तब्बल ८ हजार कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. कामगार संघटनांच्या नेतृत्वाखाली झालेल्या संघर्षाला यश येत पालिका प्रशासन आणि संघर्ष समिती यांच्यात २२ जुलै रोजी झालेल्या बैठकीनंतर सोमवारी अधिकृत करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.सदर करारानुसार, घनकचरा व्यवस्थापन व परिवहन विभागातील कोणतेही पद कमी करण्यात येणार नाही, तसेच कोणतेही यानगृह बंद केले जाणार नाही. सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा व शर्ती त्या-त्याच स्वरुपात कायम ठेवण्यात येणार आहेत. मोटर लोडर संवर्गातील ७०-७५ टक्के कर्मचाऱ्यांना सध्याच्या कामाशी सुसंगत काम दिले जाईल, तर उर्वरित कर्मचाऱ्यांसाठीही तत्काळ उपाययोजना करण्यात येणार आहेत.



मुंबई महापालिकेच्या घनकचरा विभागात खासगीकरणाच्या विरोधात सर्व कामगार संघटना एकत्र येत संप पुकारण्याचा निर्णय घेतला होता. त्याआधी आंदोलने. मोर्चे काढून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. कामगार संघटनांच्या नेतृत्वाखाली झालेल्या संघर्षाला यश येत पालिका प्रशासन आणि संघर्ष समिती यांच्यात २२ जुलै रोजी झालेल्या बैठकीनंतर सोमवारी अधिकृत करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यामुळे कामगारांच्या आंदोलनाला यश आले असल्याचे संघर्ष समितीने म्हटले आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, लाड पागे समितीच्या शिफारसींची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णय क्रमांक सफाई-२०१८/प्र.क्र.४६/ सआक, दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ च्या अंमलबजावणीसाठी ४५ दिवसांत लाभार्थी कामगार निश्चित करण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन केली जाणार आहे. तसेच, न्यायालयात प्रलंबित असलेल्या कंत्राटी कामगारांच्या कायमपणाच्या मागण्यांबाबत स्वतंत्र समिती गठीत करून ६० दिवसांत प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि त्या दरम्यान कोणत्याही कामगाराला सेवेतून कमी केले जाणार नाही. हे कामगार कायम झाल्यानंतर त्यांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांचा मागोवा घेऊन ती मागे घेतली जातील. याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सर्व सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळवून देण्यासाठी महापालिका आयुक्त स्वतः शासनाकडे पाठपुरावा करणार आहेत.महापालिकेच्या दिनांक १४ मे २०२५ च्या घनकचरा संकलन व व्यवस्थापनाच्या निविदेला कामगार संघटनांचा विरोध न राहता संबंधित न्यायप्रविष्ट प्रकरणेही मागे घेण्यात येणार आहेत.

हा करार म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समितीतील दि म्युनिसिपल युनियन, म्युनिसिपल मजदूर युनियन, कचरा वाहतूक श्रमिक संघ यांसह अन्य नोंदणीकृत संघटनांच्या पुढाकाराने साकार झाला असून, यामुळे पालिका क्षेत्रातील हजारो कुटुंबांना स्थैर्य आणि सुरक्षिततेचा दिलासा मिळाला आहे, असे समितीचे अध्यक्ष अशोक जाधव, निमंत्रक वामन कविस्कर, बाबा कदम, रमाकांत बने यांनी सांगितले. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल सफाई कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत राज्य ट्रक, टेम्पो, टँकर, बस वाहतूक महासंघाचा मेळावा




प्रतिनिधी
■ मुंबई

रविवार महाराष्ट्र राज्य ट्रक टेम्पों टँकर बस वाहतूक महासंघाचा राज्यव्यापी महामेळावा जेष्ठ समाजसेवक डॉ. पद्मभूषण अणणासाहेब हजारे यांच्या अध्यक्षतेखाली, कायदेतज्ञ प्रसाद लकेश्री व सुरेंन्द्र लोखंडे यांच्या उपस्थितीत राळेगणसिद्धी येथे संपन्न झाला. यावेळी महासंघाचे सर्व कार्यकर्ते व सभासद उपस्थित होते,

अण्णांनी वाहतूक दाराच्यां समस्या व अडचणी समजून घेतल्यानंतर ,महासंघाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, मी वाहतूकदाराच्यां समस्या व अडचणी दुर करण्यासाठी प्रयत्नशील राहील, असे त्यांनी वाहतूक दारांना आश्वासन दिले, तर महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र सकपाळ, सरचिटणीस भगवान महाराज आव्हाड, उपाध्यक्ष - शंकरराव चिंचकर दादा, उपाध्यक्ष - श्री बाबासाहेब सानप , उपाध्यक्ष बस विभाग मुंबई ठाणे जिल्हा संजय झुरळे, सचिव प्रकाश माने, सचिव संभाजी पाटील, सचिव बटेसिंग राजपूत , पुणे शहर अध्यक्ष शशिकांत डोबें , पुणे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत हरफळे, अध्यक्ष सातारा जिल्हा प्रीतम हातेकर , पिंपरी चिंचवड अध्यक्ष अविनाश तांबे, सदस्य राजु गोरे, सदस्य देवेंद्र राजपूत, खजिनदार महेश राऊत , उपखजिनदार दतात्रय ईलग , समन्वयक श्री सलीम शेख, नॅशनल हायवे विषय तज्ञ श्री हरबन सिंग पालघर, कराड तालुका अध्यक्ष अल्ताफ भाई सवार अध्यक्ष ऑल इंडिया ट्रक्स अँड ड्रायव्हर हेल्पलाईन इस्माईल भाई , अध्यक्ष अमरावती जिल्हा अफसर भाई, बिड जिल्हा अध्यक्ष काकडे साहेब, अध्यक्ष शिरवळ मोटर मालक संघटना विजय नेवसे, महाराष्ट्र राज्य मोटर मालक संघ अध्यक्ष कैलास शेठ पिंगळे, परशुराम ( बाळु शेठ) कटके, रमनजी खोसला महाराष्ट्रातून आलेले सर्व जिल्ह्यातील वाहतूकदार सघटनेचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

# ज्येष्ठ पत्रकार राजन पारकर यांना पितृशोक



**मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार राजन पारकर यांचे वडील. दत्तात्रय नारायण पारकर यांचे सोमवारी सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी निधन झाले. राजन पारकर यांचे मोठे बंधू यांच्या 'पारकर सदन', कुलकर्णी वाडी, गणेश मंदिर समोर, जंगलेश्वर महादेव मंदिर मार्ग, घाटकोपर पश्चिम येथील निवासस्थानी त्यांचे निधन झाले. या निवासस्थानातून कै. दत्तात्रय पारकर यांची अंत्ययात्रा मोक्ष रथातून भटवाडी स्मशानभूमी, घाटकोपर पश्चिम येथे गेली. समाजातील सर्व स्तरातील नागरिक, पत्रकार मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. राजन यांनी पार्थिवास अग्नी दिला. त्यानंतर श्रद्धांजली वाहण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून दत्तात्रय पारकर हे आजारी होते. आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली.

# भायखळा माझगावकर पाणीटंचाईने त्रस्त

प्रतिनिधी
■ मुंबई

एकीकडे मुंबई महापालिकेला पाणीपुरवठा करणारी धरणे पाण्याने ओसंडून वाहत असताना दुसरीकडे भायखळा माझगाव येथील नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. दरम्यान, माझगावकरांचा पाणीप्रश्न लवकर सोडवण्यात यावा, यासाठी आमदार मनोज जामसुतकर सहाय्यक आयुक्तांची भेट घेणार आहेत.

शहराच्या विविध भागात तांत्रिक अडचणीमुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. दरम्यान भायखळा माझगाव येथील घोडपदेव व फेरबंदर परिसरातील हेरंब दर्शन, योगेश्वर सारख्या सोसायट्या व काही चाळींमध्ये कमी दाबाने गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने, या परिसरातील नागरिक पाणी प्यायचे कसे? आणि आजाराविना जगायचे कसे ? असा प्रश्न विचारत आहेत.

पाणी पुरवठा प्रश्नावर मागील महिन्यात सहाय्यक आयुक्तांसोबत घेतलेल्या बैठकीत वॉर्डच्या जल विभागातील अधिकाऱ्यांनी पाणी कपातीचे कारण दिले होते. त्यानंतरही आज जलाशय भरलेले असतानाही पाणी कपात, कमी दाबाने पाणी येण्याच्या समस्या सुटलेल्या नाहीत. भंडारवाडा टाकी धोकादायक आहे त्यामुळे पाणी पंपिंग करून काढण्यात येत आहे त्याच सोबत पाण्याचा होणाऱ्या पुरवठा व वाटपाबाबत नियोजन नसल्याचेही दिसून येत असल्याचे सांगितले. या पाणीप्रश्नी पुढील आठवड्यात सहाय्यक आयुक्त यांच्याशी बैठक घेऊन याबाबतच्या अडचणी सोडविण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे जामसुतकर यांनी सांगितले.

> पाईप लाईनच्या वितरण नेटवर्क मध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे या परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. यावर जलविभागाच्या वतीने काम सुरू असून त्या अडचणी लवकर सोडवण्याचा प्रयत्न सुरू आहे.
>
> **- रोहित त्रिवेदी, सहाय्यक आयुक्त, ई विभाग, भायखळा**


## नवी मुंबई महानगरपालिका

**जाहीर नोटीस सूचना क्र./वृक्ष प्रा./16/2025-2026**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येते की,

| अनु. क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | झाडाचा प्रकार | एकूण तोडणे | एकूण स्थलांतरीत | झाड तोडणे/ स्थलांतरीत करावयाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. कामधेनू ग्रीन, प्लॉट नं.44, सेक्टर-13, नेरुळ, नवी 400706 | पेल्ट्रोफोरम<br>**एकुण** | 0<br>0 | 2<br>2 | सदरची झाडे इमारतीच्या प्रवेशव्दारात ये-जा करताना अडथळा निर्माण करित असल्याने एकुण 02 नग झाडे स्थलांतरित करणे. |

**सदर प्रस्तावास वृक्ष तोडणे/स्थलांतरित करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरूपात बी विभाग कार्यालय, भुखंड क्र.पी-8 व पी-9, कुकशेत से.14, नेरुळ, नवी मुंबई या विभागास कळविणे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. जाहीरात प्रसिध्दीचा दिनांक 29 / 07 /2025.**

सही/-
(किसनराव पलांडे)
उप आयुक्त (उद्यान परि-1)
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/315/2025



## ॲक्सिस फायनांस लिमिटेड

AXIS FINANCE

(सीआयएन यू६५९२१एमएच१९९५पीएलसी२१२६७५)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – ४०००२५

**रजिस्टर एडी/ स्पीड पोस्ट/ कुरियर/ ई-मेलद्वारे**
**हक्कांना बाधा न आणता**

**संदर्भ क्र. : एएफएल/सीओ/२०२५-२६/लीगल/जुलै/३६४ दिनांकित: २५/०७/२०२५**

**विक्री सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ अंतर्गत.**

प्रती,

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | **संतोष यादव पाटील (कर्जदार/ गहाणदार)** इमारत क्र. ७, सदनिका क्र. ११०९, हायलँड पार्क सीएचएसएल, कोलशेत रोड, हायलँड हॉस्पिटल स्मार्ट, ढोकाळी, ठाणे – ४०००६७ **येथे देखील:** कार्यालयाचा पत्ता: युनायटेड बिझनेस पार्क, २०३, २ रा मजला, रोड क्र. ११, वागळे इस्टेट, ठाणे ४००६०४. ई –मेल : santkrupaenterprises@gmail.com | 2. | **ज्योती पाटील (सह-कर्जदार I)** संतोष यादव पाटील (कर्जदार/ गहाणदार) इमारत क्र. ७, सदनिका क्र. ११०९, हायलँड पार्क सीएचएसएल, कोलशेत रोड, हायलँड हॉस्पिटल स्मार्ट, ढोकाळी, ठाणे – ४०००६७ ई – मेल : santkrupaenterprises@gmail.com |

**संदर्भ: (सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ अंतर्गत) "जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे तसे आहे तत्वावर सुरक्षित मत्तेच्या विक्रीसाठी.**

**विषय: सुरक्षित मत्ता (त्ते) चा ई-जाहीर लिलाव वजा विक्री सूचना.**

प्रिय महोदय/ महोदया

सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधले जात आहे ज्या अंतर्गत तुम्ही **२३ जुलै २०२५ अनुसार रु. ३,१७,५७,८५२ (रुपये तीन कोटी सतरा लाख सत्तावन्न हजार आठशे बावन्न फक्त)** इतकी संपूर्ण थकबाकी (०७ सप्टेंबर २०२३ रोजीच्या सरफेसी कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत जारी केलेल्या मागणी सूचनेच्या तारखेनुसार रक्कम रु. २,६०,५८,९६४/- (रुपये दोन कोटी साठ लाख अठ्ठावन्न हजार नऊशे चौसष्ट फक्त) करारानुसार व्याजासह, कसूर/दंड व्याज आणि इतर शुल्क इत्यादीसह, सार्वजनिक लिलावाद्वारे, सार्वजनिक किंवा खाजगी कराराद्वारे दरपत्रके मागवून, सुरक्षित मालमत्तेची विक्री अंतिम देयके/वसुली होईपर्यंत सादर करू शकता.

कृपया हे ह्याची देखील नोंद घेण्यात यावी की जर थकबाकीची संपूर्ण रक्कम एकत्रितपणे असेल तर सार्वजनिक लिलावाद्वारे किंवा खाजगी कराराद्वारे कोटेशन निविदा मागवून सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्यापूर्वी खर्च, शुल्क आणि खर्च सादर केला जात नाही. तुम्हाला सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्याचा अधिकार असू शकत नाही.

म्हणून कृपया लक्षात घ्या की येथे **"अनुसूची-I"** मध्ये अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या ॲक्सिस फायनान्स लिमिटेडला गहाण ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेची विक्री **१४ ऑगस्ट २०२५** रोजी सकाळी ११:०० वाजता **https://sarfaesi.auctiontiger.net /EPROC/** द्वारे सार्वजनिक ई-लिलावाद्वारे केली जाईल. अधिक तपशीलांसाठी कृपया वर्तमानपत्रांमध्ये आणि वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या सूचना पहा: **https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/** आणि **www.axisfinance.com**

आपले विश्वासू
**ॲक्सिस फायनांस लिमिटेड, करीता**
**प्राधिकृत अधिकारी**

**परिशिष्ट I**

| सुरक्षित स्थावर मत्तेचे वर्णन |
|---|
| **नोंदणीकरण जिल्हा आणि ठाणे उप जिल्हा, ठाणे ४००६०२ मधील वंदना टॉकीजजवळ, एल.बी.एस. मार्ग, गाव पाचपाखाडी तालुका आणि जिल्हा ठाणे येथे असलेल्या आणि वसलेल्या साधारणपणे १६५६.८३ चौ. मी. अंदाजे मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला टिक्का क्र. १२, सुसंगत जुना सर्वे क्र. ३६१ ए, हिस्सा क्र. १, २ आणि ३ (पार्ट) च्या सर्व खंड आणि भूखंडावरील "मोहन महल कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड" च्या इमारतीमधील एका स्टिल्ट कार पार्किंगसह ९ व्या मजल्यावरील ८५० चौ. फू. (चटईक्षेत्र) जे ७८.९७ चौ. मी. मोजमापाशी समतुल्य असलेली सदनिका क्र. सदनिका क्र. ९०४.<br>आणि नोंदणीकरण जिल्हा आणि ठाणे उप जिल्हा, ठाणे ४००६०२ मधील वंदना टॉकीजजवळ, एल.बी.एस. मार्ग, गाव पाचपाखाडी तालुका आणि जिल्हा ठाणे येथे असलेल्या आणि वसलेल्या साधारणपणे १६५६.८३ चौ. मी. अंदाजे मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला टिक्का क्र. १२, सुसंगत जुना सर्वे क्र. ३६१ ए, हिस्सा क्र. १, २ आणि ३ (पार्ट) च्या सर्व खंड आणि भूखंडावरील "मोहन महल कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड" च्या इमारतीमधील एका स्टिल्ट कार पार्किंगसह ९ व्या मजल्यावरील ७४० चौ. फू. (चटईक्षेत्र) जे ६८.७५ चौ. मी. मोजमापाशी समतुल्य असलेली सदनिका क्र. सदनिका क्र. ९०५.** |

**परिशिष्ट II**

| ई – लिलावाचा तपशिल | |
|---|---|
| मालमत्ता/ तांचे वर्णन | परिशिष्ट प- I अनुसार |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | रोजी: १४.०८.२०२५<br>वेळ: पासून : स. ११.०० वा. पर्यंत: दु. १२.०० वा.<br>प्रत्येकी ५ मिनिटाच्या अमर्यादित विस्तारासह |
| बोली सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ | रोजी: ११.०८.२०२५ सायं. ४:०० वा. पूर्वी |
| राखीव मूल्य: रु. ३८,४३,०००/- (रुपये अडतीस लक्ष त्रेचाळीस हजार मात्र)<br>*किंमत ज्याच्या खाली सदनिका/ मालमत्तेची विक्री केली जाणार नाही. | |
| इसारा रक्कम ठेव (आरपीच्या १०%) : रु. ३,८४,३००/- (रुपये तीन लक्ष चौऱ्याऐंशी हजार मात्र) | |
| बोली वाढ रक्कम: रु. १,००,०००/- (रुपये एक लक्ष मात्र) | |
| संपर्क व्यक्ती तपशील आणि मोबा क्र: | सुश्री. श्रुष्टी अगरवाल : ७७३८६५००२१<br>सुश्री. राधिका अगरवाल : ८६०४९७४२०१ |

# भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर देशव्यापी तोडगा काढण्याचे सुप्रीम कोर्टाचे संकेत

**नवी दिल्ली:** राजधानी दिल्लीत एका 6 वर्षीय मुलीचा रेबीजमुळे झालेल्या दुर्दैवी मृत्यूनंतर, देशभरात गंभीर बनलेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येची आणि त्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या घटनांची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून (suo motu) दखल घेतली आहे. ही परिस्थिती 'अत्यंत चिंताजनक आणि अस्वस्थ करणारी' असल्याचे नमूद करत, न्यायालयाने या प्रकरणी सुनावणी सुरू केली असून, या समस्येवर देशव्यापी तोडगा काढण्याचे संकेत दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या हस्तक्षेपामागे दिल्लीतील एका हृदयद्रावक घटनेचे वृत्त कारणीभूत ठरले. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने 'टाईम्स ऑफ इंडिया'मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका बातमीची दखल घेतली. या वृत्तानुसार, दिल्लीच्या पूठ कलान परिसरात राहणाऱ्या 6 वर्षीय छवी शर्मा हिला 30 जून रोजी एका पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता. तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले, मात्र उपचारांनंतरही रेबीजचा संसर्ग तिच्या शरीरात पसरला आणि 26 जुलै रोजी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने वेळेवर आणि योग्य उपचारांचा अभाव तसेच भटक्या कुत्र्यांच्या समस्येचे भीषण परिणाम अधोरेखित केले.



# धनखडांवर मोदी सरकार आणणार होते अविश्वास प्रस्ताव...

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिल्यानंतर जगदीप धनखड आणि केंद सरकारमधील मतभेदावरून अनेक तर्क लढवले जाऊ लागले आहेत. धनखड यांनी राजीनामा का दिला, याबाबत चर्चांना उधाण आले आहेत. त्यातच आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मोदी सरकारने धनखड यांच्याविरोधातच अविश्वास प्रस्तावाची तयारी केली होती, असे वृत्त आहे.

जगदीप धनखड यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्यापूर्वी बऱ्याच घडामोडी घडल्या आहेत. त्यांना मोदी सरकारमधील बड्या केंद्रीय मंत्र्यांनी फोन करून राजीनामा द्या, अन्यथा तुमच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला जाईल, असे धनखड यांना सांगितले होते. त्यानंतर दोन तासांनी धनखड यांनी राजीनामा दिल्याची चर्चा आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे सोमवारी भाजप आणि उपराष्ट्रपतींदरम्यानची दरी मोठ्या प्रमाणात वाढली. सोमवारी धनखड यांना भेटण्यासाठी एक



मंत्री त्यांच्या कार्यालयात गेले होते. त्यावेळी ते सचिवांसोबत होते. त्यांच्यासमोर धनखड यांनी मंत्र्यांना सुनावले होते. बिझनेस अडव्हाजरी कौन्सिलच्या बैठकीतही सरकारमधील मंत्री आणि धनखड यांच्यात वाद झाला होता.

बैठकीत जे. पी. नड्डा, किरेन रिजिजू, अर्जून राम मेघवाल, एल मुरूगन हे मंत्री होते. यावेळी धनखड म्हणाले होते की, 'ऑपरेशन सिंदूरवर पंतप्रधान, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्र्यांनी उपस्थित राहावे, पंतप्रधानांनी उत्तर द्यावे.' यावर रिजिजू यांनी कोण उत्तर देणार हा सरकारचा निर्णय असल्याचे सांगितले. धनखड यांना हे उत्तर पटले नाही. तुम्ही पंतप्रधानांना विचारून या, असे धनखड यांनी त्यांना सूचित केले.

या घटनाक्रमानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत एस. जयशंकर, अमित शाह, राजनाथ सिंह, नड्डा, निर्मला सीतारमण, मनोहर लाल खट्टर, शिवराज सिंह चौहान, रिजिजू आदी मंत्र्यांची बैठक होते. धनखड यांची पुन्हा समजूत काढण्याचे या बैठकीत ठरते. मात्र, दुपारी ४.३० वाजण्याच्या बीएसीच्या बैठकीआधीच धनखड हे ६३ विरोधी पक्षांच्या सदस्यांची सही असलेल्या न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या महाभियोगाच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू करतात. हाच मुद्दा सरकार आणि धनखड यांच्यातील दरी अधिक वाढण्यास कारणीभूत ठरतो.

याबाबत पंतप्रधान मोदींना माहिती दिली जाते. त्यानंतर नड्डा आणि रिजिजू धनखड यांची भेट घेत महाभियोगाच्या प्रस्तावावर पुनर्विचार करण्याची विनंती केली. पण धनखड त्यांचे म्हणणे मान्य करत नाहीत. त्यानंतर काही वेळाने पुन्हा रिजिजू आणि मेघवाल त्यांच्याकडे जातात. न्यायाधीश वर्मा यांच्यावर संयुक्तपणे लोकसभेत प्रस्ताव आणला जाणार असल्याची माहिती धनखड यांना दिली जाते. पण त्यानंतर ते माघार घेत नाहीत. रिजिजू आणि मेघवाल रिकाम्या हाताने परततात. सरकार आणि धनखड यांच्यामधील मतभेद आता टोकाचे बनले होते. धनखड काही केल्या माघार घेण्यास तयार नव्हते. अखेर सायंकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास मोदी सरकारमधील एका बड्या मंत्र्यांचा धनखड यांना फोन जातो. 'तुम्ही राजीनामा द्या, अन्यथा तुमच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला जाईल. या प्रस्तावावर ९० खासदारांच्या सह्या झाल्या आहेत,' असे मंत्र्यांकडून सांगितले जाते.

दरम्यानच्या काळात संसदेचे कामकाज संपल्यानंतर मंत्र्यांचे दहा गट तयार करण्यात आले. प्रत्येक मंत्र्यांच्या घरी प्रत्येकी दहा खासदार होते. धनखड यांनी मान्य केले नाही तर त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला जाईल, असे खासदारांना सांगितले जाते. मागील सहा महिन्यांपासून धनखड हे सरकारसोबत समन्वय साधत नसल्याचे कारण खासदारांना देण्यात आले. त्यानंतर धनखड यांना शेवटचा फोन जातो.

या फोननंतर धनखड हे राष्ट्रपती भवनकडे रवाना झाले. तिथे त्यांना २० ते २५ मिनिटे राष्ट्रपतींची वाट पाहावी लागली. त्यानंतर रात्री ९ वाजून २५ मिनिटांनी धनखड सोशल मीडियात पोस्ट करून राजीनाम्याची माहिती देतात.

# मालदीवच्या अध्यक्षांना मिठी मारताना धर्म विचारला होतात का?



वृत्तसंस्था
बीरभूम

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नुकतेच विदेश दौऱ्यावरून परतले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटन आणि मालदीवचा दौरा केला. या दौऱ्यावेळी मोदींनी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांची भेट घेतली, तसेच भारत आणि ब्रिटनमध्ये ऐतिहासिक मुक्त व्यापार करारही यावेळी झाला. त्यानंतर पंतप्रधान मोदी हे मालदीवच्या दौऱ्यावर गेले होते. मालदीवमध्ये मोदींचं जंगी स्वागत करण्यात आल्याचं पाहायला मिळालं.

यावेळी पंतप्रधान मोदी आणि मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्यात संयुक्त बैठकही पार पडली. यावेळी मोदींनी मालदीवला तब्बल ५६५ दशलक्ष डॉलर्स लाइन ऑफ क्रेडिट देण्याची घोषणा केली. मालदीवला देण्यात येणाऱ्या ५६५ दशलक्ष डॉलर्सच्या कर्जावरून आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली.

तसेच केंद्र सरकारने पश्चिम बंगालला निधीपासून वंचित ठेवल्याचा आरोपही ममता बॅनर्जी यांनी सोमवारी केंद्र सरकारवर केला. तसेच सध्या देशात सुरू असलेल्या हिंदी सक्तीच्या मुद्यांवरूनही ममता बॅनर्जी यांनी घणाघात केला. बीरभूम जिल्ह्यातील बोलपूरहून बोलताना ममता बॅनर्जी यांनी म्हटलं की, "मी स्वतःचा जीव देईन, पण कोणालाही माझी भाषा हिसकावू देणार नाही."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मालदीव दौऱ्यावर टीका करताना ममता बॅनर्जी यांनी म्हटलं की, "तुम्ही मालदीवच्या अध्यक्षांना मिठी मारली आणि बंगालला त्यांच्या निधीपासून वंचित ठेवलं. मग मालदीवच्या अध्यक्षांना मिठी मारताना आणि ५६५ दशलक्ष डॉलर्स देताना तुम्ही धर्म विचारला होतात का?", असा सवाल करत ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी या दौऱ्याच्या दरम्यान मालदीवसाठी तब्बल ५६५ दशलक्ष डॉलर्स लाइन ऑफ क्रेडिट देण्याची घोषणा केली. यावेळी मोदी म्हणाले होते की, "विकासाच्या भागीदारीच्या पार्श्वभूमीवर आम्ही मालदीवसाठी ५६५ दशलक्ष डॉलर्स देण्याचा निर्णय घेतला आहे. मालदीवच्या लोकांच्या प्राधान्यांनुसार येथील पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित प्रकल्पांसाठी ही मदत वापरली जाईल", असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं होतं.

पान 1 वरुन...

## 'दृश्यम' रंगवलं आणि व्हिडीओ व्हायरल

इतर नशिल्या पदार्थांचा समावेश असतो. याला रेव्ह पार्टी म्हणतात. आता पुणे पोलिसांनी जी कारवाई केली ती केस वेगळी आहे. ज्या सात लोकांना पकडण्यात आलं आहे ते एका घरामध्ये दारू, बीयर पित होते. घरामध्ये दारू पिणे हा काही गुन्हा नाही. पण पोलिसांनी या प्रकरणाला राजकीय उद्देशाने रेव्ह पार्टीचे स्वरुप दिलं आहे." पोलिसांचा राजकीय वापर सुरू आहे. पोलिसांनी त्या बंगल्यात जमलेल्या लोकांच्या राईट टू प्रायव्हसीचा गंभीर प्रकारे भंग केला आहे. त्यामुळे या प्रकरणी पोलीस अडचणीत येऊ शकतात असं मत असीम सरोदे यांनी व्यक्त केलं.

**पोलिसांनीच पुरावे पेरले :** असीम सरोदे यांनी या प्रकरणी पोलिसांवरच आरोप केला आहे. ते म्हणाले की, "प्रांजल खेवलकर हे एकनाथ खडसे यांचे जावई आहेत. प्लांटेड पुराव्यांच्या आधारे डॉ. खेवलकर आणि इतरांना गुन्हेगार ठवरण्याचे कट कारस्थान हे पोलिसांनीच रचले आहे. पोलिसांनी दोन ग्रॅम कोकेन सापडल्याचा दावा केला आहे. परंतु त्यांनी सात मिलिग्रॅम कोकेन जास्त भरलं पाहिजे अशी व्यवस्था करून या लोकांना बेल मिळणार नाही अशी व्यवस्था केली. पोलिसांनी एक चित्र तयार केलं. राजकीय निर्देशाखाली ते वागले."

**दृश्यम चित्रपटाप्रमाणे चित्र रंगवलं :** दृश्मय चित्रपटाप्रमाणे पोलिसांनी एक चित्र लोकांच्या मनावर बिंबवलं. त्याची आधीच तयारी केली होती. पोलिसांनी त्याचा एक व्हिडीओ व्हायरल केला. जे लोक आरोपी नाहीत त्यांचा व्हिडीओ व्हायरल करुन पोलिसांनी त्यांच्यावरचा संशय समाजात आरोपी म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला असा आरोप असीम सरोदे यांनी केला.

**खासगी जीवन जगण्याच्या हक्काचं उल्लंघन :** सरोदे म्हणाले की, "व्हिडीओ व्हायरल करणे म्हणजे व्यक्तीचे खासगी जीवन जगण्याच्या हक्कांचं गंभीर उल्लंघन आहे. ही चूक पोलिसांना भोवणार आहे. पोलिसांचा वापर हा राजकीय स्वार्थातून केला जात आहे. हे राजकीय पोलिसिंग थांबलं पाहिजे." या केसचे इतर धागेदोरे समोर येत आहेत. पोलिसांनी हा व्हिडीओ काढणे आणि व्हायरल करणे, न्यायालयात येण्यापूर्वीच तो व्हिडीओ व्हायरल करणे, एकनाथ खडसे यांची बदनामी करण्यासाठी हे सर्व केल्याचं दिसतंय. पोलिसांनी स्वतःच्या अंगझडतीचा कोणताही पंचनामा न करता त्या ठिकाणी धाड टाकली आणि कोकेन पुरावा प्लँट केला.

# 'जेएनयू'तील समस्यांबाबत विद्यार्थ्यांनी घेतली खा. संजय पाटलांची भेट

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

जेएनयूमध्ये (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ) शिक्षण घेणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आज महाराष्ट्र सदनात खासदार संजय दिना पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी विद्यापीठात अलिकडे घडलेल्या घटनांची माहिती दिली. महापुरुषांचा अवमान करणाऱ्या जेएनयूतील विद्यार्थ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली.



सर्व खासदारांनी या संदर्भात शिक्षण मंत्रालय तसेच जेएनयू प्रशासनाकडे तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांतर्फे करण्यात आली. सध्या नवी दिल्लीत पावसाळी अधिवेशन सुरू असून त्यानिमित्त सर्व खासदार दिल्लीत आहेत. जेएनयू विद्यापीठात शिक्षण घेणा-या मराठी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र सदनात ईशान्य मुंबईचे महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांची सदिच्छ भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या समस्या आणि त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्या केंद्र सरकारपर्यंत पोहचविण्यात येईल, असे आश्वासन खासदार पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिले.

## ...संवाद नाही

नव्हता, तर जम्मू-कश्मीरच्या अर्थव्यवस्थेला घातक धक्का देण्याचा, आणि देशात सांप्रदायिक तेढ पसरवण्याचा कट होता, असे भारताने स्पष्ट केले. सुरक्षा परिषदेच्या २५ एप्रिलच्या निवेदनात या हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला. परिषदेने म्हटले की, दहशतवाद हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका आहे. या गुन्ह्याच्या सूत्रधारांना आणि पाठराखणाऱ्यांना न्यायासमोर उभे करणं आवश्यक आहे, असेही परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर यांनी नमूद केले.

# रुग्णालयाच्या ICUमध्ये ऑक्सिजन पुरवठा बंद, 3 जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था
जालंधर

रविवारी रात्री जालंधर येथील सिव्हिल हॉस्पिटलच्या ट्रॉमा सेंटरमध्ये गोंधळ उडाला जेव्हा ऑक्सिजन प्लांटमधून ऑक्सिजन पुरवठा २ मिनिटांसाठी खंडित झाल्याने आयसीयूमध्ये दाखल असलेल्या ३ रुग्णांचा मृत्यू झाला. ऑक्सिजन पुरवठा बंद पडल्याने एकूण पाच रुग्णांवर परिणाम झाला, त्यापैकी २ जणांना वाचवण्यात यश आले.

या घटनेनंतर रुग्णालयात गोंधळ उडाला आणि कुटुंबातील सदस्यांनी तीव्र निषेध केला. ही घटना रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली. माहिती मिळताच आरोग्यमंत्री डॉ. बलबीर सिंह रात्री उशिरा १:१५ वाजता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पोहोचले. त्यांनी या बिघाडाबाबत बंद खोलीत डॉक्टरांशी बैठक घेतली. तसेच, डीसी हिमांशू अग्रवालदेखील घटनास्थळी पोहोचले.

अर्चना (१५), अवतार लाल (३२) आणि राजू (३०) अशी मृतांची ओळख पटली आहे. अर्चनाला १७ जुलै रोजी सर्पदंश झाल्यानंतर, अवतार लालला २७ जुलै रोजी औषधांच्या अतिसेवनामुळे आणि राजूला २४ जुलै रोजी क्षयरोगाच्या उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

२ मिनि टांसाठी पुरवठा खंडित झाला आरोग्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार, रविवारी रात्री ८:३० वाजता आयसीयूमधील ऑक्सिजन प्लांटमधून ऑक्सिजनचा पुरवठा बंद झाला. त्यानंतर डॉक्टर आणि तंत्रज्ञांना याची माहिती मिळाली. ऑक्सिजन प्लांटमधील समस्येबद्दल जाणून घेण्यासाठी आणि ती दुरुस्त करण्यासाठी त्यांना सुमारे २ मिनिटे लागली. या काळात ३ जणांचा मृत्यू झाला. रात्री ९:३० वाजता कुटुंबीयांना हे कळताच त्यांनी रुग्णालयात गोंधळ घातला.

# महादेव मंदिराबाहेर विजेच्या धक्क्यानंतर चेंगराचेंगरी, २ भाविकांचा मृत्यू ४० जखमी

वृत्तसंस्था
बाराबंकी

उत्तर प्रदेशातील बाराबंकी येथील प्रसिद्ध अवसानेश्वर महादेव मंदिराबाहेर सोमवारी विजेच्या धक्क्यानंतर चेंगराचेंगरी झाली. यामुळे दोघांचा मृत्यू झाला. तर सुमारे ४० जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. ही घटना घडली जेव्हा विजेची तार शेडवर पडली. यामुळे अनेकांना विजेचे धक्के बसले. श्रावणानिमित्त सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी मंदिराबाहेर मोठी गर्दी केली होती.



यावेळी ही घटना घडली.

अधिक मिळालेल्या माहितीनुसार, श्रावणानिमित्त सोमवारी अवसानेश्वर महादेव मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. मंदिरात जलाभिषेका सुरु असताना काही माकडांनी मंदिरातील टिन शेडवर उडी मारली. यामुळे विजेची तार तुटली आणि ती शेडवर पडली. ही विजेची तार पडताच त्यातील वीज प्रवाह शेडमध्ये पसरला. यामुळे गोंधळ उडून चेंगराचेंगरी झाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना पहाटे २-२.३० वाजण्याच्या सुमारास घडली जेव्हा मंदिरात जलाभिषेक विधीसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. माकडांमुळे जुन्या विद्युत तारांचे नुकसान झाले होते.

# हैदराबादेत बॅडमिंटन खेळताना हार्टअटॅक

हैदराबाद

हैदराबादेतील नागोले स्टेडियममध्ये बॅडमिंटन खेळत असताना एका २५ वर्षीय तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मृत राकेश हा हैदराबादमधील एका खाजगी कंपनीत काम करत होता. ही घटना रविवारी रात्री घडली. टेनिस खेळत असताना राकेश अचानक कोर्टवर पडला. त्याच्या मित्रांनी त्याला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. प्राथमिक तपासणीत डॉक्टरांनी मृत्यूचे कारण हृदयविकार असल्याचे म्हटले आहे. २५ वर्षीय राकेश दररोज बॅडमिंटन खेळत असे. मित्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राकेशला कोणतीही शारीरिक समस्या नव्हती.

# चीनमध्ये अनैतिक संबंध ठेवल्याबद्दल महंत बडतर्फ

## शाओलिन मंदिर प्रमुखावर अनेक मुले जन्माला घातल्याचा आरोप

वृत्तसंस्था
बीजिंग

चीनच्या प्रसिद्ध शाओलिन मंदिराचे मुख्य पुजारी शी योंग्झिन यांना पदावरून काढून टाकण्यात आले आहे. त्यांच्यावर मंदिराच्या मालमत्तेचा आणि निधीचा अपहार करणे, अनेक महिलांशी अवैध संबंध ठेवणे आणि अवैध मुलांचे वडील असणे असे गंभीर आरोप आहेत.

चायना डेलीच्या वृत्तानुसार, अनेक सरकारी संस्था संयुक्तपणे या आरोपांची चौकशी करत आहेत. दरम्यान, चीनच्या बुद्धिस्ट असोसिएशनने सोमवारी त्यांचे



ऑर्डिनेशन सर्टिफिकेट काढून घेतले आहे. असोसिएशनने आपल्या निवेदनात म्हटले आहे की शी योंग्झिन यांच्या कृतींमुळे बौद्ध समुदायाच्या प्रतिमेला आणि भिक्षूंच्या प्रतिमेला गंभीर नुकसान झाले आहे. या भिक्षूंच्या कृती बौद्ध धर्माच्या तत्त्वांचे उघड उल्लंघन मानल्या जातात. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, जी काही माहिती समोर येईल ती वेळोवेळी जनतेसोबत शेअर केली जाईल.

शाओलिन मंदिर मध्य चीनमधील हेनान प्रांतातील टेकड्यांमध्ये आहे. हे १५०० वर्ष जुने मंदिर केवळ धार्मिक कारणांसाठीच नाही तर त्याच्या मार्शल आर्ट्स परंपरेसाठी, विशेषतः कुंग फूसाठी देखील जगभरात प्रसिद्ध आहे. दरवर्षी, भारत आणि परदेशातून लाखो लोक हे बौद्ध मंदिर पाहण्यासाठी येतात. शी योंग्झिन हे १९९९ पासून शाओलिन मंदिराचे प्रमुख आहेत. त्यांनी मंदिराचे आधुनिक व्यवसाय मॉडेलमध्ये रूपांतर केले, ज्यामुळे त्यांना 'सीईओ मंक' असे टोपणनाव मिळाले.

# कंबोडियाने थायलंडसोबत युद्धबंदीची केली घोषणा

## अमेरिका आणि चीनने केली मध्यस्थी

वृत्तसंस्था
बँकॉक

कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट यांनी थायलंडसोबत सुरू असलेल्या सीमा वादात युद्धबंदीची घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्यासाठी लढाई तात्काळ थांबवण्याची अपेक्षा आहे.

या युद्धबंदीमध्ये चीन आणि अमेरिकेने मध्यस्थी केली आहे. मलेशियाची राजधानी क्वालालंपूर येथे आज दोन्ही देशांमध्ये शांतता चर्चा झाली. थायलंडचे कार्यवाहक पंतप्रधान फुमथम वेचायचाई आणि कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट या बैठकीत सहभागी होतील. मलेशिया या बैठकीचे अध्यक्षस्थान करेल.

दोन्ही देशांमधील सीमा वादामुळे गेल्या काही दिवसांपासून जोरदार गोळीबार सुरू आहे. यामध्ये ३३ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये



बहुतेक नागरिकांचा समावेश आहेत.

मलेशिया सध्या आग्नेय आशियाई राष्ट्रांच्या संघटनेचे (ASEAN) अध्यक्षपद भूषवत आहे. त्यांनी दोन्ही देशांना वाटाघाटीच्या टेबलावर बोलावले आहे. युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट (डावीकडे), मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम (मध्यभागी) आणि थायलंडचे कार्यवाहक पंतप्रधान फुमथम वेचायचाई (उजवीकडे) पोज देताना. युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट (डावीकडे), मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम (मध्यभागी) आणि थायलंडचे कार्यवाहक पंतप्रधान फुमथम वेचायचाई (उजवीकडे) पोज देताना.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी सांगितले की, थायलंड आणि कंबोडियामधील संघर्ष सोडवणे त्यांच्यासाठी सोपे काम असेल, कारण त्यांनी यापूर्वी भारत आणि पाकिस्तानमधील वाद सोडवला होता. युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान ट्रम्प म्हणाले की, त्यांनी थायलंड आणि कंबोडियाच्या नेत्यांना इशारा दिला होता की जर युद्ध थांबले नाही तर अमेरिका व्यापार करार करणार नाही. दरम्यान, अल जझीराच्या वृत्तानुसार, ट्रम्प यांनी दोन्ही राष्ट्रप्रमुखांशी केलेल्या चर्चेनंतरही, रविवारी सकाळी थायलंड आणि कंबोडियाने पुन्हा एकमेकांवर तोफखान्याच्या हल्ल्याचा आरोप केला.

शनिवारी ट्रम्प यांनी असा दावाही केला होता की, थायलंड आणि कंबोडियाच्या नेत्यांनी तात्काळ युद्धबंदी चर्चेवर सहमती दर्शवली आहे. ट्रम्प म्हणाले की, हे युद्ध मला भारत-पाक संघर्षाची आठवण करून देते, जो आम्ही यशस्वीरित्या थांबवला.

## ट्रम्प अखेर गाझावर बोलले...

# गाझातील उपासमारी खूपच भयावह, आता इस्रायलला निर्णय घ्यावा लागेल

वृत्तसंस्था
एडिनबर्ग

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गाझामधील युद्धामुळे पसरलेल्या उपासमारीवर पहिले विधान केले आहे. स्कॉटलंडच्या दौऱ्यावर असलेल्या ट्रम्प यांनी गाझामधून येणाऱ्या उपासमारीने त्रस्त मुलांचे फोटो अत्यंत भयानक असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की आता इस्रायलला युद्धावर निर्णय घ्यावा लागेल. ट्रम्प यांनी हमासवर सामान्य लोकांचे अन्न चोरल्याचा आरोपही केला.

ट्रम्प यांनी असा दावा केला की अमेरिकेने गाझा ह्युमॅनिटेरियन फाउंडेशन (GHF) ला $60 दशलक्ष दिले, तर इतर कोणत्याही देशाने काहीही दिले नाही. तथापि, प्रत्यक्षात अमेरिकेने फक्त $30 दशलक्ष दिले आहेत. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गाझामधील उपासमारीचे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. ते म्हणाले की, गाझामध्ये उपासमार नाही आणि आमचा



असा कोणताही हेतू नाही. त्यांनी एका ख्रिश्चन परिषदेत म्हटले होते की जर आम्ही मदत केली नसती तर आज गाझामध्ये कोणीही वाचले नसते. हमासविरुद्धच्या युद्धानंतर ६ महिन्यांत इस्रायलने रविवारी पहिल्यांदाच गाझाला मानवतावादी मदत पोहोचवली. इस्रायली सैन्याने आयडीएफने गाझाला पीठ, साखर, औषध आणि कॅन केलेले अन्न विमानाने पोहोचवले. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने हे पाऊल उचलण्यात आले. त्याच वेळी, इस्रायलने गाझाच्या काही भागात युद्धबंदी आणि संयुक्त राष्ट्रांसाठी (UN) सुरक्षित मार्ग जाहीर केला जेणेकरून तेथील लोकांपर्यंत मदत पोहोचवता येईल. मार्च ते मे या कालावधीत इस्रायलने गाझात बाह्य मदतीवर बंदी घातली होती.

आता इस्रायल म्हणते की ते संयुक्त राष्ट्रांच्या मदत वाटपात अडथळा आणत नाही. गाझामध्ये इस्रायल-हमास युद्ध सुरू होऊन २२ महिने झाले आहेत. आतापर्यंत या युद्धामुळे १२४ लोकांचा उपासमारीने मृत्यू झाला आहे, त्यापैकी ८१ मुले आहेत. फक्त जुलै महिन्यात ४० लोकांचा उपासमारीने मृत्यू झाला, त्यापैकी १६ मुले आहेत.